इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक - १८६ ■ वर्ष - ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव



धनत्रयोदशी

आपणांस धन,धान्य,
ऐश्वर्य, सुख, समृद्धी
आणि कीर्ती प्राप्त होवो
हिच ईश्वरचरणी प्रार्थना!!

धनत्रयोदशीनिमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा!

■ शुक्रवार,ता. ६ नोव्हेंबर २०२६ ■ अश्विन कृ. १२ ■ पाने १२+४=१६ ■ किंमत ५ रूपये ■ www.emahasatta.com ■ mahasatta@gmail.com

1837 Jewels

चंदुकाका सराफ ज्वेल्स

लख लख सोनेरी

सण आनंदाचा,
साज सोन्याचा



UP TO ₹6,000 CASHBACK* SBI card

*Min. Trxn.: ₹50,000; Max. Cashback: ₹6,000 per card account; Validity: 05 Nov - 11 Nov 2026. T&C Apply.

*अटी लागू. 2% अधिक मजुरी कुंदलच्या दागिन्यांवर

मजुरी फक्त
3.99%* ते 9.99%*
प्रति ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांवर

100%* पर्यंत सूट
हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मजुरीवर

फ्लॅट 30%* सूट चांदीच्या वस्तु आणि दागिन्यांच्या मजुरीवर

ऑफर 15 नोव्हेंबर 2026 पर्यंत

सातारा | वाई | कराड | सांगली | कोल्हापूर | ईश्वरपूर | पलूस | निपाणी | गडहिंग्लज | बेळगावी

0796 999 1827

शंभर रुपयांवर ऊसदराची चर्चा फिस्कटली

३,९०० रुपयांचा प्रस्ताव शेतकरी संघटनांना अमान्य; राजू शेट्टींच्या भूमिकेला सर्व संघटनांचा पाठिंबा

■ कोल्हापूर,ता.५(प्रतिनिधी)–

ऊसदराच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेली मंत्री हसन मुश्रीफ आणि शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक निष्फळ ठरली. पहिली उचल ३ हजार ९०० रुपये की ४ हजार रुपये, या शंभर रुपयांच्या फरकावरून एकमत होऊ शकले नाही. त्यामुळे ऊसदराची कोंडी कायम राहिली असून, शेतकरी संघटनांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या मागणीला पाठिंबा दिला.



हसन मुश्रीफ



राजू शेट्टी

बैठकीत मंत्री मुश्रीफ यांनी पहिली उचल प्रतिटन ३ हजार ९०० रुपये देण्याचा प्रस्ताव मांडला. गळीत हंगाम संपल्यानंतर आणखी १०० रुपये देण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. तसेच साखरेला जादा दर मिळाल्यास आणि बाजारातील दर स्थिर राहिल्यास आणखी २०० रुपये देण्याची तयारीही दर्शवली. मात्र, शेतकरी संघटनांनी हा प्रस्ताव मान्य केला नाही.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी पहिली उचल प्रतिटन ४ हजार रुपये मिळालीच पाहिजे, अशी ठाम भूमिका घेतली. पहिल्या उचलीतच चार हजार रुपये मिळावेत, या मागणीवर संघटना ठाम राहिल्याने चर्चेतून मार्ग निघू शकला नाही. अखेर शंभर रुपयांच्या फरकावर बैठक संपली.

या बैठकीत विविध शेतकरी संघटनांची

शेतकरी संघटनांची एकजूट; पुढील निर्णयाकडे लक्ष

पहिली उचल चार हजार रुपये मिळावी, यावर शेतकरी संघटना ठाम आहेत. तर कारखानदारांशी चर्चा करून टप्प्याटप्प्याने अधिक रक्कम देण्याचा मुश्रीफ यांचा प्रस्ताव आहे. दोन्ही बाजूंच्या भूमिकांमध्ये तडजोड न झाल्याने ऊसदराचा प्रश्न पुन्हा चर्चेच्या फेऱ्यात अडकला आहे. उद्याच्या कारखानदारांसोबतच्या चर्चेतून काय निष्पन्न होते, यावर पुढील आंदोलनाची दिशा ठरणार आहे.

एकजूट दिसून आली. राजू शेट्टी जो निर्णय घेतील, त्याच्याशी आम्ही ठाम राहू, अशी भूमिका प्रा. जालिंदर पाटील यांनी मांडली. त्यामुळे ऊसदराच्या प्रश्नावर शेतकरी संघटना एकत्रितपणे पुढील भूमिका घेणार असल्याचे संकेत मिळाले. बैठक संपल्यानंतर कार्यकर्त्यांनी कारखानदारांच्या विरोधात घोषणाबाजी केली.

दरम्यान, उद्या कारखानदारांशी चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाईल, असे मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले. त्यामुळे कारखानदारांची भूमिका काय राहणार आणि पहिल्या उचलीच्या चार हजार रुपयांच्या मागणीवर तोडगा निघणार का, याकडे जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

'गोकुळ' अमूलच्या घशात घालण्याचे षड्यंत्र

■ मुंबई,ता.५(प्रतिनिधी)–

■ आम.सतेज पाटलांचा महायुतीवर आरोप

■ ९ नोव्हेंबरला कोल्हापुरात मोर्चा

कोल्हापूर जिल्ह्यातील गोकुळ दूध उत्पादक संघाच्या निवडणुकीत सभासदांनी दिलेला कौल नाकारण्याचे पाप महायुतीकडून केले जात आहे. गोकुळवर कब्जा मिळवण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने पाच अशासकीय संचालक नेमण्याचा घेतलेला निर्णय दुर्दैवी आहे. लोकशाही संपवून शेतकऱ्यांचा संघ अमूलच्या घशात घालण्यासाठी सर्व खटाटोप चालला आहे, असा आरोप काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी गुरुवारी येथे केला.

सरकारचा निर्णय हा कोल्हापूरकरांचा अपमान करणारा असून महायुतीच्या या निर्णयाला न्यायालय आणि रस्त्यावर उतरून जोरदार विरोध केला जाणार असल्याचे सांगत आम. सतेज पाटील यांनी येत्या ९ तारखेला कोल्हापूर येथे दसरा चौक येथून संघर्ष मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा केली. मी येताना गोकुळचे गुलाबजाम आणि श्रीखंड आणणार होतो. पण गडबडीत ते राहून गेले. कारण गोकुळ या नावाचे पदार्थ शेवटचेच पाहून घ्या, उद्या त्यावर अमूलचे लेबल लावून गोकुळ संस्था त्यांच्या घशात घातली जाईल, असा दावाही पाटील यांनी केला.

राज्य सरकारने सहकार कायद्यात केलेला बदलातून साखर कारखाने आणि जिल्हा बँकांना वगळण्यात आले आहे. फक्त गोकुळमधील सत्ता मिळवण्यासाठी ही सुधारणा करण्यात आली आहे. ही सुधारणा गोकुळ पुरती मर्यादीत राहणार नसून उद्या ती कोणत्याही संस्थेसाठी लागू होऊ शकते. मुंबईत एसआरए प्रकल्पांच्या गृहनिर्माण संस्थांमध्ये असे शासकीय सदस्य नियुक्त करून प्रकल्पावर कब्जा केला जाऊ शकतो, अशी भीती सतेज पाटील यांनी व्यक्त केली. भाजप सरकार सहकार क्षेत्रात चुकीचा पायंडा पाडत आहे. हा कायदा पूर्वलक्षी प्रभावाने लागू केला जाणार आहे. निवडणूक झाल्यानंतर कायदा आणून तो पूर्वलक्षी प्रभावाने कसा काय लागू होतो.

कोल्हापूरकांनी जो कौल दिला तो नाकारण्याचे काम सरकार करत आहे. सरकारने घेतलेला निर्णय कोल्हापूरकर कदापि मान्य करणार नाहीत, असे पाटील म्हणाले.

मुश्रीफ आणि चंद्रकांत पाटलांचाच कट

गोकुळवर साडेपाच लाख शेतकऱ्यांचा संसार चालतो. दररोज २० लाख लिटर दुधाचे संकलन होते आणि शेतकऱ्यांच्या कष्टपोटी दर दहा दिवसाला १०० कोटी रुपये दिले जातात. ही संस्था शेतकऱ्यांच्या मालकीची असतानाही भाजप सरकार, मंत्री हसन मुश्रीफ आणि चंद्रकांत पाटील यांनी कट करून हा डाव खेळल्याचा आरोप आम. सतेज पाटील यांनी केला.

मतदारांनी नाकारलेल्यांना तज्ज्ञ संचालक कशासाठी?

गोकुळच्या निवडणुकीत दूध उत्पादकांनी नाकारलेल्या व्यक्तींना तज्ज्ञ संचालक म्हणून नियुक्त करण्याच्या हालचालींवरही सतेज पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला. संबंधित व्यक्ती खरोखरच तज्ज्ञ असतील, तर त्यांना निवडणुकीतून मतदारांचा विश्वास का मिळवता आला नाही? तज्ज्ञ संचालक नियुक्त करण्यासाठी कोणते निकष लावले जाणार आणि त्यांची पात्रता कोण ठरवणार, याचा खुलासा सरकारने करावा, अशी मागणी त्यांनी केली. लोकांनी नाकारलेल्या व्यक्तींना मागच्या दाराने संचालक मंडळात स्थान देणे म्हणजे मतदारांच्या कौलाचा अनादर असल्याचे ते म्हणाले.



शेतकरी संघटनेचे राज्य अध्यक्ष चुन्नाप्पा पुजारी, शशिकांत पडसलगी यांना अटक होताच अथणीमध्ये आंदोलन सुरू.

अथणी तालुक्यात ऊसदर आंदोलन पेटले

■ अथणी,ता.५(प्रतिनिधी)–

उसाला प्रति टन ५ हजार ५०० रुपये भाव मिळावा या मागणीसाठी शेतकऱ्यांचा संघर्ष गुरुवारी आणखी तीव्र झाला. शेतकरी संघटनेचे राज्य अध्यक्ष चुन्नाप्पा पुजारी, गौरव अध्यक्ष शशिकांत पडसलगी यांच्येसह दहा जणांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर जिल्ह्यातील वातावरण चिघळले आहे. अटकेचा निषेध म्हणून अथणी तालुक्यामध्ये ठिकठिकाणी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी रस्त्यावर उतरून सरकार विरोधात आंदोलन करून आक्रोश व्यक्त केला.

संतप्त शेतकरी अचानक रस्त्यावर उतरले आणि संकेश्वर–जेवर्गी राज्य महामार्ग रोखून धरला. त्यांनी कँनरा बँकेला घेराव घालून बँक बंद करण्याची मागणी केली. शहरातील दुकाने बंद करून त्यांनी सरकारविरोधात आपला संताप व्यक्त केला.

ऊस उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा दर कमी आहे. यामुळे उसाला प्रतिटन ५,५०० रुपये दर निश्चित करावा, ही शेतकऱ्यांची मुख्य मागणी आहे. गुरलापूर ते बेळगावपर्यंत शेतकरी जेल भरो आंदोलन, राज्य आणि राष्ट्रीय महामार्ग रोखून आंदोलन सुरू आहे. अथणी तालुक्यातील अथणी, मुरगुंडी, तेलसंग, कवलगुड, सती येथील विविध गावांमध्ये शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले.

संघटनेच्या नेत्यांना अटक केल्याने वातावरण चिघळू लागल्याचे पाहून पोलिसांनी सायंकाळी चार वाजता संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची सुटका केली. दरम्यान, उद्या आंदोलनाची पुढील रूपरेषा ठरवण्यासाठी कोल्हापूरमध्ये पुन्हा बैठक बोलण्यात आली आहे. त्यामध्ये होणारा निर्णय अंतिम राहील असे त्यांनी सांगितले.

नेत्यांच्या अटके निषेधार्थ बोरगाव बंदला प्रतिसाद

■ बोरगांव,५(प्रतिनिधी)–

ऊसदर संदर्भात लाखाहून अधिक शेतकऱ्यांचा सहभागाने गुरुवारी बेळगाव येथे भव्य मोर्चा काढण्यात येणार होता. या संदर्भात कर्नाटक राज्य रयत संघाचे अध्यक्ष चुन्नाप्पा पुजारी व गौरव अध्यक्ष शशिकांत गुरुजी यांना अटक झाली. या पार्श्वभूमीवर आज बोरगाव सकल सुमारे चार तासून अधिक काळ बंद करून कर्नाटक शासनाच्या विरोधात निषेध करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना युवा शेतकरी शितल सोबाने म्हणाले,कर्नाटकातील सरकार हे शेतकऱ्यांच्या विरोधी सरकार बनले आहे. उसाला ३६०० रुपये दर जाहीर केला. पण तो निर्णय शेतकऱ्यांना मान्य नाही. वासाही बेळगावमध्ये गुरुवारी जेलभरो आंदोलनाची घोषणा केली होती. वासाही लाखो शेतकऱ्यांची रॅली काढण्यात येणार होती. माञ तत्पूर्वीच कर्नाटक शासनाने पोलीस अधिकाऱ्यांमार्फत संघटनेच्या नेते व पदाधिकाऱ्यांना अटक केली. या अटकेचा शेतकरी संघटनेने निषेध करीत आंदोलन पुकारले होते.

बोरगाव येथे झालेल्या रस्ता रोको आंदोलनाप्रसंगी कारदगा ग्रामपंचायत माजी अध्यक्ष राजू खिचडे म्हणाले, ३६०० रुपये दर मान्य नसून पुन्हा बैठक घेतली जाणार होती. माञ पोलिसांनी पदाधिकाऱ्यांना अटक केली. याला शेतकऱ्यांनी विरोध केला असून योग्य भाव घेऊनच हे आंदोलन थांबेल.

याप्रसंगी शेतकरी संघटनेचे नेते सुनील नांगरे-पाटील, रमेश मालगावे, अभिनंदन फिरगनावर, अजित रोड्ड, प्रदीप माळी, राजू फिरगणावर, आदिनाथ जंगटे, शिवानंद राजमाने, पोपट पाटील, मोतीचंद चव्हाण, संदीप शिरे, शितल गोरवाडे, रमेश माळी, अजित रोड, बाबासाहेब पाटील यांच्यासह बोरगाव, जनवाड, शिरदवाड, कारदगा परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उन्हाळ्यापूर्वीच कुपनलिकांची भूजल पातळी खालावली

पाणी जपून वापरण्याचे संकेत ;उन्हाळ्यात टंचाईची भीती

■ इचलकरंजी, ता. ५–

शहरातील कुपनलिकांमधील पाण्याची पातळी सर्वसाधारण फेब्रुवारी– मार्च महिन्यामध्ये खालावते. मात्र यंदा तीन महिने आधीच शहरातील सार्वजनिक कुपनलिकांची भूजल पातळी दोन ते अडीच मीटरने खालावली आहे. यामुळे पाणी जपून वापरण्याचे संकेत आतापासूनच मिळताना दिसू लागले आहेत. तेव्हा नागरिकांनी याची गंभीर दखल घेऊन पाणी जपून वापरण्याची नितांत गरज बनली आहे, अन्यथा भविष्यात शहराला पाणी टंचाईचा सामना करावा लागू शकतो.

राज्यात यंदा सर्वत्र कमी पर्जन्यमान झाले आहे. त्यामुळे शासनाने सुमारे ३२० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. शहरातील सर्वच धरणांमध्ये यंदा नेहमीपेक्षा कमी पाणीसाठा झाला असून उन्हामुळे पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होत आहे. परिणामी पाणी पातळी १० ते २० टक्क्यांनी कमी होताना दिसत आहे. पाण्याची ही गंभीर परिस्थिती पाहता शासनाने विविध विकास कामावर बंधने घातली आहेत. त्याचबरोबर पाणी बचतीकडे प्राधान्याने लक्ष देण्यासह दहा टक्के पाणी कपातीचे आदेश सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. त्यानुसार इचलकरंजी महापालिकेकडूनही त्याची अंमलबजावणी केली जाताना दिसत आहे.

या अनुषंगाने महापालिकेच्या

अनेक भागात अजूनही बेकायदा जोडण्या

अनेक प्रभागात सार्वजनिक कुपनलिकांच्या जोडण्या पावलोपावलावर दिसून येत आहेत. संबंधित भागात फिरून बाची तपासणी करण्याची गरज आहे. बाची कसून तपासणी केल्यास अनेक अवैध जोडण्या दिसून येतील, त्या तातडीने बंद करण्यात, कुपनलिकांना टायमर बसविण्याचा बावत, पाईप लावून पाणी भरणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.



पाणीपुरवठा विभागाने शहरातील कुपनलिकांकडे लक्ष दिले आहे. अनेक नागरिकांनी कुपनलिकांच्या बेकायदेशीर जोडण्या घेतल्या आहेत. त्या शोधून बंद करण्याची धडक मोहीम हाती घेतली आहे. नदीचे पाणी कमी झाल्यानंतर अथवा पाणी पुरवठा खंडीत झाल्यानंतर नागरिकांना सार्वजनिक कुपनलिकांचा मोठा आधार असतो.

शहरात महापालिकेच्या सुमारे १३४७ कुपनलिका आहेत. यामधील ९१४ कुपनलिकांना पंप असून उर्वरित ४३३ कुपनलिकांना हातपंप आहेत. सध्या काही भागात या कुपनलिकांचा वापर बेसुमार पद्धतीने सुरू आहे. त्यामुळे पाणी मोठ्या प्रमाणात वाया जाताना दिसत आहे. एरवी फेब्रुवारी-मार्च महिन्यामध्ये या कुपनलिकांची भूजल पातळी खालावते. माञ यावेळी तीन महिने आधीच कुपनलिका मधील भूजल पातळी सुमारे दोन ते तीन मीटरने खालावली आहे. त्यामुळे जमिनीतील पाणीसाठा झपाट्याने कमी होताना दिसत आहे. तेव्हा नागरिकांनी आतापासूनच पाणी जपून वापरण्याची नितांत गरज बनली आहे अन्यथा उन्हाळ्यामध्ये पाण्याची गंभीर स्थिती ओढवू शकते.

शोध मोहिम राबविण्याची गरज

पाणी बचतीसाठी मध्या महापालिकेच्या वतीने शहरातील सार्वजनिक कुपनलिकांच्या बेकायदा जोडण्या तोडण्याची मोहीम सुरू आहे. आजअखेर सुमारे ४७ हून अधिक बेकायदा जोडण्या तोडण्यात आल्या आहेत. याशिवाय अनेक भागात अद्यापही शोध मोहीम राबवली जाणार आहे. तेव्हा महापालिकेने इतरही भागात तातडीने शोध मोहीम राबवून कुपनलिकांच्या अवैध जोडण्या तपासून तोडण्याची गरज आहे.

वसुबारसनिमित्त श्री गोमातेची पूजा

कोल्हापूर,ता.५(प्रतिनिधी)–

दीपावलीच्या वसुबारसचे औचित्य साधून येथील श्री दत्त भिक्षालिंग मंदिरामध्ये श्री गोमातेची पूजा व विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले.

यावेळी देवस्थान व्यवस्थापन समितीच्या सचिव श्रीमती वर्षा साळुंखे, तसेच देवस्थानचे कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

'एमपीएससी'च्या नऊ परीक्षांसंदर्भात चौकशी

मुंबई,ता.५(प्रतिनिधी)–

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या नऊ स्पर्धा परीक्षांसंदर्भात प्रश्नपत्रिका तसेच उत्तरतालिका फुटल्याच्या प्रकरणांची सखोल चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने चौकशी आयोगाची नियुक्ती केली आहे.

या प्रकरणाशी संबंधित माहिती, पुरावे किंवा तक्रारी असलेल्या व्यक्तींना आपली निवेदने १६ नोव्हेंबर पर्यंत आयोगाने निश्चित केलेल्या विहित प्रतिज्ञापत्राच्या नमुन्यातच सादर करावे.

गोकुळमध्ये सत्तांतर रोखण्यासाठी अध्यादेश आणल्यास तो बेकायदेशीर

माजी सरन्यायाधीशांनी दिला होता कायदेशीर सल्ला

■ कोल्हापूर,ता.५(प्रतिनिधी) –

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) मधील नवनियुक्ति बहुमताला सत्तास्थापनेपासून रोखण्यासाठी राज्य सरकारने अध्यादेश आणून तज्ज्ञ व शासकीय स्वीकृत संचालकांना मतदानाचा अधिकार दिल्यास तो कायदा आणि संविधानाच्या चौकटीत टिकणार नाही, असा कायदेशीर सल्ला भारताचे माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी दिला आहे. असा अध्यादेश म्हणजे मनमानी कारभार आणि अधिकारांचा गैरवापर ठरेल, असेही त्यांनी नमूद केले आहे.

गोकुळच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मुंबई उच्च न्यायालयाचे कोल्हापूर सर्किट बेंचमधील वकील ॲड. श्रीकृष्ण गणवावले यांनी गोकुळच्या १३ बहुमतातील निर्वाचित संचालकांच्या वतीने माजी सरन्यायाधीश बी.आर.गवई यांच्याकडून कायदेशीर सल्ला मागवला होता. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी त्यांनी त्यावर अभिप्राय दिला आहे.

कलम ७३ अअअ आणि २७ (९) नुसार स्वीकृत व शासकीय नामनिर्देशित संचालकांना अध्यक्ष किंवा इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार नाही. बहुमताचा कौल नाकारण्याचाही अध्यादेशाद्वारे हा अधिकार देणे हे राजकीय हेतूने प्रेरित असून लोकशाही मूल्यांच्या विरोधी आहे. मुंबई उच्च न्यायालयाने (रिट याचिका ५७६२/२०२६) २ नोव्हेंबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशात १० नोव्हेंबर २०२६ रोजी होणाऱ्या अध्यक्ष निवडीसाठी स्पष्टपणे २५ निर्वाचित संचालकांना ७ दिवसांची नोटीस बजावण्याचे निर्देश दिले आहेत.


न्यायालयाचा हा आदेश प्रतिबंध असताना असा अध्यादेश काढणे म्हणजे थेट न्यायदानाच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करणे ठरेल, असेही गवई यांनी अभिप्रायमध्ये म्हंटले आहे.राज्य सरकारचा असा कोणताही अध्यादेश उच्च न्यायालयात आव्हान दिल्यास रद्द ठरण्यास पात्र राहील,असेही या अभिप्रायमध्ये म्हंटले आहे.

विरोधकांनी सभासदांच्या मनात विष कालवले

मंत्री हसन मुश्रीफ

■ कोल्हापूर,ता.५(प्रतिनिधी)–

गोकुळ दूध संघाच्या अध्यक्ष निवडीवरून निर्माण झालेल्या पेचामुळे महायुतीतील अंतर्गत मतभेद उघड झाले आहेत. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी गुरुवारी 'दोस्त दोस्त ना रहा...!' असे सूचक विधान करत महायुतीतील वर्चस्वाच्या संघर्षावर भाष्य केले. महायुतीतील घटक पक्षांमध्ये कोणाची सभासद संख्या अधिक, यावरून स्पर्धा सुरू होती. या अंतर्गत लढाईचा फायदा विरोधकांनी घेतला आणि सभासदांच्या मनात विष कालवले, असा आरोप त्यांनी केला.



मुंबई येथे पत्रकारांशी बोलताना मुश्रीफ यांनी गोकुळमधील सत्तासंघर्ष आणि अध्यक्ष निवडीच्या पेचावर भूमिका मांडली. अध्यक्ष निवडीसाठी १४ संचालकांची गणपूर्ती आवश्यक असताना महायुतीचे संचालक पहिल्या सभेला अनुपस्थित राहिले. त्यामुळे अध्यक्ष निवडीची प्रक्रिया रखडली. आगामी सभेतही अशीच परिस्थिती निर्माण होऊन दोन-तीन वेळा सभा तहकूब झाल्यास संघावर प्रशासक नियुक्त करण्याची वेळ येऊ शकते, असे मुश्रीफ म्हणाले.

या पेचाच्या पार्श्वभूमीवरच शासनाने पाच शासननियुक्त संचालक नेमण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे संचालक मंडळात २५ जणांच्या माध्यमातून कामकाज होईल आणि साडेपाच लाखांहून अधिक दूध उत्पादकांना न्याय मिळेल, असा दावा त्यांनी केला.

शासननियुक्त संचालकांच्या नियुक्तीवरून राजकीय हस्तक्षेप होणार नसल्याचे सांगत मुश्रीफ यांनी या निर्णयाचे समर्थन केले. संबंधित क्षेत्रातील ज्ञान आणि अनुभव असलेल्या तज्ज्ञ व्यक्तींचीच निवड केली जाईल. माझा मुलगा किंवा अन्य कोणताही राजकीय कार्यकर्ता तज्ज्ञ संचालक होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

विरोधकांना सर्वत्र मतचोरीच दिसते

गोकुळमध्ये मतचोरी झाल्याचा राहुल गांधी यांचा आरोपही मुश्रीफ यांनी फेटाळला. त्यांना जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी मतचोरीच दिसते, अशी टिप्पणी त्यांनी केली. गोकुळच्या उपविधीमुळे निर्माण झालेला अध्यक्ष निवडीचा पेच समजून न घेता आरोप केले जात असल्याचे ते म्हणाले.

शासकीय भरती प्रक्रियेत मोठे बदल होण्याची शक्यता

■ मुंबई,ता.५ (प्रतिनिधी)–

राज्यातील विविध शासकीय भरती परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीने महत्त्वपूर्ण शिफारशी शासनाला सादर केल्या आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ मधील पदसंख्या १६ हजारांपेक्षा अधिक करण्यासह सर्व भरती परीक्षांसाठी उमेदवारांना कमाल वयोमर्यादेत एकदाच एक वर्षाची सवलत देण्याची शिफारस समितीने केली आहे. वामुळे राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षा उमेदवारांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

राज्य शासनाने ४ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार भरती परीक्षा प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठित केली होती. या समितीने राज्यातील विविध विभागांमधील विद्यार्थी, उमेदवार आणि संबंधित हितधारकांशी चर्चा करून त्यांच्या मागण्या, सूचना आणि अभिप्रायांचा अभ्यास करून अंतरिम अहवाल शासनाला सादर केला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ साठी सुमारे १२ लाख उमेदवारांनी अर्ज केले आहेत. सध्या या परीक्षेसाठी पाच हजारांहून अधिक पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. मात्र, विविध शासकीय विभागांकडून आणखी ११ हजारांहून अधिक पदांची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आली आहे. ही अतिरिक्त पदे शुद्धिपत्रकाद्वारे समाविष्ट करून गट-क परीक्षेतील एकूण पदसंख्या १६ हजारांपेक्षा अधिक करण्याची शिफारस समितीने केली आहे. ही शिफारस मान्य झाल्यास मोठ्या संख्येने उमेदवारांना शासकीय सेवेत संधी मिळण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो.

स्पर्धा परीक्षा उमेदवारांच्या मागण्यांचा विचार करून विशेष बाब म्हणून सर्व भरती परीक्षांसाठी कमाल वयोमर्यादेत एकदाच एक वर्षाची सवलत देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

गोकुळ सत्तासंघर्षात राहुल गांधींची उडी

कोल्हापूर,ता.५(प्रतिनिधी)–

गोकुळ दूध संघाच्या सत्तासंघर्षाचे पडसाद आता राष्ट्रीय राजकारणातही उमटू लागले आहेत. गोकुळच्या निवडणुकीत दूध उत्पादकांनी भाजपला नाकारल्यानंतरही सत्तेची गणिते बदलण्यासाठी नियमांमध्ये फेरफार केला जात असल्याचा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. ट्विटद्वारे गोकुळमधील पडझोडीवर भाष्य करत त्यांनी आमदार सतेज पाटील यांच्या भूमिकेला पाठिंबा दर्शविला.

राहुल गांधी यांनी आपल्या ट्विटमध्ये गोकुळच्या निवडणुकीत दूध उत्पादकांनी भाजपचा पराभव केल्याचा उल्लेख केला. माञ, निवडणुकीनंतर नियम बदलून शासननियुक्त संचालकांच्या माध्यमातून बहुमत मिळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. 'चार संचालक हवे असलेल्या बारा कारा आणि बहुमत चोरून मिळवा,' अशा शब्दांत त्यांनी राज्यातील सत्ताधाऱ्यांवर टीका केली. हा दूध उत्पादकांच्या मतांची चोरी करण्याचा प्रकार असून जनादेशातच फेरफार केला जात असल्याचे त्यांनी म्हटले.



|| हार्दिक शुभेच्छा ||

आमचे परममित्र व सहकारी,
मा.श्री. राजू कबाडे
(सरकार)
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!

श्री. राजू कबाडे (सरकार)

• दादासो भाटले •
पूर्व भाजपा कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्ष
माजी सभापती, आरोग्य समिती इ.न.पा.

• पांडुरंग सोलगे •
संचालक, इचलकरंजी
पॉवरलुम असोसिएशन



|| हार्दिक शुभेच्छा ||

आमचे बंधुतुल्य,
शहापूर व इचलकरंजीचे नेतृत्व
मा.श्री. राजूसाहेब कबाडे
(R.K.Sarkar)
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!

मा.श्री. राजूसाहेब कबाडे

ॲड.संजय नरवेकर
माजी अध्यक्ष, बार कौन्सिल कोल्हापूर
व मानसी मंदीर, कबनूर सह्याद्रीनगर

राजगोंडा पाटील
उद्योजक व शेतकरी
कुरुंदवाड

नितीन सुतार
सामाजिक कार्यकर्ता व सरकारच्या लाडक्या, शहापूर

|| हार्दिक शुभेच्छा ||





श्री. राजू कबाडे (सरकार)
श्री. विनायक सोलगे (मास्तर)

आमचे बंधुतुल्य नेतृत्व मा.श्री. राजू गोरख कबाडे व
श्री. विनायक पांडुरंग सोलगे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभसकाळ ग्रुप, शहापूर

सचिन नागणे • **महेश वडर** • **राजू कोकणे** (दादा)
इसाक ऐनापुरे (बँक मॅनेजर, हुपरी) | **मंगेश देर्शिंगे** (आर.के.केबल नेटवर्क) | **प्रशांत कुन्हाडे** (सरकार समर्थक)
संकेत रोकडे (SR) • **अनिल कोपार्डे** • **धनंजय कोकणे**



वाढदिवसाच्या मनःपुर्वक **शुभेच्छा!**

आमचे परममित्र, सहकारी,
मा.श्री. राजू कबाडे (सरकार)
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!

मा.श्री. राजू कबाडे (सरकार)

लक्ष्मीकांत लड्डा | बाजीराव कुंभार
रणजीत अनुसे | गणेश पोवार

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

कोल्हापूर महानगरपालिका खाजगी प्राथमिक शिक्षक सेवक सह. पत संस्था मर्या,कोल्हापूर.

✲ संस्थेची ठळक वैशिष्ट्ये ✲
- ✲ ऑडीट वर्ग 'अ'
- ✲ स्वत:ची सुसज्ज वास्तु
- ✲ स्वभांडवली संस्था
- ✲ ठेवीवर आकर्षक व्याजदर
- ✲ सभासद कर्ज विम्याची सोय
- ✲ संपूर्ण संगणकीकृत
- ✲ एकूण कर्ज मर्यादा ५० लाख
- ✲ वार्षिक उलाढाल ६०० कोटी वर
- ✲ तात्काळ व तत्पर सेवा
- ✲ १०० कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण

श्री. भरत बा. रसाळे
संस्थापक

श्री. अरुण आत्माराम गोते, सचिव | श्री. शिवाजी भिकाजी सोनाळकर, व्हा. चेअरमन | सौ. रोहिणी राजाराम येडगे, चेअरमन

✲ संचालक मंडळ ✲

श्री.सातापा दत्तात्रय कासार, श्री.अमित मारुती पटेट, श्री.मच्छीद्र सखाराम नाळे, श्री. सर्जेराव विष्णू नाईक
श्री. कृष्णात सर्जेराव चौगले, सौ.माधुरी महादेव घाटगे, सौ. वर्षाराणी धोंडीराम वायदंडे, श्री. राजेश आनंदा कोंडेकर
श्री. संतोष बाबुराव आथरे, श्री. राजेंद्र तुकाराम कोरे, श्री. संदीप बाजीराव सातपुते, श्री. विनोद वैजनाथ पुले

✲ सल्लागार समिती ✲

श्री.संभाजी महादेव मुतगर, श्री. आप्पासो शिवाजी वागरे, श्री. पंडित मधुकर मस्कर
श्री. चंद्रकांत पांडुरंग बाकोरकर, श्री. दशरथ तुकाराम कांबळे, सौ.विद्या राजाराम पाटील

✲ कर्मचारी वर्ग ✲

श्री. रमेश वि. गंजाळ, क्लार्क | श्री. सुबोधकुमार वा. कोल्हटकर, क्लार्क | श्री.सदाशिव कृ. साळवी, व्यवस्थापक
श्री. कुणाल म.भालकर, क्लार्क | श्री. विशाल शा. पाटील, क्लार्क | श्री. अनिरुध्द वि. पाटील, शिपाई
श्रीम. जैबुनी या. शेख, सेविका







इंन्स्पायर हब मे. गुरुकृपा इलेक्ट्रॉनिक्स अँड इलेक्ट्रिकल इचलकरंजी

स्टेशन रोड, आंबेडकर पुतळ्या जवळ, इचलकरंजी. फोन 9831311616, 9625626364

संपादकीय

'ट्रम्पपर्वा'ला नकार

इस्रायलच्या निवडणुकीनंतर तेथील मतदारांनी संघर्षवादी बेंजामिन नेतान्याहू यांना धडा शिकवल्यानंतर आता अमेरिकेतील मतदारांनी तेथील उद्दाम सत्ताधीश अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना धक्का देऊन तसाच धडा शिकवला आहे. अमेरिकेतील मध्यावधी निवडणूक हा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकालावर घेतलेला जनमत चाचणीचा कौल होता. या कौलात अमेरिकन मतदारांनी स्पष्टपणे आपला राग व्यक्त केला असे दिसते. कारण डेमोक्रॅटिक पक्षाने या निवडणुकीत सिनेट आणि हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह्स या दोन्ही सभागृहांवर ताबा मिळवला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर केवळ पाचव्यांदा त्याहून विरोधी पक्षाने मध्यावधी निवडणुकीत दोन्ही सभागृहे एकाच वेळी पलटवली आहेत. या बदलाचा अर्थ समजून घ्यावा लागणार आहे. या निवडणुकीपूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाकडे सिनेटमध्ये ५३– ४७ असे बहुमत होते आणि हाउसमध्येही २९९ विरुद्ध २१५ असे किरकोळ बहुमत होते. आता चित्र पूर्णपणे बदलले आहे. सिनेटमध्ये एकूण १०० जागा असतात. आता डेमोक्रॅट्स ५४ जागांनी बहुमतावर आहे. हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह्जमध्ये एकूण ४३५ जागा असतात आणि तेथे सर्व जागांवर निवडणूक झाली. २१८ जागा बहुमतासाठी लागतात. डेमोक्रॅट्सनी २३१ जागा जिंकून बहुमताचा आकडा पार केला आहे. सर्व निकाल हाती येतील तेव्हा डेमोक्रॅट्सना आणखी जागा वाढू शकतात. या निवडणुकीत सर्वांत धक्कादायक निकाल सिनेटमध्ये लागले. कारण डेमोक्रॅट्सनी रिपब्लिकन पक्षाच्या बालेकिल्ल्यात शिरून जागा जिंकल्या आहेत. नॉर्थ कॅरोलिना, ओहायो (पोटनिवडणूक) आणि टेक्ससमधील पराभव ट्रम्प यांना सर्वांत मोठा धक्का आहे. केवळ काँग्रेसच नाही, तर राज्यांच्या गव्हर्नरपदाच्या निवडणुकांमध्येही डेमोक्रॅट्सनी बाजी मारली. २४ वर्षांनंतर जॉर्जियामध्ये डेमोक्रॅटिक गव्हर्नर निवडून आला आहे. आपण जगात सर्वांत लोकप्रिय आहोत आणि आपले कोणी वाकडे करू शकत नाही असा दावा करणाऱ्या नेत्यालाच मतदारांनी कस्पटासमान दाखवून दिले आहे. ट्रम्प यांच्या धोरणांबद्दल मतदारांनी स्पष्ट असंतोष व्यक्त केला आहे. ट्रम्प यांनी लावलेल्या टॅरिफमुळे अमेरिकेत जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्या. डेमोक्रॅट्सनी याच मुद्द्याला टॅरिफ टॅक्स असे नाव दिले. अमेरिकेच्या अनेक राज्यांमध्ये मोठ्या एआय डेटा सेंटर्समुळे वीज आणि पाण्याचे दर वाढले. स्थानिक लोकांनी याला विरोध केला आहे हा मुद्दा निवडणुकीत गाजला. इराण युद्धाच्या निमित्ताने परदेशातील युद्धात अमेरिकेचा सहभाग पुन्हा वाढल्याने मतदार नाराज होते. ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट'चे आश्वासन दिले होते, पण युद्धामुळे त्यांच्या समर्थकांमध्येच फूट पडली आणि त्याचाही फटका बसला. वाढियाव आरोग्य विम्याचे दर, महिलांचे अधिकार आणि लोकशाही संस्थांवरील दबाव या मुद्द्यांवरही तरुण आणि महिला मतदारांनी मोठ्या प्रमाणात ट्रम्प यांच्या विरोधात मतदान केले. आपण जे निर्णय घेतले होते ते योग्य होते अशी शेखी मिरवणाऱ्या ट्रम्प यांना अमेरिकेतील तरुण मतदार आणि महिला मतदार यांनी मोठा धडा शिकवला आहे. निकालानंतर ट्रम्प यांनी सोशल मीडियावर लिहिले की, 'जर मी स्वतः मतपत्रिकेवर असतो तर रिपब्लिकन जिंकले असते. हा पराभव त्यांच्या धोरणांचा नसून मध्यावधी निवडणुकीतील नेहमीच्या कलाचा भाग आहे.' मात्र डेमोक्रॅट्ससोबत काम करण्याची तयारी दाखवली. ही भाषा ट्रम्प यांच्यासाठी थोडी नरम मानली जात आहे. कारण आता काँग्रेसमध्ये कोणतेही विधेयक मंजूर करायचे असेल, तर त्यांना डेमोक्रॅट्सची गरज लागणार आहे. ट्रम्प यांच्यासमोर आता अन्य पर्यायही नाही. अमेरिकेच्या या निवडणुकीने जे सत्ताबदल केले आहेत त्याचा जगावर काय परिणाम होणार आहे हेसुद्धा महत्त्वाचे आहे. अमेरिकेच्या काँग्रेसमध्ये सत्ता बदलल्याने भारतासह संपूर्ण जगावर परिणाम होणारच आहे. डेमोक्रॅट्सनी टॅरिफवीरोधात प्रचार केला असल्याने, भारतावर लावलेले जास्त आयात शुल्क कमी होण्याची शक्यता आहे. याचा भारतीय निर्यातदारांना फायदा होऊ शकतो. एच- १बी व्हिसा आणि इमिग्रेशन याबाबतच्या ट्रम्प यांच्या कठक इमिग्रेशन धोरणाला आता काँग्रेसमध्ये विरोध होईल. इराण युद्ध आणि युक्रेन–रशिया युद्धात अमेरिकेची भूमिका आता काँग्रेसच्या तपासणीखाली येईल. मध्यावधी निवडणुकीच्या निकालानंतर आता पुढील दोन वर्षे अमेरिकेत विभाजित सरकार असेल, म्हणजे राष्ट्राध्यक्ष रिपब्लिकन पक्षाचा असला तरी काँग्रेसमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाची सत्ता असणार आहे. अमेरिकन राजकारणात यास डिव्हाईज म्हणतात. या परिस्थितीत सरकार चालवणे अत्यंत कठीण असते.

मतदारांच्या हक्काचे पुनरीक्षणाची गदा!

लोकशाही व्यवस्थेत मतदानाचा अधिकार हा नागरिकांच्या राजकीय सहभागाचा सर्वात महत्त्वाचा आधार आहे. मतदारयादी अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत असणे ही मुक्त व निष्पक्ष निवडणुकांची मूलभूत गरज आहे. मृत व्यक्तींची नावे, दुबार नोंदी आणि अपात्र व्यक्तींची नावे मतदारयादीतून वगळणे आवश्यकच आहे. मात्र, ही प्रक्रिया राबवताना एकाही पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार हिरावला जाणार नाही, याची खबरदारी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे.

निवडणूक आयोगाने देशातील विविध राज्यांमध्ये सुरू केलेल्या मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या प्रक्रियेवरून निर्माण झालेला वाद पाच मूलभूत प्रश्नांशी संबंधित आहे. मतदारयादी शुद्ध करण्याच्या नावाखाली लाखो पात्र नागरिकांची नावे वगळली जात असतील, तर त्या प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे. निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचा घोषित उद्देश मतदारयादीतील चुटी दूर करून केवळ पात्र मतदारांची नोंद कायम ठेवणे हा आहे. या उद्देशाबाबत तत्त्वतः आक्षेप असण्याचे कारण नाही. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक विसंगती समोर आल्या आहेत. आवश्यक कागदपत्रे सादर करता न आल्यामुळे, नोंदीमधील चुटींमुळे किंवा निर्धारित निकषांची पूर्तता न झाल्यामुळे मोठ्या संख्येने मतदारांची नावे वगळण्यात आली, या प्रक्रियेमुळे खरोखर अपात्र मतदार वगळले गेले की पात्र नागरिकांनाही मतदानाच्या अधिकारापासून वंचित करण्यात आले, हा प्रश्न आता अधिक गंभीर बनला आहे. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गोवा, पंजाब आणि मणिपूर या ५ राज्यांमध्ये पुढील वर्षी विधानसभा निवडणुका होणार आहेत. या राज्यांमधील पुनरीक्षणानंतर मतदारसंख्येत मोठी घट झाल्याचे समोर आले आहे. उपलब्ध माहितीनुसार, पुनरीक्षणापूर्वी या राज्यांमध्ये सुमारे १८.७१ कोटी मतदार होते. ही संख्या आता १६.४३ कोटींवर आली आहे. म्हणजेच सुमारे २.२८ कोटी मतदारांची नावे कमी झाली आहेत. त्यातील जवळपास ९० टक्के मतदार एकट्या उत्तर प्रदेशातील असल्याचे सांगण्यात येते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे वगळली जाणे ही सामान्य प्रशासकीय बाब मानला येणार नाही, या नावांपैकी किती नोंदी दुबार होत्या, किती मतदार मृत किंवा स्थलांतरित झाले होते आणि किती पात्र नागरिकांची नावे कागदपत्रांच्या त्रुटींमुळे वगळण्यात आली, याचा स्पष्ट तपशील आयोगाने जाहीर केला पाहिजे. पश्चिम बंगालमधील अनुभवाने या प्रक्रियेतील संभाव्य त्रुटी अधिक ठळकपणे समोर आणल्या आहेत. तेथे मतदारयादीतून वगळण्यात आलेल्या नागरिकांच्या दाव्यांवर निर्णय घेण्यासाठी अपीलीय न्यायाधिकरणाची व्यवस्था करण्यात आली. प्राप्त अपिलांपैकी ९० टक्क्यांहून अधिक प्रकरणांमध्ये संबंधित व्यक्ती पात्र मतदार असल्याचे आढळून आल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यांची नावे पुन्हा मतदारयादीत समाविष्ट करण्यात आली. या माहितीतून एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो, अपील केल्यानंतर एवढ्या मोठ्या संख्येने मतदार पात्र ठरत असतील, तर सुरुवातीच्या पडताळणी प्रक्रियेत नेमका कोणत्या त्रुटी राहिल्या होत्या? इतर राज्यांमध्येही अशाच प्रकारची प्रभावी अपील व्यवस्था उपलब्ध करून दिल्यास अनेक पात्र नागरिकांना दिलासा मिळू शकतो. मतदारयादीतून नाव वगळले जाणे आणि नागरिक मतदानासाठी अपात्र असणे या दोन भिन्न बाबी आहेत. प्रशासकीय प्रक्रियेतील त्रुटी, अपूर्ण कागदपत्रे किंवा माहितीतील विसंगती यांमुळे एखाद्या व्यक्तीचे नाव वगळले गेले, म्हणून ती व्यक्ती मतदानासाठी अपात्र ठरत नाही. विशेषतः ग्रामीण भागातील गरीब, स्थलांतरित कामगार, ज्येष्ठ नागरिक आणि कागदपत्रांची उपलब्धता मर्यादित असलेल्या नागरिकांना अशा प्रक्रियेत अधिक अडचणी येऊ शकतात. त्यांच्याकडे आवश्यक पुरावे नसणे म्हणजे त्यांचा मतदानाचा अधिकारच संपुष्टात येणे नव्हे. निवडणूक आयोगाने या वास्तवाचा विचार करून प्रक्रियेतील अडचणी दूर केले पाहिजेत. सर्वोच्च न्यायालयानेही मतदारांच्या अधिकारांच्या संरक्षणाबाबत महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या निर्णयांवर नागरिकांचा विश्वास टिकून राहण्यासाठी प्रक्रियेतील पारदर्शकता, तिच्यावरील शंकांचे निरसन आणि उत्तरदायित्व अत्यावश्यक आहे. आयोगाने आपली व्यवस्था कार्यपद्धती बाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांना केवळ राजकीय आरोप म्हणून नाकारण्याऐवजी त्यांची वस्तुनिष्ठ उत्तरे दिली पाहिजेत. मतदारयादी शुद्ध करण्याची प्रक्रिया ही मतदारांना वगळण्याची स्पर्धा बनता कामा नये, किती लाख नावे वगळी झाली,यावर तिचे यश मोजण्या ऐवजी किती अचूक नोंदी तयार झाल्या आणि किती पात्र नागरिकांचा अधिकार सुरक्षित राहिला, यावर तिचे मूल्यमापन झाले पाहिजे.



दैनंदिनी

दिवाळी फराळाचे बदलते स्वरूप

दिवाळी आणि फराळ हे समीकरण असून दिवाळीची किमतही तपरी केली तरी ही फराळशिवाय पूर्ण होत नाही. दिवाळीनिमित्त प्रत्येक भारतीय घरात फराळ तयार होतो. हा दिवाळीचा फराळ देशभरात सर्वत्र तर पाठविला जातोच, शिवाय परदेशातील मराठी कुटुंबीयांकडूनही फराळाच्या पदार्थांना मागणी वाढत असून यावर्षी पुणे, मुंबई, नागपूर, दिल्ली, अहमदाबाद आदी शहरातून हजारो टन फराळ जगभरातील विविध देशांमध्ये रवाना होत आहे.

विशेष म्हणजे वंदा कुरिअर कंपनीसोबतच भारतीय पोस्ट खात्यानेही फराळ पाठवण्यासाठी विशेष सवलत योजना जाहीर केल्याने पोस्टामार्फत फराळ पाठवण्याचे प्रमाण दुपटीने वाढले आहे. यामिनाने दिवाळी फराळाची परंपरा, प्रयोजन, व्याप्ती, बदलते स्वरूप आणि आर्थिक उलाढाल याविषयी थोडक्यात...




महाराष्ट्रातील फराळामध्ये विशेषतः लाडू, चकली, करंजी, चिवडा, शेव, शंकरपाळी आणि अनारसे यांची रेलचेल असते. फराळामुळे दिवाळीची रंगत खऱ्या अर्थाने वाढते. दिवाळीमध्ये शेजारी, नातेवाईक व मित्रमंडळींना फराळाचे डबे देण्याच्या हिशोबानेच घरोघरी फराळ बनविला जातो. मात्र आता हा फराळ थेट परदेशात पाठविला जाऊ लागला आहे. परदेशातील नातेवाईक, व्यावसायिक भागीदार किंवा कंपनीच्या परदेशातील शाखेतील सहकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून हा फराळ पाठविला जातो. याकरिता मिठाई दुकानदार व फराळ तयार करणारे व्यावसायिक परदेशी पाठवण्यासाठी एअर-टाईट, व्हॅक्युम पॅक उपलब्ध करून देऊ लागले आहेत.

गेल्या काही वर्षांपासून ही जबाबदारी खासगी कुरिअर कंपन्या पार पाडत होत्या. मात्र वंदा बात एक महत्त्वाचा आणि दिलासादायक बदल झाला आहे. भारतीय डाक विभागाने दिवाळीनिमित्त देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पार्सलसाठी विशेष मोहीम राबवली आहे. कमी दरात, सुरक्षित आणि प्रत्येक तालुक्यापासून ते थेट परदेशात पोहोचणारी सेवा असल्याने, तसेच घरोघर फराळ पॅक करून घेण्याची व बुकिंगची सोय उपलब्ध करून दिल्याने सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. खाजगी कुरिअरच्या तुलनेत पोस्टाचे दर जवळपास ३० ते ४० टक्के कमी आहेत.

या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाली असून मिठाई, रेडीमेड फराळ व्यावसायिक व कुरिअर/पोस्टल कंपन्यांना मोठा व्यवसाय मिळत आहे. गेल्या काही वर्षांत बहुतेक देशांनी खाद्यपदार्थांवरील निर्बंध कमी केल्यामुळे फराळ पाठवण्याचे प्रमाण वाढले आहे. यासोबतच फराळाच्या स्वरूपातही मोठा बदल दिसतोय. वंदा बाजारात पारंपरिक फराळासोबतच आरोग्यदायी फराळाची चलती आहे. नाचणी-ज्वारीची चकली, बेक्ड करंजी, साखरेऐवजी गुळाचा वापर केलेले लाडू, शुगर-फ्री शंकरपाळी, कमी तेलातील एअर-फ्राईड चिवडा, मिलेट लाडू आणि प्रोटीनयुक्त फराळाला मोठी मागणी आहे. पूर्वी शेजारी, नातेवाईकांना फराळाऐवजी मिठाई देण्याचा पर्याय आला होता, पण कोलेस्टेरॉल आणि कॅलरीबाबत जागरूक जमाव्यात तीही शीतकपाटात पडून राहते. म्हणून आता अनेकजण ड्रायफ्रूट्स, सुकामेवा आणि आकर्षक गिफ्ट हॅम्पर्सचा पर्याय निवडत आहेत.शेवटी "कालाय तस्मै नमः" हे खरेच आहे. फराळाची माध्यमे, स्वरूप आणि पाठवण्याच्या पद्धती बदल्या तरी दिवाळीच्या फराळातील आपुलकी, प्रेम आणि आनंद मात्र आजही तसाच आहे.

■ प्रा.विजय कोष्टी

"धनत्रयोदशीच्या दिवशी सोने विकत घेण्याचा प्रघात पूर्वापार चालत आला आहे. मागील २-३ वर्षांपासून सोन्याचे भाव गगनाला भिडले असतानाही धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर सोने विकत घेणाऱ्यांमध्ये मात्र कमतरता आलेली नाही. या दिवशी सोने विकत घेतल्यामुळे वर्षभर धनलक्ष्मी आपल्या घरात वास करते असा समज आहे."



दानाचे महत्व सांगणारी धनत्रयोदशी

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी वर्षभराचा जमाखर्च ताचवा असतो.पूर्वी धनत्रयोदशीपर्यंत शिल्लक राहिलेले धन धार्मिक आणि सत्कार्यात व्यय केले जात असे त्यामुळे दान करणाऱ्याच्या घरात नेहमीच धनलक्ष्मीरूपाने वास करत असे. अर्थात कमावलेले धन कोणाकडून ओरबाडून घेतलेले किंवा अन्न कोणाच्या कष्टाचे नसावे. स्वतः मेहनत करून कमावलेले धनच फलदूय होते. पूर्वीचे राजे वर्षाच्या शेवटी आपला खजिना सत्पात्रे दान करून रिता करावचे. मंदिरांना, आश्रमांना, गुरुकुलांना, गोशाळांना आणि गरजवंतांना ते धन दान करावचे. या दानातून त्यांना अर्थातच समाधान मिळावचे. यामुळे जनता आणि राजा यांच्यातील संबंध हे कौटुंबिक स्वरूपाचे होते. राजाचा खजिना हा जनतेचा असून राजा त्याचा केवळ सांभाळ करणारा विश्वस्थ असे ही भावना त्यावेळी राजांमध्ये असे. त्यामुळे जनता कर देतांना आडकाठी न करता स्वत:हून तो राजदरबारी देत असे. त्यामुळे साहजिकच पुन्हा खजिना भरत असे. पूर्वीचे राजे हे सात्विक प्रवृत्तीचे आणि प्रजाहितदक्ष असत त्यामुळे राज्यात कधी स्वार्थ बोकाळत नसे. पूर्वीच्या राजांची तुलना आताच्या राजकारण्यांशी केल्यास आताचे बहुतांश राजकारणी हे केवळ स्वत:च्या आणि स्वत:च्या कुटुंबाच्या हिताला प्राधान्य देणारे असतात. जनतेची सेवा करण्यासाठी म्हणून निवडणूक लढवावची आणि निवडून आल्यावर मात्र त्याच जनतेकडे सोयीस्करपणे पाठ करावची. सत्तेची खुर्ची आली कि तिचा उपयोग आपली तिजोरी भरण्यासाठी करावचा. निवडणूकीत व्यय केलेला पैसा दहापटीने वसूल करावचा. जोपर्यंत खुर्ची आहे तोपर्यंत आपल्या पुढच्या कित्येक पिढ्या बसून खातील इतके धन गोळा करावचे. जनतेला स्वधन देणे सोडा पण विविध योजनांतून जनतेला सरकारी तिजोरीतून मिळणाऱ्या धनावर सुद्धा बांचा डोळा असतो.

निवडणूक जवळ आली कि महिनाभर मतदार नागरिकांचा पक्षीय राजकारणाच्या चौकटीतून पाहणे चुकीचे ठरेल, मतदारयादीतील प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव कायम राहणे हा कोणत्याही एका राजकीय पक्षाच्या फायद्याचा किंवा तोटयाचा विषय नाही. तो लोकशाहीच्या विश्वासार्हतेची संबंधित आहे. निवडणूक आयोग ही स्वतंत्र घटनात्मक संस्था आहे. तिच्या निर्णयांवर नागरिकांचा विश्वास टिकून राहण्यासाठी प्रक्रियेतील पारदर्शकता, तिच्यातील आणि उत्तरदायित्व अत्यावश्यक आहे. आयोगाने आपली व्यवस्था कार्यपद्धती बाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांना केवळ राजकीय आरोप म्हणून नाकारण्याऐवजी त्यांची वस्तुनिष्ठ उत्तरे दिली पाहिजेत. मतदारयादी शुद्ध करण्याची प्रक्रिया ही मतदारांना वगळण्याची स्पर्धा बनता कामा नये, किती लाख नावे वगळी झाली,यावर तिचे यश मोजण्या ऐवजी किती अचूक नोंदी तयार झाल्या आणि किती पात्र नागरिकांचा अधिकार सुरक्षित राहिला, यावर तिचे मूल्यमापन झाले पाहिजे.

वाचकांचा पत्रव्यवहार

जनजागृतीच्या उपक्रमात राजकारण कशासाठी?

मुंबई महापालिकेच्यावतीने कण्णात आलेला अभिनेत्री दिया मिर्झा हिचा फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाविषयी जनजागृती करणारा व्हिडीओ भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांच्या हरकतीनंतर संकेत स्थळावरून हटवण्यात आला. या प्रकाराबद्दल टीका झाल्यानंतर उच्च न्यायालयानेही नाराजी व्यक्त करत व्हिडीओ पुन्हा अपलोड करण्यास सांगितले. खरं तर फटाक्यांमुळे होणाऱ्या वायू आणि ध्वनिप्रदूषणाबाबत जनजागृती करणे हा स्तुत्य उपक्रम आहे. मात्र, त्यात राजकारण आणून या उपक्रमालाच वेगळे वळण देण्याचा भाजपचा हेतू काय? जनहिताच्या उपक्रमाला राजकीय रंग देण्याचा अधिकार नेत्यांना कोणी दिला? उच्च न्यायालयाने वेळीच दखल घेतल्याने हा व्हिडीओ पुन्हा प्रसारित होण्याचा मार्ग मोकळा झाला. मात्र, महापालिकेचा जनजागृती मोहिमेत राजकीय हस्तक्षेप करून भाजप नेते अमित साटम यांना नेमके काय साध्य करायचे होते?

■ दीपक गुंडये

दीपावलीचे महत्व मुलांना सांगा

दीपावली हा खरेतर दिव्यांचा उत्सव. सध्याच्या पिढीला मात्र याची जाण नाही. त्यामुळे दिवाळी म्हणजे फटाके फोडण्याचा उत्सव, असे समीकरण त्यात झाले आहे. फटाक्यांमुळे प्रदूषण होते. लक्ष्मी पूजनाच्या दिवशी घरसंचय करण्याची शिकवण देणाऱ्या कुबेराचीही पूजा केली जाते. आणि दुसरीकडे श्रीलक्ष्मीच्या कृपेने प्राप्त झालेले धन फटाक्यांवर उधळले जाते हा विरोधाभास आपण लक्षात कधी घेणार ? मुळात फटाके फोडणे ही आपली संस्कृतीच नव्हे,मग तिचे पोषण आपण का करावे ? दीपावली सणामागील शास्त्र लक्षात घेऊन ते आतापासूनच मुलांवर बिंबवणे आणि दीपावली सणाला आलेली फटाक्यांची काजळी दूर करून तिचे मूळ स्वरूप तिला मिळवून देणे ही आपलीच जबाबदारी आहे.


■ सौ.मोक्षदा घाणेकर

गोकुळच्या सत्तासंघर्षात सरकारचा नवीन डाव

गेल्या सहा महिन्यांपासून गोकुळच्या विषय घेऊन रणकंदन माजले असताना नुकताच पार पडलेल्या निवडणुकीत समविचारी आघाडीला अर्थात बंटी पाटील गटाला २५ पैकी १३ जागांवर स्पष्ट बहुमत देवून विजयाचा कौल ठाय धारकांनी दिला. या उलट महादुलीला १२ जागांवर समाधान मानावे लागले असताना फक्त आणि फक्त सतेच्या खुर्चीसाठी न्यायालयीन प्रक्रिया, आतातर ५ शासननियुक्त संचालकांची निवड करुन ४ संचालकांना मतदानाचा अधिकारही दिल्याचे बोलले जात आहे महाराष्ट्रातील ज्या सहकारी संस्थांची वार्षिक उलाढाल ५०० कोटींहून अधिक आहे अशा संस्थांच्या समित्यावर सरकारकडून नामनिर्देशित पाच सदस्यांची नियुक्ती करन चौथाना मतदानाचा अधिकार मिळणार आहे.त्यामुळे सरकारने घेतलेला हा अजब निर्णय चुकीचा पायंडा आहे.म्हणे बहुमत असताना सरकारला असली उठाठेव कशाला पाहिजे. सतेसाठी महायुती कोणत्या थराला जाऊ शकते हे गोकुळ राजकारणावरुन पुन्हा एकदा विशेष करुन भाजपाचा अजेंडा अधोरेखित झाला असला तरी गोकुळ सतेच्या झेपोटी पडलेल्या ठिणगीची धग कुठेपर्यंत पोहोचेल हे सांगणे आता मोठे कठीण बनले आहे. कोल्हापूर जिल्ह्याची अर्थवाहिनी असलेला कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळ ज्याची वार्षिक उलाढाल ४ हजार कोटींच्याघर आहे. येथे येऊअमन निवड करण्यासाठी झालेला महायुतीचा गदारोळ आणि या गदारोळाला स्वत: सीएम फडणवीस खुतपाणी घालत आहेत हा नियम लोकशाहीला मारक तर असून सहकाराची विल्हेवाट लावणारा आहे.काँग्रेसचे विधानपरिषद गटनेते सतेज पाटील यांच्याकडे बहुमत असताना ज्यांनी घरावर तुळशीपत्र ठेवून संघ नावारूपाला आणला त्यांच्या मुलाला अर्थात समविचारी आघाडीला अध्यक्ष पदापासून दूर ठेवण्यासाठी सरकारने खेळलेला नवीन डाव बंटी पाटील उघडून लावणार का ?यात यशस्वी होणार कां? ते पहाणे मोठे औत्सुक्याचे ठरणार आहे.

■ राजू जाधव

दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)



शुक्रवार,ता.६.११.२०२६, विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभवनाम संवत्सरे, दक्षिणायने, शरद ऋतो, अश्विन मासे, कृष्ण पक्षे, द्वादशी तिथी,१०.३१ नंतर त्रयोदशी तिथी,हस्त नक्षत्र,२८.४४ नंतर चित्रा नक्षत्र, वज्र योग, कन्या रास, विष्कंभ योग, २८.११ नंतर प्रिती योग, तैतिल करण १०.३१ नंतर, गरज करण २२.३७ पर्यंत, दिनमान ११.२१, सुर्योदय ६.३६, सुर्यास्त १७.५७ (कोल्हापूरचे), राहू काळ दुपारी १०.३० ते १२,गुरू द्वादशी,नृसिंहवाडी यात्रा प्रदोष धनत्रयोदशी धन्वंतरी जन्म, ब्रह्मपूजा,यमास दिपदान, स.१०.३० पर्यंत सर्व कामे शुभ.

–ज्योःकेशव पेटकर महाराज–९६०४७०९१५९

✻ राशीभविष्य

मेष– बुद्धीला पटेल तोच निर्णय घ्या. संमिश्र घटनांचा दिवस. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. ओळखीच्या लोकांकडून फायदा होईल. दिवस चांगला जाईल.

वृषभ– आरोग्यात सुधारणा संभवते. मुलांच्या उत्कर्षाचा काळ. व्यापाऱ्यांनी अधिक मेहनत घ्यावी. सरकारी कर्मचाऱ्यांचे मतभेद होऊ शकतात.उगाचच वादात अडकू नका.

मिथुन– नवीन संधी दार ठोठावेल. लाभदायक दिवस. शेअर बाजारातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल. धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे.अनोळखी व्यक्तींशी व्यवहार टाळावेत.

कर्क– अधिकाराचा अति वापर टाळावा. दिवसभर कामात व्यस्त राहाल. कौटुंबिक जबाबदारीत वाढ होईल. आत्मसंयम राखा. वैचारिक दिशा बदलून पहावी.

सिंह– कौटुंबिक सौख्याचा समतोल राखावा. कलाक्षेत्राबाबत अपेक्षित वार्ता मिळतील. हित शत्रू त्रास देण्याचा प्रयत्न करतील. मनातील अनामिक भीती काढून टाकावी.

कन्या– कोणतीही गुंतवणूक सावधगिरीनेच करावी. आवक आणि जावक यांचा मेळ घालावा. वाहन चालवताना काळजी घ्यावी. रागावर नियंत्रण ठेवा. समोरील गोष्टीत अनंद शोधावा.

तुळ– कामाची दिवसभर धांदल राहील. वरिष्ठांकडून कामाचे कौतुक केले जाईल. एखादी घटना मन विचलीत करू शकते. इच्छा नसताना सुद्धा प्रवास करावा लागू शकतो.

वृश्चिक– लोकांवर अवलंबून राहू नका.पुढे ढकललेले काम हाती घ्या.मानसिक संतुलन राखावे. मनातील निराशाजनक विचार काढून टाकावेत.

धनु– दुरदृष्टी ठेवून विचार करावा. योग्य नियोजनावर भर द्यावा. शक्यतो आपल्या मुद्द्यावर ठाम रहा. कुटुंबातील सदस्यांची साथ लाभेल.व्यवहारात निष्काळजीपणा करू नका.

मकर– जोडीदाराच्या सावीने मनोकामना पूर्ण करा. व्यवसायात अति विश्वास ठेऊ नका. जुन्या गोष्टी उगाळत बसू नका. कामातील उत्साह वाढीस लागेल. दिवस धावपळीत जाईल.

कुंभ– फसवणुकीपासून सावध राहावे. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये. वडीलधाऱ्यांचा योग्य तो मान राखावा. आवडीच्या वस्तू खरेदी कराल. मानसिक शांतता जपावी.

मीन– कामात मित्रांचा सल्ला घ्याल. अति मसालेदार पदार्थ खाणे टाळावे. वैचारिक समतोल साधावा. उत्साहाने कामे हाती घ्यावीत. वैचारिक जीवन उत्तम राहील.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मॅंचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४२६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३५. संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे – दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड –दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली – दूरध्वनी क्र.२३७३७५.,० कोल्हापूर – दूरध्वनी क्र. २५४५४०१ , गडहिंग्लज – दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्र.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

खाजगी बसचालकांकडून मनमानी भाडेवाढ

प्रवाशांतून संताप;एसटी महामंडळाने अधिक बस फेऱ्या सुरु करण्याची मागणी

बेळगाव,ता.५-

दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे बेळगावमधून पुणे, मुंबई, बेंगळूर, हैदराबाद, मंगळूर दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. या परिस्थितीचा फायदा घेत येथील खासगी आराम बस व्यावसायिकांनी मनमानी भाडेवाढ केली असून प्रवाशांना अधिकचे पैसे मोजावे लागत आहेत. वाढलेल्या दरांमुळे प्रवाशांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. तिकिट दरवाढीवर प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण नाही का? असा सवाल प्रवाशांतून उपस्थित केला जात आहे.

वाहतूक प्रवाशांमुळे मुंबई-बेळगाव, पुणे-बेळगाव, बेंगळूर-



बेळगाव, हैदराबाद-बेळगाव, मंगळूर-बेळगाव या मार्गावरील खासगी ट्रॅव्हल्सच्या दरात मोठी वाढ झाली आहे. याच परिस्थितीत रेल्वेचे तिकीट बुकिंग फुल्ल झाले असून परिवहन मंडळाने अतिरिक्त आराम बससेवाही सुरू केलेली नाही. यामुळे नागरिकांना अधिक पैसे खर्च करून प्रवास करावा लागत आहे.

सध्या अनेक रेल्वेंमध्ये वेटिंग लिस्ट (प्रतीक्षा यादी) देखील संपली आहे. ऐनवेळी प्रवास करणे गरजेचे असलेल्या विद्यार्थी आणि नागरिकांना रेल्वेचे तिकीट मिळेनासे झाले आहे. परिणामी प्रवाशांसमोर केवळ खासगी बससेवा पर्याय उरला आहे.

या संधीचा फायदा घेत खासगी ट्रॅव्हल्स चालकांनी प्रतितिकीट दरात मनमानी वाढ केली आहे. बेळगाव ते पुणे सामान्यत: ६०० ते ९०० रुपयांपर्यंत असणारे बसचे तिकीट सध्या हेच दर वाढवून थेट १५०० ते २००० रुपयांपर्यंत वसूल केले जात आहेत.

प्रवासासाठी तिप्पट ते चौपट खर्च करावा लागत असल्याने सर्वसामान्य प्रवाशांचे बजेट पूर्णपणे कोलमडले आहे.प्रवाशांची ही आर्थिक लूट थांबवण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) तातडीने हस्तक्षेप करावा आणि खासगी बसचालकांच्या मनमानी दरांवर अंकुश ठेवावा, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच बेळगाव-पुणे, मुंबई- बेंगळूर मार्गावर जादा रेल्वे किंवा एसटी महामंडळाच्या अतिरिक्त बसेस सोडण्यात याव्यात, अशी मागणी होत आहे.

बेळगावमधील तिकिटांचे दर

शहर	पूर्वीचे दर	आताचे दर
पुणे	६०० ते ९००	१२०० ते २०००
मुंबई	१००० ते १८००	१५०० ते २७००
बेंगळूर	८०० ते १५००	१००० ते १८००
हैदराबाद	१२०० ते २०००	१८०० ते ३०००

हिवाळी अधिवेशनाची तयारी करा-शिंदे

बेळगाव,ता.५-

आगामी हिवाळी अधिवेशन यशस्वी व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच तयारीला गती द्यावी. अधिवेशनासाठी स्थापन करण्यात आलेल्या विविध समित्या व उपसमित्यांनी परस्पर समन्वय राखून जबाबदारीने काम करावे. कोणत्याही व्यवस्थेत त्रुटी राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश प्रभारी जिल्हाधिकारी तथा जि. पं. सीईओ राहुल शिंदे यांनी दिले.

बुधवारी जिल्हा पंचायत सभागृहात हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित विविध समित्यांच्या प्राथमिक बैठकीत ते बोलत होते. शिंदे म्हणाले, अधिवेशनासाठी बेळगावात येणारे मंत्री, लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवास आणि भोजन व्यवस्थेचे योग्य नियोजन करण्यात यावे. यासाठी शहरातील



बेळगाव-जि.पं. सभागृहातील हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वतयारी बैठकीप्रसंगी बोलताना प्रभारी जिल्हाधिकारी राहुल शिंदे.

हॉटेल्समधील खोल्या आगाऊ आरक्षित करून आवश्यक व्यवस्था वेळेत पूर्ण करायी, असे त्यांनी स्पष्ट केले.

सुवर्णविधानसौधमधील मंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कक्षांमध्ये संगणक यंत्रणा आधीच बसवून ती व्यवस्थित कार्यरत असल्याची खात्री करावी. तसेच अधिवेशनाच्या संपूर्ण कालावधीत इंटरनेट सेवा अखंडित सुरू राहण्यासाठी संबंधित संस्थांशी तातडीने समन्वय साधावा. अधिवेशनासाठी येणारे मंत्री, मान्यवर, अधिकारी व माध्यम प्रतिनिधींच्या निवासस्थानी आपत्कालीन वैद्यकीय पथके तैनात ठेवावीत. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध होईल, अशाप्रकारीने आरोग्य यंत्रणेने सज्ज राहावे, असेही त्यांनी सांगितले.प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपापली जबाबदारी ओळखून काम करणे आवश्यक आहे,अशी सुचनाही शिंदे यांनी दिली. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी विजयकुमार होनकेरी, प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी रोहित सिंग, काडा प्रशासक एस. एस. बिरादार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



मुदाळ महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.वसंत हंकारे.

जीवनात आई-वडिलांचे महत्त्व अनन्यसाधारण-प्रा.हंकारे

मुदाळतिट्टा,ता.५(प्रतिनिधी)-

आई वडिलांना विस्कटू नका. कष्टकरी बापाला मान खाली घालायला लागू नये असे कृत्य करू नका.बापाला जिवंतपणे जाळू नका.जीवनात आई-वडिलांचे महत्व अनन्यसाधारण आहे,असे प्रतिपादन प्रसिध्द व्याख्याते प्रा.वसंत हंकारे यांनी केले.

ते मुदाळ (ता भुदरगड) येथील प.बा.पाटील माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात आई वडील समजून घेताना या विषयावर वसंत हंकारे बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनियुक्त सरपंच राजनंदिनी पाटील उपस्थित होत्या. तर शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष गंगाराम पाटील, टी.एम.रेडेकर, एम.के.पाटील व प्रा.एन.एच.पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.स्वागत व प्रास्ताविक उपमुख्याध्यापक टी.एम.रेडेकर यांनी केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. सुत्रसंचलन ए.डी.पाटील, आर.डी.हुजरे यांनी केले तर आभार एम.के.पाटील यांनी मानले.

माणकापूर पाटील मळ्यात पुन्हा आढळले मगरीचे पिल्लू

ढोणेवाडी,ता.५(प्रतिनिधी)-

माणकापूर (ता.निपाणी) येथील पाटील मळा परिसरात मगरीचे एक पिल्ल आढळून आल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जवळच असलेल्या पंचगंगा नदीसह या परिसरात मगरींचा वावर आढळून आला होता. त्यामुळे सध्या आढळलेल्या एका पिल्लासोबतच आणखी ३० ते ४० पिल्ले असण्याची शक्यता स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर वनविभागाने तातडीने व्यापक शोधमोहीम राबवून मगरींच्या पिल्लांचा शोध घ्यावा आणि परिसरातील नागरिकांना भयमुक्त करावे, अशी मागणी होत आहे. माणकापूर परिसरात मगरीचा वावर नवीन नाही.२० सप्टेंबर २०२५ रोजी पाटील मळ्यातील



माणकापूर : येथील पाटील मळ्यात सापडलेले मगरीचे पिल्लू.

विहिरीत वास्तव्यास असलेल्या सुमारे साडेसात फूट लांबीच्या मगरीला स्थानिक युवक आणि जवसिगपूर येथील वाईल्ड लाईफ कंझर्वेशन रेस्क्यू टीमने पकडून वनविभागाच्या ताब्यात दिले होते. त्यावेळी जवळपास पंधरा दिवस या मगरीचा शोध सुरू होता. पुराचे पाणी ओसरल्यानंतर मगर विहिरीत आढळून आली होती.

तसेच, ९ मे २०२३ रोजी सदलगा-दत्तवाड रस्त्यालगत सदलगा येथील तरुणांनी सुमारे आठ फूट लांबीची मगर पकडून वनविभागाच्या ताब्यात दिली होती. याशिवाय, दोन वर्षांपूर्वी सदलगा परिसरात मगरीची सुमारे ३० पिल्ले आढळून आली होती.

दरम्यान, १० मे २०२५ रोजी सदलगा येथील दूधगंगा नदीच्या काठी परिसरात पोहण्यासाठी गेलेल्या महादेव खुरे (वय ७२) यांना मगरीने ओढून नेल्याने त्यांचा मृत्यू झाला होता. या घटनेमुळे नदीकाठच्या गावांमध्ये मगरींच्या वावराचा प्रश्न अधिक गंभीर बनला होता.या सर्व घटनांचा विचार करता मालकापूर-पाटील मळा आणि सदलगा, भोज, कारदगा परिसरातील दूधगंगा नदीकाठच्या भागात मगरींच्या वावराबाबत वनविभागाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. सध्या आढळलेल्या पिल्लाचा शोध घेऊन थांबण्याऐवजी परिसरातील विहिरी, नदीकाठचा भाग, शेतातील पाणवठे आणि संभाव्य अधिवासाची तपासणी करावी. आणखी मगरींची पिल्ले असल्यास त्यांचा शोध घेऊन योग्य ती व्यवस्था करावी. भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडण्यापूर्वी वनविभागाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा शेतकरी व नागरिकांतून व्यक्त होत आहे.



चिकोडी:येथे कार्यक्रमाचे उद्घाटन करताना श्रीशैल्य कोल्हार, चंद्रशेखर चिनकेकर, विमला चिनकेकर व इतर.

पालकांनी मुलांवर अनावश्यक दबाव आणू नये-कोल्हार

चिकोडी,ता.५(प्रतिनिधी)-

मुलांच्या हक्कांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.मुलांचे भविष्य घडविण्याच्या प्रयत्नात पालकांनी त्यांच्यावर अनावश्यक दबाव आणू नये, असे प्रतिपादन कोंडीत येथील शासकीय पदवीपूर्व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य श्रीशैल्य कोल्हार यांनी केले.

चिकोडीत येथील शासकीय पदवीपूर्व महाविद्यालयात उन्नती स्वयंसेवी संस्था, चिकोडी आणि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'बचपन सुरक्षा सप्ताह' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रशेखर चिनकेकर उपस्थित होते. यावेळी 'मुलांचे बालपण किती अनमोल आहे' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली.कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी गावातील प्रमुख रस्त्यांवरून जनजागृती फेरी काढली. मुलांच्या हक्कांच्या संरक्षणाबाबत घोषणा देत नागरिकांमध्ये जागृती करण्यात आली. यावेळी प्राध्यापक राजश्री पाटील, कविता मलाबन्नवर, संजीव माने, अनिल बाने, उन्नती संस्थेच्या सचिव विमला चिनकेकर, लक्ष्मी हत्तरकी, भूमिका कांबळे, अनुराधा वहर, दीपा चौगुले, प्रतिभा वल्लाळ आदी उपस्थित होते.

शिष्यवृत्ती सराव परीक्षांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होणार

अशोक घुगे यांचा विश्वास

गारगोटी ता ५(प्रतिनिधी)

शिष्यवृत्ती सराव परीक्षांमुळे विद्यार्थ्यांना अंतिम शिष्यवृत्ती परीक्षेचा प्रभावी सराव मिळून त्यांच्या गुणवत्तेत निश्चितच वाढ होणार आहे.या उपक्रमामुळे कोल्हापूर जिल्हातील शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांची संख्या वाढण्यास मोलाची मदत होईल,असा विश्वास प्राथमिक शिक्षणाधिकारी अशोक घुगे यांनी व्यक्त केला.

शिक्षण विभाग, पंचायत समिती यांच्या वतीने आयोजित शिष्यवृत्ती सराव परीक्षेच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.कन्या व कुमार विद्यामंदिर, कोगे येथे नुकताच हा शुभारंभ सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



कोगे: शिष्यवृत्ती परीक्षा शुभारंभ प्रसंगी प्राथमिक शिक्षणाधिकारी अशोक घुगे,प्रसाद पाटील,मनीषा सपाटे व इतर

गटशिक्षणाधिकारी अर्चना पाथरे होत्या.

शिक्षण विस्तार अधिकारी प्रकाश आंडे यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.या सराव परीक्षेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. इयत्ता चौथीचे ३ हजार ४२६ विद्यार्थी २० परीक्षा केंद्रांवर, तर इयत्ता सातवीचे ३ हजार २४६ विद्यार्थी १९ परीक्षा केंद्रांवर परीक्षेला बसले होते. अशा प्रकारेएकूण ६ हजार ६७२ विद्यार्थ्यांनी या सराव परीक्षेत सहभाग नोंदविला.

दरम्यान, परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणारे आयोजक प्रसाद हिंदुराव पाटील व सुरेश गुंडू कोळी यांचा अशोक घुगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास केंद्रप्रमुख मनीषा सपाटे, राजेंद्रबा थोरबोले, प्रसाद पाटील, सुकुमार मानकर, श्रीकांत टिपुगडे, धनाजी सासणे, उत्तम पाटील,दिलकर पंरीट, मुख्या. शिवाजी बागडी, मुख्या.विकास सातवेकर, संदीप पाटील, तानाजी पाटील,शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.

पट्टणकोडोली परिसरात वसुबारस दिन साजरा

पट्टणकोडोली,ता.५(प्रतिनिधी)-

येथील श्री गणेश सहकारी दुध व्यावसायिक सहकारी संस्था मर्यादित पट्टणकोडोली-अलाटवाडी या संस्थेतर्फे दीपावली सणाचा पहिला दिवस वसुबारस दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. बाळाबाई शिंदे, संगीता पणदे व जयश्री रोंगे यांच्या गाय-वासरुचे विधीवत पूजन शिरीष देसाई व सरोज देसाई यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी गाईला डाळ व गुळाचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. याप्रसंगी सुवासिनी महिलांनीही गोमातेचे पूजन करुन ओक्षण केले.

यावेळी सतिश देसाई, तानाजी शिंदे, सुधाकर पोवार, विजय तोडकर, संतोष सुर्यवंशी, धुळ्याँड्या मोठे, दादासो शिरगुप्पे, प्रविण पाटील, आनंदा निकम, मधुकर मोरे, प्रकाश खटकोळे, रमेश रजपूत, मारुती कदम, जरद लडे, हंचिनाळ येथे कृषी मंत्रा शेती सेवा केंद्राचे उद्घाटन

कोगनोळी,ता.५(प्रतिनिधी)-

हंचिनाळ के.एस (ता. निपाणी) येथे कृषी मंत्रा शेती सेवा केंद्राचे उद्घाटन आडी येथील श्री दत्त देवस्थान मठाचे मठाधिपती प.पू.परमात्मराज महाराज यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आम.शशिकला जोल्ल,तर प्रमुख पाहुणे म्हणून हालसुगरचे संचालक एम.पी.पाटील, उद्योजक प्रविणभाई शाह, कोल्हापूर ईबीसी प्रबंधक अक्षय मडके, हालसुगरचे ऊस विकास अधिकारी विश्वजीत पाटील, राकेश चिंचणे, सदाशिव जनवाडे, पोष्ट मगदूम आदी मान्यवर उपस्थित होते.केजव पाटील यांनी स्वागत ता आर.एल.चौगुले यांनी प्रास्ताविक केले.यावेळी विशाल जवडे, रमेश पाटील, संजय मुरगुडे, रमेश भिवसे, पी.टी.पाटील, सिद्धू नारटे, यांच्यासह मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.



पट्टणकोडोली येथे दिव्यांगांना भेटवस्तूंचे वितरण करताना डॉ.कृष्णाजी मसुरकर, यशश्री मसुरकर व मान्यवर.

पट्टणकोडोली येथील दिव्यांगांना भेटवस्तूंचे वितरण

पट्टणकोडोली,ता.५(प्रतिनिधी)-

पट्टणकोडोली (ता.हातकणंगले) येथील सुमारे २०० दिव्यांग बंधू-भगिनींना स्व.पुष्पादेवी मसुरकर सोशल फाऊंडेशनतर्फे दिवाळीनिमित्त भेटवस्तूंचे वितरण शिवसेना तालुका प्रमुख डॉ.कृष्णाजी मसुरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रारंभी फाऊंडेशनच्या अध्यक्षा यशश्री मसुरकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.यावेळी सुनिल जाधव, शिवाजी वाळाई, पुरा देवर्षी,तानाजी गिराई आदी मान्यवरांसह दिव्यांग बांधव उपस्थित होते.

बानगे येथे महायुती सरकारच्या पुतळ्याचे दहन करून निषेध

गोकुळ दूध संघातील निर्णयावरून दुध उत्पादकांची नाराजी; ऊस दरवाढीच्या प्रश्नावर सरकारला घेरले

मुरगूड,ता.५(प्रतिनिधी)-

गोकुळ दूध संघाच्या संदर्भात सरकारने घेतलेली भूमिका आणि ऊस दरवाढीच्या मागणीवर ठोस निर्णय न घेतल्याने महायुती सरकारविरोधात बानगे (ता. कागल) येथे तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. वसुबारसनिमित्त गायींचे पूजन करून या आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर निषेध सभा घेऊन महायुती सरकारच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

महायुती सरकारच्या धोरणांमुळे शेतकरी आणि दूध उत्पादकांचे नुकसान होत असल्याचा आरोप यावेळी



बानगे येथे महायुती सरकारच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करून सरकारचा निषेध करताना शेतकरी,दुध उत्पादक व ग्रामस्थ.

करण्यात आला. गोकुळ दूध संघाच्या बाबतीत सरकारने तातडीने निर्णय घेतला; मात्र गेल्या तीन दिवसांपासून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली ऊस दरवाढीसाठी आंदोलन सुरू असतानाही शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत सरकार निर्णय का घेत नाही, असा सवाल उपस्थित करण्यात आला.

गोकुळच्या बाबतीत इतक्या तत्परतेने निर्णय घेतला जात असेल, तर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही सरकारने तितक्याच तत्परतेने निर्णय घ्यावा.सरकारची ही भूमिका अन्यायकारक असून तिचा जेवढा निषेध करावा तेवढा कमीच आहे, अशी भावना उपस्थित वक्त्यांनी व्यक्त केली. या निर्णयाचे पडसाद संपूर्ण जिल्हात उमटतील आणि आगामी निवडणुकांमध्ये महायुतीला त्याची राजकीय किंमत मोजावी लागेल,असा इशाराही दुध उत्पादकांनी दिला.

विशेष म्हणजे, महायुतीला मतदान केलेल्या ठरावधारकांनीही या आंदोलनात सहभागी होत सरकारच्या भूमिकेबद्दल नाराजी व्यक्त केली.त्यामुळे या आंदोलनाला वेगळे महत्त्व प्राप्त झाले. यावेळी महायुतीचे ठरावधारक व माजी सरपंच चंद्रशेखर सावंत, रमेश पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते शिवाजी जेलार, विनिता पाटील आणि सामाजिक कार्यकर्ते विनायक पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.या निषेध आंदोलनात बानगे गावातील दुध उत्पादक, शेतकरी आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

संकेश्वरमध्ये मराठा समाजातील महिलांना शिलाई मशीनचे वितरण

संकेश्वर,ता.५(प्रतिनिधी)-

मागासवर्गीय अभिवृद्धी निगम व कर्नाटक मराठा समुदाय अभिवृद्धी निगमतर्फे संकेश्वर मराठा समाजातील ७१ महिलांना शिलाई मशीनचे वितरण करण्यात आले.या शिलाई मशीनचा सदुपयोग महिलांनी करुन व्यायला हवे असल्याचे आम.निखिल कत्ती यांनी सांगितले.ते संकेश्वर विश्रामधाम येथे वितरण कार्यक्रमात बोलत होते.

स्वागत माजी नगरसेवक दिपक भिसे यांनी केले.प्रास्ताविक शिक्षिका शशिकला मोरे यांनी केले.यावेळी निगम सहाय्यक अभिवृद्धी अधिकारी कुमार मगदूम, हुक्केरी विद्युत संघाचे संचालक गजानन मुडशी, माजी नगरसेवक सुमील पर्वतराव, राहुल भोपळे, बंडू सुर्यवंशी, अप्पा मोरे, संदीप दवडते, हाफण मुल्ला, गंगाराम भुसगोळ, विजय जळळी, पांडुरंग डावरे, लक्ष्मी पोवार, अंजना सावंत, रोहिणी नार्वेकर, रेणुका पोवारसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.आभार शशिकला मोरे यांनी मानले.

पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

※ खरेदी विक्री ※

इचलकरंजीपासून जवळ
घोसरवाड हद्दीमध्ये दोन एकर बागायत शेतजमीन विकणे आहे. रोडटच. मो. ८५५४९८४५६३.

चावनगेड बाजजीवा कंपनीचे २३० सीएचचे ८ एअरजेट लूम विकणे आहेत. मो. ९८२२३९९९१९.

घर विकणे जवळ नगरपालिका येथे १२०० स्क्वे.फूट जागेमध्ये व खोतवाडी येथे १००० स्क्वे.फूट जागेमध्ये दुमजली घर.मो. ९९२२८०२८८३, ९८४९६८९२६७.

VMC
मशीनवर जॉब वर्क तसेच फॅब्रिकेशन जॉब वर्क देणे. संपर्क : हंजे उद्योग, सांगली
7720001119

प्लॉट विकणे कर्ड-गार्नेनगर येथील २ गुंठेचा एनए प्लॉट ४० बाय ५० कंपौडसह विकणे. मो.९४२२०३२०९९.

दिवाळी ऑफर ३३ लाख ५१ हजार मध्ये मिळवा. नवीन २ बीएचके फ्लॅट, सांगली रोडला. संपर्क- निर्माणा रिअलटर्स, मो. ९३७०२३३०८८, ९३७०९७३०१

माणगावपुरत एनए डिजीटल प्लॉट विकणे आहे. कायदेशी सोय. मो. ९३७०८९००८, ९८९०७२७१८८.

किड्स वेअर बँक प्रिंट टी शर्ट, फेन्सी शर्टस्, बेबी, मॉमचिट, जीन्स, फॉरमल पँट, भरपूर व्हरायटी होलसेल दरात. शांती शर्टस्ट, मुरत चिमणिदर चव्हाण, इचलकरंजी. मो. ७०२०१५५७६५.

दिपावली धमाका शिवन मॉडयुलर असंख्य व्हरायटीज, वार्डरोब, लॉफ्ट डोअर ग्लास, वॉल, केबिनेट सर्व. होम फर्निचर शिवाय जुन्या ट्रॉलीस योग्य परताव्या. कोन करा. ९८२२२४३६९३.

घर विकणे आहे. ६० फुटी रोडटच संजय फौंड्रीजवळ, साई समर्थ नगर येथे दोन दुकानगाळे व सहा खोल्या व रिकामी जागा (दोन गुंठे) विकणे आहे. ८४८४८८९५१७, इचलकरंजी.

थालू स्थितीत ८ टनी स्टीम बॉयलर विकणे आहे. लक्ष्मी औद्योगिक वसाहत, हातपक्षगल्ले, मो. ९४९५२८५८५.

प्लॉट विकणे १ बीएचके यद्वार फाटा, सोसयटी फर्निचरच्या मागे, समरिसटी अपार्टमेंट, ए विंग, ३ रा मजला, मो. ९९७०७७६९२०.

प्लॉट विकणे कोरोची स्टॅण्डच्या पुर्वेस व यळवाडा पश्चिमेस एनए ७२ बाय ४५ चा प्लॉट ३० फुटी रोडटच विकणे आहे. मो. ९७६७२५२२८८.

जुने व नवीन पॉवरलूम शेड्, व टेरू, तसेच फवारा, कांडी मशिन, डस्टींग व रिकामे बिमे देवू व घेवू. मो. ८३१०२९९००८.

दिपावलीच्या शुभ मूहूर्तावर आपल्या हक्काच्या घरावर स्वप्न साकार करा लक्ष्मी विष्णू रेसिडेन्सीमध्ये फ्लॅट कुर्डीगळी सुपणंसदी. पत्ता- लक्ष्मी विष्णू रेसिडेन्सी, भारतमाता हौसिंग सोसायटी जवळ, स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ८८०५८०००९९, ९५५२५१८३७६.

२ बीएचके फ्लॅट रेडी पझेशन विठोबाशी उपलब्ध. २४ तास पाणी, लिफ्ट कर्जाची सोय. स्वामी समर्थ पलाझा, जवाहरनगर, इचलकरंजी. ८७६८७८३९२२

प्रॉपर्टी कार्ड असलेला १०७० स्क्वे.फूट जागेवरील आरसीसी बंगला विकणे आहे. कबनूर, डॉ. आंबेडकर चौक. एन्ट्रट क्समस्, वायंकी - ९४२०९७९२९८.

छोटी जाहिरात मोठा प्रतिसाद

※ नोकरी विषयक ※

हायळ सुप एअरजेट मुव्हिट आयार काटा रूई/चंदूर येथे १ हेल्पर जागा भरणे आहे. मो. ८१७५०१८९८७, ९६३७५८८६७९.

दिवाळीनंतर कापड दुकानात कामासाती स्टाफ पाहिजे आहे. हुशार, अनुभवी, शिकाऊ, हेल्पर वेगवेगळ्या कॅटगरी आहेत. वयाची अट नाही. श्रीराम टेरिंग सेंटर, इचलकरंजी. ९८२३५८७१८८.

नामवंत हेल्दा इन्हुरन्सा कंपनीकरीता मॅनेजर नेमायचे आहे. पगार याच लाखवर्षात. अनुभवी, हुशार, पदवीधर पाहिजे. मो. ९३७१३५११४२.

Airjet loom Unit साठी अनुभवी Diवाणजी Beam Gatting Weaver, Account व Yarn Software Operator लागणार. अर्जासह भेट द्या. मो. ९९२२१९२४८२.

कारखान्यानध्ये ऑफीसबॉय पाहिजे. घेटाघेची ढेक १० ते २, गट नं. ६६०, कृष्णा नगर, सूर्यवंशी टेक्सटाईल जवळ, तारळगे.

नक्षत्र सोल्यूशन्सतर्फे Tally व Odoo ERP चे व्यावसायिक आणि प्रात्यक्षिक प्रशिक्षण उपलब्ध. Tally व Odoo ERP प्रशिक्षणावर ४० टक्के सवलत. प्रशिक्षणाची वैशिष्ट्ये: Tally व Odoo ERP चे व्यावसायिक प्रशिक्षण - १५+ ERP मॉड्यूल्सचे प्रात्यक्षिक ज्ञान. उद्योगानुसार प्रशिक्षण व त्यांचे मार्गदर्शन. बॅच सुरू- १५ नोव्हेंबर २०६, प्रवेश मर्यादित - फक्त २० विद्यार्थी, प्रशिक्षणशोधत नोकरीची संधी. आजच प्रवेश निश्चित करा. मो. ८४४६९९६१६८, ९०९६३८६१६८.

पाहिजेत सेल्स एक्झीक्युटीव्ह. अनुभव ० ते ५ वर्षे, ईकॉमर्सची संधी. मो. ८४४६९९६१६८, ९०९६३८६१६८.

अकौंटंट पाहिजेत कापड दुकानात कामासाती लेडीज अकौंटंट पाहिजे. मो. ८४०७१५५५४६ इचलकरंजी.

सकाळी ९ ते संध्याकाळी ७ पर्यंत घरकाम व स्वयंपाकाकरीता लेडीज पाहिजे. फोन करून वेळ भेटणे. मो. ८२९९५८१११११, पत्ता- विकास नगर, डेकन्न मिल रेशन दुकानजवळ, स्टेशन रोड, इचलकरंजी.

इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम, पेट्रोल, डिझेल सोडणेकरीता शिकाऊ/अनुभवी महिला/पुरुष पाहिजेत. कलानगर, चंदूर रोड, मो. ९९७०७७६४६४.

सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. शहापूर, खंजिरे, शाहू पुतळा, लक्ष्मी इंडस्ट्रीज, तारदाळ. ड्युटी ८ तास, १२- पगार १०,००० ते १५०००. मो. ९२८४०२३२६६.

हॉस्टेलमध्ये काम करण्याकरीता रेक्टर पाहिजे. तसेच मल्टिपर्पज हॉलमध्ये मॅनेजमेंटसाठी कामगार पाहिजे.आकर्षक पगार. मो. ९८५०००२०२९८.

पाहिजेत सीएमएम ऑपरेटर व अकौंटट अनुभवी संपर्क- स्वस्तिक इंजिनिअर्स, यद्वार. मो. ८३२९४१४९१२.

गाडी वॉशिंग व रिसिंसाठी अनुभवी व शिकाऊ कामगार पाहिजेत. मो. ९९२२४९९३२२.

होलसेल मेडिकलमध्ये कामासाती स्टाफची मॅनेजर करणे आहे. अनुभवी व्यवसीस प्राधान्य. १) बिलिंग, स्टॉक चेकींग, पॅकींग कामासाती लेडीज-४ जागा २) ऑर्डर बुकींगसाती जेन्टस्- ४ जागा ३) स्टॉक डिलिव्हरी साती गोडाऊनमधील कामासाती जेन्टस्- ४ जागा, पीएफ+ईएसआयसी सुविधा. संपर्क- संजय मेडिकल्स, भोने माळ, एएसबी कॉलेज जवळ, मेपट्रल हॉटेल शेजारी, इचलकरंजी. मो. ९७३००८५१७७.

पाहिजेत लेहर मशिन ऑपरेटर व सिटमेटल मिस्त्री, सीओ २/ऑलेन वेल्डर, हेल्पर सी/पुरूष, विशाल इंडस्ट्रीज, खोतवाडी, मो. ९१४६७८९६५८, ८९९९५०००७३.

जोंडी एक्सक्लुझीव्ह स्टोअर इचलकरंजी, उदयगीक पगारासह खालील जागांची भरती सुरू आहे. १) सेल्समन-२ जागा २) सेल्सगर्ल-२ जागा ३) हाऊसकिपिंग स्टाफ-१ जागा. संपर्क- ७२४९८४३२५६, ९५०३५२१७०४, अमृत प्लाझा, जयहिंद मंडळ डाकडर समोर, बस स्टॉप रोड, इचलकरंजी.

दिवाळी /लग्नसराईसाठी साड्यांचा नवीन स्टॉक
रियल सॅरेटी, इंदुरी, पैठणी, गढवाल, नऊवारी, इनारसी सिल्क
आहेत्या ६ ते १० दर साड्या
लेडिज ड्रेसमटीरियल
पुजनसाठी खास मेहल शर्ट, ब्लाउज व शिवण सर्व
इंगळे साडी हाऊस
१ ते ३ इचलकरंजी, स्टेशन रोड, बाळासाहेब

वेडशीट सोल्यसाती लेडीज स्टाफ पाहिजे. ऑप्युटरचे ज्ञान आवश्यक. मो. ९५७९२२१६०९.

शुध्द शाकाहारी हॉटेलमध्ये पंगती व भाकरी करणेसाती व भांडी कामासाती लेडीज पाहिजेत. मो. ९८८४४७५०५८.

जुने सोफासेट व रोलींग वेअर रिपेअरी करून देवू तसेच सोफा, पडदे व गादी अॅडीशिनमचे तयार करून देवू. मो. ८२६९०८९५९०.

शहापूर पसिरासीतील एअरजेट कारखान्याचा प्रॉडक्शन आणि मॅनेजमेंटसाठी मॅनेजर/मेन दिवाणजी पाहिजे. योग्य व्यक्तींनी आपली माहिती ९३४५५२३७८९ या क्रमांकावर फक्त व्हॉटसॲप्प करा.

इचलकरंजीमधील महिला नामांकित गारमेंट कंपनीमध्ये फुल्ल टाईम कामासाती अनुभवी अकौंटट पाहिजेत. आकर्षक पगार, मो. ९९२९३८९५७.

शुध्द शाकाहारी हॉटेलमध्ये मॅनेजर, वेटर, थपाती करण्यासाती व भांडी घासण्यासाती जेन्टस्/लेडीज पाहिजेत. जेवायची सोय. मो. ८१७५९८९८४७, ७९७२९२१६५१

एअरजेटमध्ये डिस्पॅच, सुताचा हिशोब करणेसाती हुशार दिवाणजी पाहिजे. मो. ८८०५२४२६७८, ९८७३९५३७५.

अकौंटट पाहिजे. हुशार/अनुभवी अकौंटट पाहिजे. मो. ९८३४०१६४५.

सुंदर बागेजवळ आईस्क्रिम पॅलयाझीसाती मुले/मुली पाहिजेत. पार्ट टाईम/फुल्ल टाईम, प्रत्यक्ष भेटा. ७०५७०५०७७७ इचलकरंजी.

जेन्टस् कामगार पाहिजे १२ तास ड्युटी. पगार १५ ते १८ हजार, दुसरी. मो. ८०००७८२५७७

इचलकरंजी येथे परमिट रूम इचलकरंजीसाती अनुभवी वेटर व हेल्पर पाहिजेत. मो. ८८३०९८३४०१

ऑफिस कामासाती मुलगा/मुलगी पाहिजेत. संपर्क- संगीता कन्सालटन्सी, इचलकरंजी. मो. ९१३८८१३७२० (शिप्पुम व्हॉटस्ॲप करा)

हमाल पाहिजे हार्डवेअर दुकानामध्ये हमाल पाहिजे. पगार १८ हजार, यद्वार. मो. ९०२८९२२२८९, ९८२२४५५६०४.

पाहिजेत सीएमएम ऑपरेटर व अकौंटट अनुभवी. संपर्क- स्वस्तिक इंजिनिअर्स, यद्वार. मो. ८३२९४४४९१२.

सेवासदन निरामय प्रा.लि.- अर्जट कर्मचारी पाहिजेत. मेडिकल ऑफिसर (बीएएमएस/ बीएचएमएस), सिनि. अकौंटट, रिसेप्शनिस्ट, ड्रायव्हर, सिनियर लॅब टेक्निशियन, फार्मासिस्ट (जेन्टस्). पात्र व अनुभवी उमेदवारांना प्राधान्य यांनाते वेतन व उत्तम करियर संधी. मो. ७७९६९०४०००, ७२७६७४८००३. मुलाखत वेळ- सकाळी ११ ते सायं.५

पाहिजेत मेल्टींग सुपरवायझर ३ जागा, लॅब इन्चार्ज-१ जागा, लॅब ऑपरेटर- ३ जागा. मानेफौंडी, इचलकरंजी. मो. ९५४५४८५२२९.

हॉस्पिटलमध्ये एन्ट्रण्स/जीएनएम सर्टिफाईड असलेले स्टाफ पाहिजे व फार्मासिस्ट पाहिजेत. मो. ९८८९८१११३३.

कर्मचारी पाहिजेत दक्षिणसूत्र (Dakshin Sutra) १) फॅसिअर २) विषन स्टाफ. वेळ- सकाळी ७ ते ११.३० आणि संध्याकाळी ५ ते सायं ११. पत्ता- स्टेशन रोड, अडिशमन कॅट्रासमोर, इचलकरंजी. मो. ९३७०७४९६१५.

सिक्युरिटी गार्डस् इन्स्टिट्यूट, गणेशनगर, इचलकरंजी येथे ४ बीएचके प्रशस्त फर्निचड बंगला भाड्याने देणे. २ व्हिलर, ४ व्हिलर पार्किंग. मो. ९१७५९३५५७५.

कबनूर हायस्कूलसमोर प्रियदर्शिनी कॉलनी येथे १ आरके रूम भाड्याने देणे आहे. मो. ९८९०३०४६०३, बाबनूर.

कम्पनियल गाळे भाड्याने/विकणे आहे. चंदूर रोड, किरण गॅस गोडावूनसमोर,मिराकी स्क्वाड अपार्टमेंटमधील,ग्राऊंड फ्लोअरवर हॉप. नं.१ व २, भाड्याने/विकणे आहे. मो. ९८२२५०५०७७.

नवीन हॉल भाड्याने देणे. ८० बाय ५४ गारमेंटसाती, ऑफीससाती, पतसंस्थेसाती भाड्याने देणे आहे. संपर्क- राजराजेश्वरी नगर, वर्धमान चौक, रंगाटे ॲल्युमिनियम जवळ, इचलकरंजी. मो. ८८५५८८५१६.

शेड भाड्याने देणे. इचलकरंजी येथे भारती हायस्कूल जवळ १०० स्क्वे.फूटचा प्रशस्त शेड भाड्याने देणे. मो. ९३७१६३४९४३.

एकआयरी रिसर्च इन्स्टिट्यूट, गणेशनगर, इचलकरंजी येथे ४ बीएचके प्रशस्त फर्निचड बंगला भाड्याने देणे. २ व्हिलर, ४ व्हिलर पार्किंग. मो. ९१७५९३५७५.

३०० स्क्वे. आरसीसी गाळा व २००० स्क्वे.फूट पञ्याची शेड भाड्याने देणे. हुलगेश्वरी रोड, बीजेपी कार्यालय लगत. मो. ८४८३२४४७०९, ९१५८५८८३३९.

भाड्याने देणे बीजेपी गार्डन, वंदे मातरम् एरिया १००० स्क्वे.फूटाचे आरसीसी शेड, पतसंस्था, बँक, क्लासेस,फायनान्स कंपनीसाती. मो. ९४२२०४४५२८.

भाड्याने देणे २ बीएचके फ्लॅट परिवार/विद्यार्थ्यांसाठी व दुकानगाळा, पार्लर/ऑफिससाती फंक्शनल अपार्टमेंट, झेंडा चौक परिसर. मो. ९२२६९२६४७२, इचलकरंजी.

शेड भाड्याने पाहिजे. २००० ते ३००० स्क्वे.फूटाचे, २० फूट उंचीचे शेड भाड्याने पाहिजे. मो. ९०४९२७२०९४, ८७७९९१९४६४.

जागा भाड्याने देणे. आसरानगर बस स्टॉपजवळ २ रस्ते असलेला ३००० स्क्वे.फूट रिकामा प्लॉट. मो. ९५०३०२५५५९, ९०२९५६५५९९.

सर्व सोईसीयुक्त १ बीएचके चार फ्लॅट्स महाण्डट देणे आहे. ऑफार चौक, आयकॉन पार्क शेजारी, इचलकरंजी. मो. ७४४८१४०४०४.

३०० स्क्वे. आरसीसी गाळा व २००० स्क्वे.फूट पञ्याची शेड भाड्याने देणे. हुलगेश्वरी रोड, बीजेपी कार्यालय लगत. मो. ८४८३२४४७०९, ९१५८५८८३३९.

भाड्याने देणे बीजेपी गार्डन, वंदे मातरम् एरिया १००० स्क्वे.फूटाचे आरसीसी शेड, पतसंस्था, बँक, क्लासेस,फायनान्स कंपनीसाती. मो. ९४२२०४४५२८.

भाड्याने देणे २ बीएचके फ्लॅट परिवार/विद्यार्थ्यांसाठी व दुकानगाळा, पार्लर/ऑफिससाती फंक्शनल अपार्टमेंट, झेंडा चौक परिसर. मो. ९२२६९२६४७२, इचलकरंजी.

शेड भाड्याने पाहिजे. २००० ते ३००० स्क्वे.फूटाचे, २० फूट उंचीचे शेड भाड्याने पाहिजे. मो. ९०४९२७२०९४, ८७७९९१९४६४.

घर भाड्याने देणे व्यंकटेश कॉलनी, डेकन्न चौक येथे. ३ बीएचके सर्व सोईसीयुक्त, बोअरसह भाड्याने देणे. मो. ९०७५५०९३३८.

भाड्याने देणे ४२ गुंठ्यामध्ये गोडाऊन/कार्यालयासाठी उपयुक्त. हॉल+जागा भाड्याने देणे. जयसिंगपूर रेल्वे स्टेशन, दानोळी रोड, मो. ९०७५१०९३३८.

६५ बाय ५० फूट रिकामी शेड भाड्याने देणे. ऑफिससह खोलवाडी, यावेती गेट समोर,७० एचपी लाईट, बोअरींग,पाणी उपलब्ध.९४२९२०३८६२

※ यात्रा सहल ※

गार्डी टूर्स १५ नोव्हेंबर दक्षिण भारत, रामेश्वर,कन्याकुमारी, केरळहस १५ डिलेबर, वसाही अयोध्या १५ जानेवारी, जगन्नाथपुरी रेल्वेने. ९१४५२६४२४९

※ वोअर विषयक ※

सिध्देश्वर बोअरवेल आनवेकडे ६।।" बोअरवेल योग्य दरात माफल मिळेल. सांगली नाका, इचलकरंजी. मो. ८५५४९८४५६३, ७७७५९२७५०२.

वसुबारसदिनी खिलार गायींचे पारंपरिक औक्षण

■ शिराळा,ता.५ (प्रतिनिधी)–

गोवत्स द्वादशी अर्थात वसुबारस या सणानिमित्त मांगरुळ येथील राजे शिवाजी नगरमधील मस्के व नायकवडी परिवाराने खिलार गायींचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून गोमातेप्रती श्रद्धा व्यक्त केली.

हिंदू संस्कृतीत या दिवसाला विशेष महत्त्व आहे. शेतकरी कुटुंबांमध्ये या दिवशी गायी व वासरांना स्वच्छ स्नान घालून त्यांना सजविले जाते. त्यांच्या अंगावर रंगेबेरंगी झूल, गळ्यात घंटा आणि फुलांचे हार घालून पारंपरिक पद्धतीने पूजा केली जाते. त्यानंतर गायींचे औक्षण करून नैवेद्य अर्पण केला जातो.

खिलार गाय ही महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण देशी गोवंशाची जात म्हणून ओळखली जाते. ग्रामीण शेतीव्यवस्थेत गाय, वासरू आणि बैल यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे.

जेलभरो आंदोलनासाठी जाणाऱ्या रयत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना अटक

■ निपाणी,ता.५ (प्रतिनिधी)–

साखर कारखान्यांनी प्रति टन ३७०० रुपये व सरकारने प्रति टन १०० रुपये द्यावेत,अशी मागणी रयतसह विविध शेतकरी संघटनांनी केली आहे. ऊसदर जाहीर केल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर रविवारी यळगुड येथे 'जेलभरो आंदोलनासाठी कर्नाटक राज्य रयत संघटनेचे कार्याध्यक्ष राजू पोवार यांच्या नेतृत्वाखाली जाणाऱ्या निपाणी तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना निपाणी पोलीसांनी गुरुवारी अटक केली.


जेलभरो आंदोलनासाठी जाताना राजू पोवार यांच्यासह कार्यकर्त्यांना रोखताना पोलीस अधिकारी.

सकाळी नऊ वाजता अकोळ क्रॉसवरील संघटनेच्या कार्यालयात बेळगावला जाण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्ते जमले होते.

त्यामुळे मंडल पोलीस निरीक्षक बी. एस. तळवार, ग्रामीण पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक शिवराज नायकवडी, सहाय्यक फौजदार प्रकाश न्यूगनिहाळ, हवालदार मारुती कांबळे, राजू दिवटे, रामगोंडा पाटील, आर. वाय मेलगडे आणि सहकाऱ्यांनी कार्यालय परिसरात बंदोबस्त ठेवला. यावेळी राजू पोवार यांनी, कारखानदार ३६०० रुपये दर देण्यास तयार आहेत.पण आमची मागणी ३७०० रूपये आहे. सरकारकडून ३०० रूपये प्रतिटन असे ४००० पर्यंत ऊसाला दर मिळू शकतो. त्यामुळे याबाबत सरकाने सकारात्मक विचार करण्याची गरज आहे.

यावेळी सर्जेराव हेगडे, मधुकर पाटील, अविनाश पाटील, कालगोंडा कोठी, सिद्धाप्पा मिरजे, महेश जनवाडे संतोष मंगवते, प्रकाश नवले संजय पाटील, विजय मंगावते, राजू मठपती,महांतेश पाटील, विनोद देवर्षी, सोमनाथ मिरजे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, शेतकरी नेत्यांना अटक केल्याने शेतकऱ्यांनी निपाणी, चिक्कोडी, बेडकिहाळ परिसरात अनेक ठिकाणी रस्ते अडवून ठेवले आहेत.

बेळगावमध्ये पदयात्रेवरून येत असलेल्या शेतकरी संघटनेचे नेते चुनाप्पा पुजेरी यांना पोलिसांनी अटक केली. पोलीस आयुक्तांनी शेतकऱ्यांच्या आंदोलनावर बंदी घातल्याने ही कारवाई करण्यात आली.ऊसाच्या किमती निश्चित करण्याबाबत शेतकरी बेळगावकडे कूच करत होते. यावेळी पुजेरीना पोलिसांनी घेरले आणि मुक्ति मठाजवळ ताब्यात घेतले.

शेतकरी संघटना प्रति टन ३,६०० देण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

साखरेच्या किमान विक्री किमतीत वाढ झाल्यामुळे अतिरिक्त उत्पन्न आले तर ते दुसऱ्या हप्त्यात शेतकऱ्यांना अतिरिक्त पैसे देण्याचा प्रयत्न करतील. मात्र, या प्रस्तावाला शेतकऱ्यांची संमती मिळवण्याचा प्रयत्न सुरूच होता. दरम्यान आज सकाळी शेतकरी नेत्यांचे अटक सत्र सुरू केले आहे. त्यामुळे शेतकरी भडकले असून जिल्ह्यातील अनेक ठिकाणी रस्ते अडविण्यात आले आहेत.

ऊसदर आंदोलनाचे सीमावर्ती भागात पडसाद

■ चिक्कोडी,ता.५ (प्रतिनिधी)–

महाराष्ट्रात ऊसदराच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक बंद करण्यात आल्याचा परिणाम कर्नाटकातील सीमावर्ती भागातही जाणवू लागला आहे.

महाराष्ट्राकडे जाणारी वाहतूक विस्कळीत झाल्याने चिक्कोडी शहरात वाहनांची मोठी गर्दी होऊन वाहतुकीचा खोळंबा झाला. विशेषतः अवजड मालवाहू वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने वाहतूक कोंडीचे चित्र निर्माण झाले आहे.ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा, या मागणीसाठी कर्नाटक-महाराष्ट्र सीमेवर शेतकऱ्यांनी आंदोलन तीव्र केले आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक रोखण्यात आल्याने महाराष्ट्राकडे जाणारी अवजड वाहने विविध ठिकाणी अडकून पडली आहे. त्याचा परिणाम सीमावर्ती भागातील वाहतुकीवर झाला आहे. वाहतूक कोंडीमुळे प्रवासी, वाहनधारक यांना स्थानिक नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.ऊसदराचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावा आणि शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळावा अशी मागणी होत आहे.

महाराष्ट्रातील महामार्ग व राज्यमार्ग बंद असल्याने कर्नाटकातील चिक्कोडी शहराच्या दिशेने मालवाहू वाहने वळविली आहेत. त्यामुळे शहरातील मुख्य बसस्थानक सर्कल मार्गावर चारही बाजूंनी वाहनांच्या किलोमीटरहून अधिक लांबच्या लांब रांगा लागल्या असून त्यामुळे चिक्कोडी पोलिसांकडून वाहतूक कोंडी सोडवण्याचा प्रयत्न केले जात आहेत.

प्रफुल्ल पटेल शरद पवारांच्या भेटीसाठी

■ मुंबई,ता.५ –

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी ब्रीच कँडी रुग्णालयात गुरुवारी भेट घेतली.

भेटीदरम्यान शरद पवार यांनी प्रफुल्ल पटेल यांच्याकडे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत झालेल्या बैठकीबाबत विचारणा केली असल्याचे कळते. बैठकीत नेमकी काय चर्चा झाली, कोणते राजकीय विषय मांडण्यात आले, या भेटीमागील भूमिका काय होती, याबाबत पवारांनी पटेल यांच्याकडून माहिती घेतल्याचे समजते.

ऊर्जा,जैवसाहित्य,नॅनो तंत्रज्ञानावर जागतिक मंथन

डी.वाय.पाटील विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषद

■ कोल्हापूर,ता.५ (प्रतिनिधी)–

जागतिक स्तरावर संशोधन, नवकल्पना आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी अभिमत विद्यापीठ, कोल्हापूर आणि मिड स्वीडन युनिव्हर्सिटी, स्वीडन यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच 'वायलॅटरल इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन फंक्शनल मटेरियल्स फॉर अॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजीज' ही आंतरराष्ट्रीय परिषद झाली.

'कंक्शनल मटेरियल्स टू अ सस्टेनेबल फ्युचर' या संकल्पनेवर या परिषदेमध्ये प्रगत कार्यात्मक पदार्थ, जैवसाहित्य व ऊर्जा अभियांत्रिकी, ऊर्जा साठवण व रूपांतरण, पर्यावरणपूरक उपाययोजना, इलेक्ट्रॉनिक आणि ऑप्टोइलेक्ट्रॉनिक पदार्थ अशा महत्त्वपूर्ण संशोधन क्षेत्रांवर चर्चा करण्यात आली. मिड स्वीडन युनिव्हर्सिटीचे इनोव्हेशन अँड



बिझनेस को-ऑपरेशनचे उपकुलगुरू प्रा. हान्स-एरिक निल्सन आणि डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शशिकांत शर्मा यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. यावेळी दोनही विद्यापीठांतील १२ संशोधक व प्राध्यापकांनी आपापल्या संस्थांमधील संशोधन कार्याची माहिती सादर केली.

परिषदेच्या पहिल्या सत्रात ऊर्जा साठवण आणि ऊर्जा रूपांतरण उपकरणांसाठी आवश्यक प्रगत पदार्थांवर चर्चा झाली. यामध्ये प्रा. उमाकांत पाटील यांनी ऊर्जा साठवण व रूपांतरणासाठी वाइडर-झी थिन फिल्म इलेक्ट्रोड्स या विषयावर, तर प्रा. जोनास अर्टिग्रेन यांनी बॅटरीसाठी नॅनोमटेरियल्स या विषयावर. डॉ. विजय कुंभार यांनी ऊर्जा साठवण अनुप्रयोगांसाठी मेटल ऑक्साइड हेटरोस्ट्रक्चर्स, प्रा. रेखून झांग यांनी स्मार्ट सेन्सिंग व ऊर्जा संकलनासाठी सॉलिड-स्टेट उपकरणे, तर डॉ. प्रवीण पवार यांनी फोटॉनिक्स आणि जैवबीद्धकीय अनुप्रयोगांसाठी फंक्शनल ग्लासेस या विषयांवर व्याख्याने दिली.

दुसऱ्या सत्रात जैवसाहित्यांच्या आधुनिक उपयोगांवर विशेष भर देण्यात आला. प्रा. मॅग्नस नॉरग्रेन यांनी सेल्युलोजचे उपयोग, असोसिएट प्रोफेसर क्रिस्टीना डाहलस्ट्रॉम यांनी सेल्युलोज-आधारित ट्राचाईलेक्विड क मटेरियल्स, तर डॉ. शिवाजी काप्टे यांनी टिश्यू इंजिनिअरिंगसाठी जैवसाहित्य या विषयावर संशोधन मांडले. प्रा. मनीषा फडतरे यांनी पुढील पिढीतील तंत्रज्ञानासाठी शाश्वत पदार्थ, तर प्रा. अर्पिता तिवारी यांनी बायोसेन्सिंगसाठी बायोफंक्शनलाइज्ड मटेरियल्स विषयांवर सादरीकरण केले.

या परिषदेचे योगेश जाधव म्हणून प्रा. उमाकांत पाटील आणि प्रा. मनीषा फडतरे यांनी काम पाहिले. परिषदेमध्ये दोनही विद्यापीठांतील प्राध्यापक, संशोधक आणि तज्ज्ञांनी सहभाग घेतला. परिषदेचा समारोप डॉ. प्रा. प्रमोद एस. पाटील आणि असोसिएट प्रोफेसर जोनास अॅर्टिग्रेन यांच्या समारोपपर मनोगताने झाला. कुलपती डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त कतुराज एस. पाटील, पृथ्वीराज एस. पाटील, कुलगुरू डॉ. राकेशकुमार शर्मा, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

वाचकांसाठी निवेदन

दै.महासत्ता वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्याप्रमाणे प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. तसा मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

गोकुळमध्ये वसुबारस निमित्त गाय–वासराचे पूजन

■ कोल्हापूर,ता.५(प्रतिनिधी)–



कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या वतीने वसुबारसनिमित्त गाय–वासरू व म्हैस पूजन पारंपरिक पद्धतीने करण्यात आले. संघाच्या ताराबाई पार्क येथील कार्यालयाच्या प्रांगणात प्राधिकृत अधिकारी मंडळाचे सदस्य सगर बलकवडे यांनी सपत्नीक धार्मिक विधीपूर्वक पूजन केले.

यावेळी प्राधिकृत अधिकारी मंडळाचे अध्यक्ष प्रदीप मालगावे, सदस्य, संघाचे अधिकारी, कर्मचारी व महिला स्वयंसेविका उपस्थित होत्या.

यावेळी प्राधिकृत अधिकारी मंडळाचे सदस्य डॉ. चंद्रकांत पऱ्हाडकर म्हणाले, देशी गोवंशाच्या जातींचे जतन आणि संवर्धन करणे गरजेचे आहे.

गोकुळचे कार्यकारी संचालक डॉ. योगेश गोडबोले म्हणाले की, बदलत्या हवामानामुळे राज्यातील काही भागांत पाणी व चाऱ्याच्या उपलब्धतेवर परिणाम होत आहे. त्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात अनुकूल भौगोलिक परिस्थिती तसेच पाणी व चाऱ्याची उपलब्धता लाभली आहे, ही आपल्यासाठी जमेची बाजू आहे.

कार्यक्रम प्रसंगी प्राधिकृत अधिकारी मंडळाचे अध्यक्ष प्रदीप मालगावे, सागर बलकवडे, डॉ.चंद्रकांत पऱ्हाडकर, कार्यकारी संचालक डॉ. योगेश गोडबोले, डेअरी महाव्यवस्थापक अनिल चौधरी, बोर्ड सेक्रेटरी प्रदीप पाटील, रामकुमार पाटील, हणमंत पाटील, डॉ. दयावर्धन कामत, डॉ.व्ही. डी.पाटील, डॉ. दळवी, धनाजी पाटील, जनसंपर्क अधिकारी सचिन पाटील यांच्यासह संघाचे अधिकारी, कर्मचारी व महिला स्वयंसेविका उपस्थित होत्या. सूत्रसंचालन डॉ. एम. पी. पाटील यांनी केले.

शिक्षणाधिकारी मीना शेंडकर निलंबित

आरटीई परिपूर्तीतील अनियमितता; शालेय शिक्षण व क्रीडा विभागाची कारवाई

■ कोल्हापूर ता.५(प्रतिनिधी)–

आरटीई अंतर्गत २५ टक्के प्रवेशाच्या परिपूर्तीपोटी अतिरिक्त रक्कम अदा के ल्याप्रकरणी प्रशासकीय दिरंगाई आणि आर्थिक अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्याने राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने प्राथमिक शिक्षणाधिकारी मीना शेंडकर यांना निलंबित केले आहे. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी यासंदर्भातील आदेश जारी करण्यात आला. विभागाचे उपसचिव मो. वा. ताशीलदार यांनी हा आदेश काढला आहे.

सन २०२२-२३ आणि २०२३-२४ या दोन शैक्षणिक वर्षांतील आरटीई २५ टक्के प्रवेशाच्या परिपूर्तीपोटी अतिरिक्त रक्कम अदा करण्यात आली. या प्रक्रियेत प्रशासकीय दिरंगाई आणि आर्थिक अनियमितता झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. त्यानंतर शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने निलंबनाची कारवाई केली. शेंडकर सध्या पुणे येथील शिक्षण आयुक्तालयात शिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत होत्या. वापूर्वी त्यांनी कोल्हापूर जिल्हा शिक्षणाधिकारी म्हणून काम पाहिले होते. त्यांच्या कोल्हापुरातील कार्यकाळात कामकाजाच्या पद्धतीबाबत तक्रारी झाल्या होत्या. पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी त्यांच्या कामकाजाची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. यासंदर्भातील लेखी तक्रारीचे पडसाद त्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कर्मचारी अधिकारी डॉ. जॅस्मिन वाचाणकडे दिले होते. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेतही सदस्यांनी त्यांच्या कामकाजावर आक्षेप घेतला होता. मुख्याध्यापक आणि केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेत अनियमितता झाल्याच्या तक्रारी सदस्यांनी मांडल्या होत्या. या मुद्द्यांवरून सर्वसाधारण सभेत शिक्षण विभागाच्या कामकाजाची चर्चा झाली होती. आरटीईच्या परिपूर्ती रकमेच्या वितरणातील अनियमिततेच्या प्रकरणात शेंडकर यांना निलंबित केल्याने शिक्षण क्षेत्रात चर्चा सुरू झाली आहे.

पावणेचार कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त

■ पुणे,ता.५–

बँकॉकहून अज्ञातार्थीच्या पार्किंगमधून तब्बल ३ कोटी ७२ लाख रुपये किमतीचा १०.६४२ किलो हायड्रोपोनिक गांजा पुण्यात आणण्याचा प्रयत्न कस्टम्स विभागाच्या एअर इंटेलिजन्स युनिटने हाणून पाडला.

सुकांमधा आणि नुडल्सच्या पाकिटांमध्ये दोन पदरी काळ्या प्लास्टिकमध्ये व्हॅक्यूम सील करून हा गांजा लपविण्यात आला होता. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर कस्टम्स व भारतीय प्रशासला अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्याला १८ नोव्हेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

जाहीर नोटीस

१) "जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले, पैकी मौ हट्टीतील भु. ग.नं. १२४९/ब १. त्याचे पैकी सामाईक हिस्सेची मिळकत त्याचा ग्रामपंचायत घर नं. २९१५ ची साधी दगड, विट, सिमेंट मध्ये बांधलेला खोल्या, सर्व सोईची मिळकत व उर्वरीत मिळकत तद्गंभुत वस्तूस" वेगेप्रमाणे पुर्वेस- श्री.कोष्टीची मिळकत, पश्चिमेस- सदरील मिळकतीचा भाग,दक्षिणेस- २० रस्ता, उत्तरेस-सरकारी रस्ता, चतु:सिमेतील मिळकत व तद्गंभुत वस्तूस".

२) वरील मिळकतीचे श्री.महेश धोंडीराम आष्टेकर व कमाल असीम पटेलगादळ, यांचे दरम्यान समाईक घर मिळकतीचे दक्षिण- उत्तर चालीची ६ इंच जाडीची १३' ६" उंचीची व ६० लांबी असलेली वीट, सिमेंटमधे बांधकाम केलेली समाईकातील भित आहे. सदर भितीच्या पुर्वेकडे यातील महेश आष्टेकर यांची घर मिळकत असून सदर भितीच्या दक्षिण बाजूस कमाल हासीम पटेलगादळ यांचे मालकीची मोकळी जागा आहे. या दोघांनी मिळून एकजीव समाईक भित बांधलेली आहे. सदरील भितीमध्ये दोघांचाही एकतीत मालकी कब्जा आहे.

३) सबब, वरील मिळकतीबाबत अन्य सहहिस्सेदार कोही केरफार व मिळकतीची विक्री अथवा तबदिली करीत आहेत ते पुर्णत: बेकायदेशीर, चुकीचे व खोटे असे आहे. अशा बेकायदेशीर कृतीनुसार या मिळकतीचा गैरफायदा करून घेण्याच्या हेतूने सदरच्या मिळकतीमध्ये अन्य कही त्रयस्थ व्यक्ती अथवा त्यांचे तर्फे इसम अथवा संस्था किंवा त्यांचे प्रतिनिधी आमचे अशिलांचे पुर्ण हिस्सातील मिळकतीबाबत गैरफायदा करन घेण्याचा हेतूने ते आमचे अशिलांच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करून आमचे अशिलांच्या संमती शिवाय मिळकतीबाबत करारपत्र, विक्रीदस्त अथवा अन्यप्रकारे तबदिली करण्याचा प्रयत्नात आहेत असे आमचे अशिलांना खात्रीलायरित्या समजून आले आहे वास्तविक तसे करण्याचा त्यांना कायदेशीरहक्क, अधिकार नाही.

४) सबब, वरील आमचे अशिलांचे हिस्सेतील मिळकती संदर्भात उपरस्थ व्यक्ती अथवा त्यांचे तर्फे कोणी इसम अथवा संस्था किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचेशी कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये, तसा व्यवहार कोणी केलेस अथवा केला असलेस तो आमचे अशिलांचेवर बंधनकारक नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस.

ता.०५/११/२०२६.

अॅड.सनी अरविंद बागडे
अॅड. प्रणोती महादेव हजारे

स्पन्जिल टॉवर्स, गाळा नं.९, कुरूक्षिनगेट्टी भवन समोर, इचलकरंजी. ४१६११५. मो. ७७७४८५६१३१,९८५०९८२४८३, ९१५६४९०१३३.

जाहीर इशारा नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन – मौजे तारदाळ येथील अ) ग.नं. २५०/अ चे संपूर्ण क्षेत्र ०.३९.०० आर, ब) ग.नं. २५० / ब चे संपूर्ण क्षेत्र ०.१९.०० आर, क) ग.नं. ३९० चे एकूण क्षेत्र ०.११.०० आर, यापैकी समाईक अविभक्त हिस्सेचे क्षेत्र हे. ०.०२.७६ आर ड) ग.नं. ३८८ चे एकूण क्षेत्र ०.०३.०० आर, यापैकी समाईक विहिरीतील ८ आणे हिस्सेचे क्षेत्र ०.०१.५० आर इ) ग.नं.२६७ चे एकूण क्षेत्र १.०३.०० आर, पो. ख. ०.१६.०० आर यापैकी क्षेत्र ०.७२.४२ आर ही शेतजमिन मिळकत व यातील शेत घर मिळकत. सदरची मिळकत ही आमचे अशिल श्री. महादेव रामा खोत, मारुती, बाळू रामा खोत यांची वडिलार्जित समाईक मालकी कब्जा वहिवाटीची मिळकत आहे.आमचे अशिलांनी त्यांचे बंधू श्री.मारुती, बाळू रामा खोत यांचेकडे उपरोक्त मिळकतीचे रजि. वाटप करून मागितलेले होते. दरम्यानचे काळात वाटणी होणेपूर्वी वर नमूद अ व ब मिळकतीपैकी क्षेत्रापैकी आमचे अशिलांची कोणत्याही प्रकारे सही, संमती न घेता परस्पर त्यांनी श्री.कोतीलाल मुलचंद सोलंकी यांचे लाभात तथाकथित तुकडेजोड, तुकडेबंदी कायद्यांचे उल्लंघन करून रजि. खरेदी दस्त नंबर ५७६०/२०२६ ने दिनांक ९/९/२०२६ ने विक्री केलेचे आढळून आले. तदनंतर आमचे अशिल लागलीच त्याबाबत संबंधित महसूल विभागात दाद घेत आहेत तसेच मे. दिवाणी न्यायाधिशसो क. स्तर, इचलकरंजी यांचे न्यायालयातरे.क.नं. ३४७/२०२६ ने दावा दाखल केलेला असून त्याकामी आमचे अशिल वादी असून श्री. मारुती रामा खोत, बाळू रामा खोत व कांतीलाल मुलचंद सोलंकी हे प्रतिवादी आहेत. आमचे अशिलांनी मे. कोर्टात दावा वाटपाचा, हक्क ज्ञापनाचा, अग्रहक्काचा व कायम मनाई ताकीदीचा दाखल असून सध्या न्यायप्रविष्ट आहे. तरी सदरची मिळकतीवर कोणीही खरेदी, विक्री, कर्जबोजा अगर अन्य दस्तऐवज करु नये, तसे कोणतेही दस्तऐवज झालेस ते आमचे अशिलांचे कायदेशीर हक्कावर बंधनकारक रहाणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून दिली जाहीर इशारा नोटीस.

दि.५/११/२०२६

अॅड.दिपक मारुती कदम

येतळोपठ, तारदाळ,ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.मो.नंबर ९९२२५८५२८८.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा आक्रमक पवित्रा

कोतोलीत दालमिया कारखान्याच्या गट ऑफिसला टाळे ठोकले

■ कोतोली,ता.५(प्रतिनिधी)–

ऊस दराचा प्रश्न अद्याप ही न सुटल्याने संतप्त झालेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेने गुरुवारी कोतोली येथील दालमिया साखर कारखान्याच्या गट ऑफिसला टाळे ठोकून कारखाना प्रशासनाचा निषेध केला.


उसाला योग्य दर मिळत नसताना देखील दालमिया कारखाना शेतकऱ्यांवर आणि ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांवर जबरदस्ती करून ऊस तोडणी करत असल्याचा आरोप यावेळी कार्यकर्त्यांनी केला. यावेळी स्वाभिमानीचे युवा अध्यक्ष विक्रम पाटील यांनी सांगितले, ऊस दराचा प्रश्न अजून मिटलेला नाही. तरीसुद्धा कारखाना शेतकऱ्यांवर जबरदस्ती करत आहे. जोपर्यंत शेतकऱ्यांना ३५०० रुपये दर जाहीर होत नाही, तोपर्यंत आम्ही कारखान्याला ऊस जाऊ देणार नाही. म्हणून आज या गट ऑफिसला टाळे ठोकले आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा एकच नारा – शेतकऱ्याला ३५०० रुपये प्रति टन ऊस दर मिळालाच पाहिजे अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी परिसर दणाणून सोडला. या आंदोलनामुळे कोतोली परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

विहिरीत बुडून वृध्देचा मृत्यू

■ वारणानगर,ता.५(प्रतिनिधी)–

माले (ता.पन्हाळा) येथील आणुबाई वसंत चव्हाण या त्यांच्या चोपड रान नावाच्या शेतात भात कापणी करीत असताना पिण्यास पाणी आणण्यासाठी त्यांच्या शेतातील विहिरीवर गेल्या होत्या.



विहिरीतील पाण्यावर पाणी भरून घेत असताना पाय घसरल्याने त्या विहिरीत पडल्या. बराच वेळ झाला तरी त्या परत न आल्याने त्यांचा नातू सौरभ विहिरीकडे पहावयास गेला असता त्या विहिरीत धडपडत असलेल्या दिसल्या.तेव्हा त्याने आसपासच्या शिवारातील लोकांच्या मदतीने त्यांना बाहेर काढून तात्काळ उपचारासाठी कोडोली येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले मात्र त्यांचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

उपजिल्हा रुग्णालय शवविच्छेदन केल्यावर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेचे वृत्त समजताच रुग्णालय आवारात व गावात नातेवाईक व गावकऱ्यांनी गर्दी केली होती. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

प्रतिटन पाच हजार रूपये द्या !

अखिल भारतीय किसान सभेची मागणी

■ कोल्हापूर,ता.५(प्रतिनिधी)–

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या श्रमाचा आणि उत्पादन खर्चाचा योग्य विचार करून त्यांना रास्त मोबदला देणे ही शासनाची आणि साखर उद्योगाची जबाबदारी आहे.

शासनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून प्रतिटन ५,००० रुपये दराच्या मागणीबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी अखिल भारतीय किसान सभेने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाव्दारे केली. शासनाने शेतकऱ्यांची मागणी मान्य न केल्यास अखिल भारतीय किसान सभेसह अन्य शेतकरी संघटनांना बरोबर घेऊन बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.



यावर्षी दुष्काळाची परिस्थिती असल्यामुळे साखर कारखाने योग्य वेळी सुरू होणे शेतकऱ्यांच्या दृष्टीने गरजेचे आहे. परंतु केंद्र सरकार, राज्य सरकार व साखर कारखानदार दुष्काळी परिस्थितीची भीती दाखवून यावर्षीचा ऊसदर जाहीर न करताच साखर कारखाने सुरू करण्याचा प्रयत्न करत आहेत. वास्तविक, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर साखरेच्या वाढलेल्या दराचा फायदा शेतकऱ्यांना मिळणे गरजेचे आहे. याची दखल घेऊन चालू वर्षीचा ऊसदर ५,००० रुपये प्रति टन जाहीर करूनच साखर कारखाने सुरू करावेत. महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकरी प्रचंड भांडवली खर्च करून ऊस पिकवतात. वाढती मजुरी, खते, औषधे, सिंचन आणि शेतीच्या इतर खर्चामुळे ऊस उत्पादन आर्थिकदृष्ट्या अधिक खर्चिक झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळणे आवश्यक आहे. सध्या साखरेच्या विक्रीदराचा आणि साखर कारखान्यांना मिळणाऱ्या उपपदार्थांच्या उत्पन्नाचा विचार करता, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळण्याची मागणी रास्त आहे.

सोमेश्वर कारखान्याच्या अध्यक्षपदी राजवर्धन शिंदे

■ वारामती,ता.५–

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी राजवर्धन शिंदे तर उपाध्यक्षपदी संग्राम सोरटे यांची बिनविरोध निवड झाली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील पॅनेलने सर्व १७ जागांवर विजय मिळवला होता. या निवडणुकीत २१ पैकी सर्व २१ जागांवर विजय मिळवला होता. यावेळी जय पवार उपस्थित होते.श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याची निवडणूक काही दिवसांपूर्वीच झाली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शना खालील पॅनेलच्या विरोधात अजित पवार यांचे निकटवर्तीय पुरुषोत्तम जगताप यांनी स्वतंत्र पॅनेल उभे केले होते.

मलकापूर नगरपरिषदेच्या मासिक सभेत उबाठा गटाचा सभात्याग

सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर विरोधकांचा सवाल

■ मलकापूर,ता.५(प्रतिनिधी)–

मलकापूर नगरपरिषदेची बुधवारी झालेली मासिक सभा चांगलीच गाजली. सभेचा अर्जेडा वेळेत न देणे, तसेच सभेसाठी आवश्यक असलेली विषयांची टिपणी सभागृहाचे कामकाज सुरू झाल्यानंतर देण्यात आल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या सात नगरसेवकांनी सभेतून बाहेर पडत सभात्याग केला.

यावेळी विरोधी पक्षनेते संजय पवार, गटनेत्या पल्लवी पवार आणि नगरसेविका नेहा बेर्डे यांनी सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

शिवसेनेने दिलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, बुधवारी दुपारी १२ वाजता होणाऱ्या मासिक सभेची नोटीस नगरसेवकांना मंगळवारी रात्री आठ वाजता देण्यात आली. तसेच सभेतील महत्त्वपूर्ण विषयांची टिपणीही वेळेत उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे अचानक समोर आलेल्या विषयांवर नगरसेवकांनी आपली भूमिका कशी मांडायची, असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला.

सभेच्या अर्जेडाघर असलेला मंगलपूर नामकरणाचा ठराव रद्द करणे आणि सानुग्रह अनुदान वाटप या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्याची आमची तयारी आहे; मात्र सत्ताधाऱ्यांचा मनमानी कारभार आणि सभेतील मनमानी बोलणे लोकशाहीला धरून आहे का, असा सवाल विरोधी गटाने केला.

या सर्व प्रकाराच्या निषेधार्थ उबाठा गटाच्या सर्व नगरसेवकांनी मासिक सभेतून सभात्याग करत बहिष्कार टाकला. दरम्यान, मंगलपूर नामकरणाचा ठराव रद्द करणे आणि सानुग्रह अनुदान वाटप यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर आता सभेत पुढील चर्चा होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कोल्हापुरात दोन हजारांहून अधिक रेशन कार्डांचे वाटप

■ कोल्हापूर,ता.५(प्रतिनिधी)–

महात्मा ज्योतिराव फुले सेवा संकल्प अभियानांतर्गत अन्नधान्य वितरण शहर कार्यालयाकडून शहरातील पात्र लाभार्थ्यांना विविध प्रवर्गातील रेशन कार्डांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून एकूण २ हजार ४१ लाभार्थ्यांना रेशन कार्ड देण्यात आल्याची माहिती अन्नधान्य वितरण कार्यालयाने दिली.

यामध्ये केशरी प्रवर्गातील १ हजार २२८, प्राधान्य कुटुंब लाभार्थी प्रवर्गातील ४४४, पांढरे प्रवर्गातील ३६२ आणि अंत्योदय प्रवर्गातील सात रेशन कार्डांचा समावेश आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीला ११ एप्रिल २०२७ रोजी २०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त राज्य शासनाने २०२७ हे वर्ष महात्मा फुले यांचे द्विजन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून महात्मा ज्योतिराव फुले सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे.

हे अभियान १ सप्टेंबर २०२६ पासून सुरू झाले असून ते ३१ मार्च २०२७ पर्यंत राबविण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. या कालावधीत विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने उपक्रम राबविण्यात येत आहेत.

जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ५८५ प्लॉट नंबर ११ चे क्षेत्र ३०६.६९ चौरस मिटर ची मिळकत यासी चतु: सिमा- पुर्वेस- प्लॉट नंबर १२, पश्चिमेस-२० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस-२० फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस-प्लॉट नंबर १३. सदरची मिळकत सौ. सत्यभामीनी संजय खोत, रा. तारदाळ यांचे कब्जे मालकीची मिळकत असून त्यांनी सदर मिळकतीचे तोंडी करारपत्र आमचे अशिलांच्या कडून संचकार रक्कम स्विकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हरत दावा, पोटगी,इडमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दी पासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर प्रत्यक्ष कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस. सही ता.०३/११/२०२६

अॅड.आनंद प्रकाश पटवा

रा.आसरानगर, बस स्टॉप जवळ, सांगली रोड, इचलकरंजी.
मो. ९४२०७७६५४८

खरेदी करार नोटीस

मिळकतीचे वर्णन:- इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील मौजे कबनूर येथील क.नं.नं. ९०४ हिस्सा क्र. ब/५ मधील बिगरशेती भूखंड नं. ३३ चे क्षेत्र १५३.३४ चौ.मी.ची मिळकत असून यासी चतु: सिमा पूर्व- बाधू पाटील यांची मिळकत, पश्चिम-२४ फुट रुंदीचा रस्ता, दक्षिण- तानवडे यांची मिळकत, उत्तर- गुलाब शेख यांची मिळकत असून सदरची मिळकत ही मिलम नवनाथ जाधव, अपूर्वा नवनाथ जाधव आणि कु. श्रीयश नवनाथ जाधव अ.पा.क.तर्फे आई मिलम नवनाथ जाधव यांच्या मालकीची असून ती त्यांनी आमच्या पार्टीस देवू केलेली असून व त्यापोटी संचकार ही स्विकारलेला आहे. सदर मिळकती बाबत कोणाचा कोहीही हक्क, हित संबंध, दावा, तारण इत्यादी काही असलेस ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस दि.०४/११/२०२६

श्री.विश्वनाथ कृष्णा घाटगे
(स्टॅम्प वेन्डर)
पत्ता १०/५६३,
विक्रमनगर इचलकरंजी
मो.नं.९८२३४५८५८५

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

१) ता.हातकणंगले पैकी मौजे खोतवाडी हद्दीतील जुना क. ग. नं. ४८८ याचा नवीन क.ग.नं. ८८, क्षेत्र हे . ८.८० आर, पो. ख. क्षेत्र हे . ०.५२ आर, आकार रु १४.०५ पैसे यापैकी बिगरशेती क्षेत्र २२३.०४ चौ. मी. ची खुली मिळकत यांसी चतु:सिमा पुर्वेस :- पाटील वांची मिळकत, पश्चिमेस :- संजय मेकळ्ळे यांची मिळकत, दक्षिणेस :- सरकारी रस्ता व उत्तरेस :- रस्ता व पुढे यांची मिळकत , येणे प्रमाणे चतु:सिमे तील मिळकत. २) वरील मिळकत ही "१. शामराव दर्याप्पा कांबळे उर्फे नाईक २ . श्री.लगम्माप्पा दर्याप्पा कांबळे उर्फ नाईक ३. श्री.शिवानंद दर्याप्पा कांबळे उर्फ नाईक (मयत)" रा. इचलकरंजी यांचे मालकी बहीवाटीची असून सदरील मिळकतीसंदर्भात त्यांनी आमच्या अशिलांशी नोटरी करारपत्र करून संचकार दाखल रकम स्विकारलेली आहे. ३) सबब, सदरील मिळकतीवर कोणाचाही, कोणताही हक्क करार,तारणगहान दस्त, बक्षिस, वारसा हक्क,कोर्ट केसेस वगैरे हक्कसंबध असलेल तर ती त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावरती लेखी कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस सही.

अॅड. पंकज आ. पाटील

ऑफीस– "श्री दत्त अपार्टमेंट", गाळा नं. १, सांगली नाका, इचलकरंजी
मो. न. ९०२१२३७६८७

सचिन वाझेचा जामीन उच्च न्यायालयाने रद्द

■ मुंबई,ता.५–

वरचर्चित ॲंटिलिया बॉम्ब प्रकरण आणि मनसुख हिरेन हत्या प्रकरणात विशेष एनआयए न्यायालयाने बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझेला दिलेला जामीन मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला.

न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या विशेष खंडपीठाने स्पष्ट केले की, विशेष न्यायालयाने २९ सप्टेंबर रोजी (वाझेच्या जामीन अर्जावर) दिलेला आदेश रद्द करण्यात आला असून, एनआयएने दाखल केलेले अपील मंजूर करण्यात आले आहे.या निर्णयाचे सविस्तर कारण नंतर दिले जाईल.

कार झाडावर आदळून एक ठार,तिघे जखमी

■ निपाणी,ता.५ (प्रतिनिधी)–

तावा सुटल्याने कार झाडावर आदळून एक जागीच ठार तर तीन जण गंभीर जखमी झाले. ही घटना बुधवारी रात्री निपाणी –लखनापूर रोडवर घी. आर. पाटील यांच्या शेतजवळील वळणावर घडली. सुर्वकांत रुपसमार पाणरी (वय २३ रा. अकोळ ता. निपाणी) असे अपघातातील मृताचे नाव आहे.

चालक विशाल मिलींद बिरांजे (वय २२ रा निपाणी), ओंकार अतुल पळसे (वय २४ रा.निपाणी) व संकेत सिध्दाप्पा मेंदार (वय २४ रा. निपाणी) अशी जखमींची नावे आहेत. कार (एम. एच. १०/डीजी ८६७१) मधून विशाल व त्याचे मित्र ओंकार, संकेत हे सुर्वकांत याला सोडण्यासाठी निपाणीहून अकोळकडे चालले होते. ओढ्यापाशी अलिकडे असलेल्या वळणावर वाहनाचा तावा सुट्ल्याने कार जोरात झाडावर आदळल्याने चालका शेजारी बसलेला सुर्वकांत पाणारी हा जागीच ठार झाला.अपघाताची माहिती मिळताच सीपीआय बी. एस. तळवार, बसवेश्वर चौक पोलीस ठाण्याचे फौजदार रमेश पोवार, प्रशांत कुदरी, पी.आर.बड्डाख, इकबाल एस. कुदरी व सहकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली.

निपाणी–लखनापूर रोडवर अपघातात चक्काचूर झालेली कार.



ना.बा.एज्युकेशन सोसायटीच्या वार्षिक सभेत बोलताना बाबासाहेब वडिंगे, व्यासपीठावर इतर प्रमुख मान्यवर.

श्री ना.बा. एज्युकेशन सोसायटीची वार्षिक सभा संपन्न

इचलकरंजी,ता.५-

.....

येथील श्री नारायणराव बाबासाहेब एज्युकेशन सोसायटीची २०२५-२६ सालातील ७५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या श्री व्यंकटेश महाविद्यालयात खेळीमेळीच्या वातावरणात संस्थेचे प्रेसिडेंट श्रीनिवास बोहरा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

प्रेसिडेंट श्रीनिवास बोहरा यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. ऑनरेरी सेक्रेटरी बाबासाहेब वडिंगे यांनी संस्थेने केलेल्या प्रगतीचा आढावा घेत प्रास्ताविक व अहवाल वाचन केले.विषय पत्रिकेतील सर्व विषयांचे वाचन पुरुषोत्तम पुराणिक यांनी केले. बाप्पासंगी सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले.प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून स्व.मदनलालजी बोहरा व स्व.हरिष बोहरा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी चेअरमन कृष्णा बोहरा, ट्रेझरर महेश बांदलवार, विश्वस्त सत्यनारायण ओझा, मारुती निमणकर, लक्ष्मीकांत पटेल, अहमद मुजावर, रामकिशोर तिवारी, अशोक जोशी, सुरेंद्रकुमार बांगड व अनेक सभासद उपस्थित होते.आभार विश्वस्त श्रीकांत चंगेडिया यांनी मानले.सूत्रसंचालन युवराज मोहिते यांनी केले.

राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत मराठी मीडियम हायस्कूलचे यश


इचलकरंजी,ता.५-

.....

येथील डीकेटीई सोसायटीच्या मराठी मीडियम हायस्कूल,नारायण मळा या प्रशालेच्या खेळाडूंनी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले.



श्रेयस सोलगे



प्रसाद शिसोदे

क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अकोला यांच्यावतीने १४ वर्षाखालील मुलांच्या राज्यस्तरीय बॉक्सिंग व तायक्वांदो स्पर्धा आयोजित केल्या होत्या.यामध्ये प्रसाद विश्वनाथ शिसोदे याने बॉक्सिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक तर श्रेयस सोलगे याने तायक्वांदो स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला.या खेळाडूंना क्रीडा विभाग प्रमुख श्री.बेडगर, क्रीडा शिक्षक श्री.बचाटे यांचे मार्गदर्शन तर संस्थेच्या मानद सचिव डॉ.सौ.सपना आवाडे, मुख्या.एन.आर.कुंभार व संस्थेचे पदाधिकारी यांचे प्रोत्साहन मिळाले.

खाजगी प्राथ.शिक्षक सेवक पतसंस्थेच्या चेअरमन पदी प्रशांत गुरव

इचलकरंजी,ता.५-

.....

खाजगी प्राथमिक शिक्षक सेवक पतसंस्थेच्या चेअरमन पदी प्रशांत गुरव यांची तर व्हाईस चेअरमन पदी लालासाहेब झेंडे यांची बिनविरोध निवड विशेष सभेत करण्यात आली.



सदर निवड जिल्हा उपनिबंधक कार्यालय कोल्हापूरचे प्रथमेश हरवले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी संस्थापक लक्ष्मण पाटील, संचालक लालासाहेब झेंडे, प्रवीण पाटील,प्रदीपकुमार पाटील,पी.डी.आवळे,तानाजी वाघमोडे, संध्या पाटील,राजश्री शिवुडकर,हेमंत पुकळे, शितल खानाज, विशाल असोटे यांच्यासह संस्था कर्मचारी राजेंद्र लाटकर व शिवाजी पाटील उपस्थित होते.

राजीव दुध संस्थेतर्फे बोनस वाटप

शिरगाव,ता.५(प्रतिनिधी)-

.....

शिरगाव (ता.राधानगरी) येथील राजीव सह. दुध संस्थेच्यावतीने सभासदांना दिवाळी बोनस व भेटवस्तू वाटप कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी संस्थेचे संस्थापक तथा भोगवती साखर कारखान्याचे संचालक प्रा.ए.डी.चौगले प्रमुख उपस्थित होते.अध्यक्षस्थानी चेअरमन धनाजी भोपटे हे होते .

स्वागत सचिव एकनाथ चौगले यांनी केले. यावेळी अहवाल सालात जास्तीत-जास्त दुध पुरवठा करणाऱ्या अशोक येरुडकर, सागर तांदळे , प्रकाश भोपटे, अनिल पाटील, संदीप पाटील , आनंदा बरगे यांचा प्रा.ए.डी.चौगले, बळवंत येरुडकर, ब्रम्हदेव लाड व संचालकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.बाप्पासंगी संस्थेचे व्हा.चेअरमन अरविंद पोवार, संचालक राजेंद्र व्हरकट, संभाजी बरगे, दत्तात्रय बाचणकर, प्रभाकर सुतार, तानाजी पोवार, बंदना चौगले,शारदा गुरव,लहू किरुळकर,चंद्रकांत बरगे आदीसह सभासद उपस्थित होते. आभार क्लार्क तानाजी कांबळे यांनी मानले.

कौशल्याधारित प्रशिक्षणातून रोजगारनिर्मिती करा

खास.धनंजय महाडिक; 'विकसित भारत युवा संवाद' कार्यक्रम संपन्न

कोल्हापूर,ता.५(प्रतिनिधी)-

.....

व्यवसायाभिमुख शिक्षण आणि कौशल्याधारित प्रशिक्षणातून युवकांनी स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात.स्वत: रोजगार मिळवण्यावरोबरच इतरांनाही रोजगार उपलब्ध करून द्यावा,असे आवाहन खास.धनंजय महाडिक यांनी केले.



'विकसित भारत युवा संवाद' कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना खा.धनंजय महाडिक.

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाच्यावतीने राजर्षी शाहू महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत 'विकसित भारत युवा संवाद' कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महाडिक यांनी विकसित भारताच्या उभारणीत शिक्षणाची भूमिका, मतदानाचे महत्व आणि निवडणूक प्रक्रियेविषयी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. प्रत्येक नागरिकाने मतदान प्रक्रियेत सहभागी होऊन जबाबदार नागरिकत्व निभवावे, असेही त्यांनी सांगितले.

मंडलाचार्य प्रतिनिधी शुभांग शिरोडकर यांनी मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेची (एसआयआर) तसेच मतदार नोंदणी व अद्ययावतीकरण प्रक्रियेची माहिती दिली. जिल्हा युवा अधिकारी स्वप्नील देशमुख यांनी 'भाय भारत' पोर्टलवरील युवकांसाठीच्या संधी आणि उपक्रमांची माहिती दिली. अधीक्षक गणेश भोसले यांनी लोकशाही मूल्यांचे महत्व सांगून प्रशिक्षणार्थीना लोकशाहीची शपथ दिली.

प्रशिक्षणार्थीनी निवडणूक प्रक्रिया, एसआयआर आणि स्टार्टअपविषयी विचारलेल्या प्रश्नांचे मान्यवरांनी निरसन केले. कार्यक्रमाला प्राचार्य महेश आवटे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी सतीश माने, अभिजीत पोवार, शिल्प निदेशक, गटनिदेशक, प्रशिक्षणार्थी आणि कर्मचारी उपस्थित होते.



साधना बालकुमार दिवाळी अंकाचे कुरुंदवाड येथे विद्यार्थ्यांना वाटप

कुरुंदवाड,ता.५(वार्ताहर)-

.....

साने गुरुजी शिक्षण संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त साने गुरुजी विद्यालय कुरुंदवाड येथे साधना बालकुमार दिवाळी अंकाचे विद्यालयातील विद्यार्थ्यांना वितरण कुरुंदवाड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शीतलकुमार डोईजड यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब उर्फ दा.आ.पाटील हे होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साधना बालकुमार दिवाळी अंकाचे वाटप करण्यात आले.प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते साने गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.सहाय्यक शिक्षिका सौ.संजीवनी निर्मळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले तर आभार अमोल मस्के यांनी मानले. सूत्रसंचालन जमीर मुल्ला यांनी केले. याप्रसंगी उपाध्यक्ष प्रभाकर कनवाडकर, अजित पाटील, सर्व संचालक, संचालिका, विद्यालयाचे मुख्या. किरण पाटील, ज्येष्ठ शिक्षक सचिन गुदले, विजय माळी, दीपक चौगुले, विद्यार्थी, विद्यार्थिनी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

ब्रँड कोल्हापूर पुरस्काराने डॉ.मोरे, डॉ.भूथाडिया सन्मानित

कोल्हापूर,ता.५(प्रतिनिधी)-

.....

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. वसंतराव मोरे आणि ज्येष्ठ दिग्दर्शक, रंगकर्मी डॉ.शरद भूथाडिया यांना ब्रँड कोल्हापूर जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



ब्रँड कोल्हापूर पुरस्कार प्राप्त मान्यवरांसोबत विश्वास पाटील, आ.सतेज पाटील व इतर.

येथील हॉटेल सयाजी येथे आयोजित केलेल्या समारंभात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पानिपतकार विश्वास पाटील यांच्या हस्ते आणि ब्रँड कोल्हापूरचे संकल्पक आमदार सतेज पाटील यांच्या उपस्थितीत हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. स्वाभिमानी कोल्हापूर जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील तीस मान्यवरांना ब्रँड कोल्हापूर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रमुख पाहुणे पानिपतकार विश्वास पाटील यांनी कोल्हापूरच्या मातीमध्ये वेगळी ऊर्जा असल्याचे नमूद केले. यावेळी बोलताना आमदार सतेज पाटील यांनी ब्रँड कोल्हापूर पुरस्कार प्राप्त मान्यवरांनी आपल्या कामगिरीने कोल्हापूर जिल्ह्याचा नावलौकिक केल्याचे सांगितले. या समारंभास अनेक मान्यवरांसह कला, क्रीडा, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर तसेच नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

शिष्यवृत्तीत राधानगरी पॅटर्नचा दबदबा कायम ठेवा

आर.वाय.पाटील

राधानगरी,ता.५(प्रतिनिधी)-

.....

महाराष्ट्रात राधानगरी तालुका म्हणजे शिष्यवृत्तीची पंढरी आहे. त्यामुळे आगामी शिष्यवृत्ती परीक्षेत राधानगरी तालुक्याचा राज्यात गुणवत्तेचा दबदबा कायम ठेवावा,असे प्रतिपादन राधानगरी पंचायत समितीचे सभापती आर.वाय.पाटील यांनी केले.



सोळांकूर येथील यशवंतराव पाटील शैक्षणिक संकुलात सराव प्रश्नपत्रिकेचे प्रकाशन करताना आर.वाय.पाटील व इतर मान्यवर.

सोळांकूर (ता.राधानगरी) येथील यशवंतराव पाटील शैक्षणिक संकुलात स्व.एस.वाय.पाटील फौंडेशन आयोजित इयत्ता चौथी व सातवी शिष्यवृत्ती सराव प्रश्नपत्रिका प्रकाशनाच्यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी भरत चौगले उपस्थित होते.स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य विकास तोरस्कर यांनी केले.याप्रसंगी पंचायत समिती सदस्य सूर्यकांत पाटील, गटशिक्षणाधिकारी धनंजय मेंगाणे, शिक्षणविस्तार अधिकारी एकनाथ कांबळे,विक्रम वागरे, सचिन देसाई, जोतीराम पाटील,भीमराव रेपे, प्रकाश पाटील, संभाजी पाटील, बी.के. पाटील, संतोष भोसले, दिलीप पाटील, आनंदा सावंईकर, संजय पाटील, एस.के.कुंभार, तालुक्यातील मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.सूत्रसंचालन एन.डी.बोबडे यांनी तर आभार सुवर्णा बरगे यांनी मानले.

निराधार ज्येष्ठ नागरिकांना सात हजार रुपये पेन्शन द्या–पाटील

जयसिंगपूर,ता.५(प्रतिनिधी)-

.....

निराधार ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने त्यांना दरमहा सात हजार रुपये पेन्शन द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश ज्येष्ठ नागरिक सेवा महासंघाच्या कोल्हापूर प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष आर.आय. पाटील यांनी केली.


जयसिंगपूर येथील डॉ. बी. टी. पाटील (अंकलीकर) ज्येष्ठ नागरिक सेवा संघाच्या विरंगुळा केंद्रात शिरोळ तालुक्यातील १४ ज्येष्ठ नागरिक सेवा संघांची कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी इब्राहिम खान होते.यावेळी महावीर पाटील यांनी संभाजीपूर येथील ज्येष्ठ नागरिक सेवा संघाच्या तेरा वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला.अशोक तोडकर यांनी संघटना स्थापन व संघटनात्मक कामकाजाबाबत मार्गदर्शन केले. पृथ्वीराज किणीकर यांनी डिजिटल साक्षरतेचे महत्व प्राप्त्विक्षिकांसह सांगितले . प्रास्ताविक श्रीकांत गुजर यांनी केले. बी.बी.गुरव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.डी.आर. खामकर,शशिकला चौधरी व बी.ए.तेलराठे यांनी मनोगते व्यक्त केली. अनिल जाधव यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अनिल जाधव व प्रकाश देसाई यांनी केले. कार्यशाळेस तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक सेवा संघांचे पदाधिकारी उपस्थित होते.

'शरद'च्या कृषी कन्यांचे साजणीतील शेतकऱ्यांना प्रशिक्षण

साजणी,ता.५(वार्ताहर)-

.....

साजणी येथे शरद कृषी महाविद्यालय जैनापुरच्या विद्यार्थिनी कृषी कन्या प्रशिक्षणासाठी दाखल झाल्या आहेत. त्यांचे स्वागत ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले.



साजणी येथे शरद कृषी महाविद्यालय जैनापुरच्या कृषी कन्यांचे स्वागत प्रसंगीचे छायाचित्र.


सदर विद्यार्थीनी अभ्यासक्रमानुसार दहा आठवड्याच्या कालावधीत साजणी गावात वास्तव्य करून येथील शेतकऱ्यांच्या पीक पद्धतीचा अभ्यास तसेच शेती विषयक माहिती, नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकांसह देणार आहेत.

यावेळी कृषी कन्या सृष्टी ऑदि, समीक्षा भानुसे, देवयानी खोत, स्वप्नाली कोळी, सृष्टी राजगादे, राजलक्ष्मी देसाई यांनी उपक्रमाची माहिती दिली.

बाप्पासंगी सरपंच शिवाजी पाटील, ग्रामपंचायत अधिकारी शशिकांत कांबळे,तलाठी गजानन माळी, कृषी मित्र अशोक कोणीर, कृषी अधिकारी रामदास पाटील व शेतकरी ग्रामस्थ उपस्थित होते.

या उपक्रमासाठी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ.एस.एस.पाटील, उपप्राचार्य एस.एच.फलके , डॉ.आर.टी.कोळी,कार्यक्रमाधिकारी डॉ.प्रा.के.एस.जाधव यांचे मार्गदर्शन लाभत आहे.















बावचीत छ.शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे लोकार्पण

कट्टर विरोधक आ.जयंत पाटील-आ.गोपीचंद पडळकर एकाच स्टेजवर; गावात प्रचंड राजकीय तणावाचे वातावरण

आष्टा,ता.५(प्रतिनिधी)-

आमदार जयंतराव पाटील व आमदार गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांमधील प्रचंड घोषणाबाजी, राजकीय तणाव, पोलिसांची धावपळ,फटाक्यांची आतषबाजी व अत्याधुनिक डिजिटल विद्युत रोषणाईने आसमंत उजळीत बावची (ता.वाळवा) येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमात आम. जयंत पाटील व आम. गोपीचंद पडळकर यांनी एकाच व्यासपीठावर येत शाब्दिक फटकेबाजी केली.बावेकी आ.जयंत पाटील, आमदार सतेज पाटील, पदवीधर आ.हर्षद देशमुख जाधव, सरपंच कविता अनुसे, उपसरपंच संजय लाटणे, सुवा नेते लालासो अनुसे यांच्या उपस्थितीत पुतळ्याचे लोकार्पण झाले.बानंतर सभा सुरू झाल्यानंतर आमदार गोपीचंद पडळकर व सदाभाऊ खोत यांचे आगमन झाले.बावेळी पडळकर समर्थकांनी एकच छंद गोपीचंद या घोषणांचा जोर धरला.तर आ.जयंत पाटील समर्थकांनी घरचंच मैदान असल्याने जयंत पाटील बाघ हाय बाघ अशी घोषणाबाजी सुरु केली. दोनही समर्थकांनी घोषणाबाजी केल्याने परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता. बावेळी आमदार जयंत पाटील यांनी माईक हाती घेत कार्यकर्त्यांना



बावची येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे लोकार्पण करताना आम.जयंत पाटील, आम.हर्षद देशमुख, आम. सतेज पाटील, लालासाहेब अनुसे व मान्यवर

शांत राहण्याचे आवाहन केले व व्यासपीठावर आमदार पडळकर यांचा सत्कार करण्याची विनंती आयोजकांना केली.

आम.पडळकर म्हणाले, छ.शिवाजी महाराजांनी स्वत:च्या हिमतीवर घराणेशाही मोडीत काढली. वेढा कसा जरी पडला तरी बाहेर कसं पडायचं हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्याकडून शिकायचं. प्रत्येकाच्या आयुष्यात वेढे पडत असतात त्याला घाबरायचं नसतं,पळायचं नसतं शत्रूच्या घरात शिरून कार्यक्रम करायचा असतो.

आम.सतेज पाटील म्हणाले,"गोकुळच्या राजकारणात मलाही अनेकांनी राजकीय वेढा घातला होता.त्या वेढ्यातून कसं बाहेर पडायचं याची शिकवणही आ.जयंत पाटील यांच्याकडून मला मिळाली."

आ.जयंत पाटील यांनी घोषणाबाजी सुरू असताना आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करणे हे आपले कर्तव्य आहे. ही महाराजांची शिकवण आहे. आम्ही त्याच शिकवणीने राज्यकारभार करीत आहोत असे सांगत पडळकर यांनी भाषणात महाराजांनी अफजलखानाचा गनिमी काव्याने पन्हाळगाढावर कोथळा फाडला असा उल्लेख केला होता हाच धागा पकडत जयंत पाटील म्हणाले, महाराजांनी अफजलखानाचा कोथळा पन्हाळगाढावर नव्हे तर प्रतापगढाच्या पायथ्याशी फाडला. तोंडपाठ भाषण करण्यापेक्षा अभ्यासपूर्ण भाषण करावे, असा टोला लगावला. बलाढ्य शक्तीच्या विरोधात कसं लढायचं याची उदाहरणे महाराजांनी घालून दिली आहेत. लढणाऱ्याच्या मागे महाराष्ट्र उभा राहतो मला खात्री आहे ही परंपरा महाराष्ट्र जपेल. त्यांच्या विचाराच्या मागंनि राज्याचा विकास करण्याची ताकद आम्हा सर्वांना येईल.तुम्ही साथ द्या, असे आवाहन केले. बावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा संगीता पाटील, वैभव शिंदे, नगराध्यक्ष विशाल शिंदे, राजारामबापू बँकेचे अध्यक्ष विजयराव वाटव,वैभव रकटे, काकासाहेब कोकाटे, संभाजी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

एक एक को चुन चुन के...

आमदार जयंत पाटील म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर तुम्हाला सांगतो,सरकार बदलल्यानंतर एक एक को चुन चुन के....., पोलिसांना सांगतो.. न्याय बुद्धीने वागतात तर तुमचा हा तालुका सत्कार करेल. आमी कपी शेरवाजी करत नाही, दंगा करत नाही. कायद्याचं काम करण्यासाठी महाराष्ट्राचा मंत्रिमंडळात १८ वर्षे काम केलं, पण मी कपी कुणावर अन्याय केला नाही. कपी मस्ती कुणावर माजली नाही. कुणावर मस्ती केली नाही. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज ज्या न्यायने काम करीत होते. तीच भूमिका घेऊन आम्ही काम करीत आलो आहे कारण आमची प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराज आहेत. असे म्हणताच उपस्थितांनी जोरदार घोषणाबाजी व टाळ्यांचा कडकडाट केला.

जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु

सांगली,ता.५(प्रतिनिधी)-

सांगली जिल्ह्यात पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारणासाठी बाधित गावांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबतचे स्थानिक पालळीवर खाजगी विहिरी व बोअरचे अधिग्रहण करून पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्यावर भर दिला जात आहे.

५० खाजगी व ७ शासकीय अशा एकूण ५७ टँकरद्वारे ५८ गावे व ४१५ वाड्यावाडीत १ लाख २१ हजार ६३६ बाधित लोकसंख्येला व ११ हजार ३४६ पशुधनासाठी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे. जत तालुक्यातील टंचाईग्रस्त ४९ गावे व ३४६ वाड्यांमधील सुमारे १ लाख ४ हजार, २५६ लोकसंख्येला ४८ टँकरद्वारे (४२ खाजगी व ६ शासकीय) पाणी पुरवले जात आहे. टंचाईवर मात करण्यासाठी तालुक्यात २० खाजगी विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. कवठेमहांकाळ तालुक्यातील टंचाईग्रस्त १ गाव व ८ वाड्यांमधील १८३४ लोकसंख्येसाठी १ शासकीय टँकर सुरू आहे. नळ पाणी पुरवठा योजनेच्या विहिरीतील पाणीसाठा अत्यंत कमी झाल्यामुळे २ खाजगी विहिरी अधिग्रहण करण्यात आल्या आहेत. तासगाव तालुक्यातील टंचाईग्रस्त १ गाव व ६ वाड्यांमधील ८५५ लोकसंख्येला १ खाजगी टँकरद्वारे पाणी पुरवले जात आहे.आटपाडी तालुक्यातील टंचाईग्रस्त ७ गावे व ५५ वाड्यांमधील १४६९१ नागरिकांना आणि ११३४६ पशुधनाला ७ खाजगी टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ५ लाखाचा धनादेश सुपूर्त करताना सांगलीचे महापौर धीरज सूर्यवंशी.

शिराळा बाजार समितीच्या सभापती पदी पांडुरंग गायकवाड

शिराळा,ता.५(प्रतिनिधी)-

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी येळापूर-चव्हाणवाडी येथील पांडुरंग शंकर गायकवाड, तर उपसभापतीपदी कणद्र येथील आनंदा रंगराव पाटील यांची बिनविरोध निवड झाली.माजी राज्यमंत्री शिवाजीराव नाईक व सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष, माजी आमदार मानसिंगराव नाईक यांच्या उपस्थितीत निवडी पार पडल्या.

बाजार समितीच्या कार्यालयात बैठक संपन्न झाली. मावळते सभापती व उपसभापती यांनी राजीनामे दिल्याने या दोनही जागा रिक्त झाल्या होत्या. दोनही जागेसाठी प्रत्येकी एक अर्ज आल्याने दोघांच्या निवडी बिनविरोध झाल्याचे सहाय्यक निबंधक अर्जुन कदम यांनी जाहीर केले.

या निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार माजी राज्यमंत्री शी. नाईक, माजी आमदार मानसिंगभाऊ व जिल्हा बँकेचे संचालक रणधीर नाईक यांच्या हस्ते करण्यात आला. मावळते अध्यक्ष पोपट वरपाले, उपाध्यक्ष विजय महाडिक तसेच किसन भाटे, सुजित देशमुख, सुरेश पाटील, जयश्री पाटील, सुनंदा पाटील,संदीप चोरगे, हरिभाऊ पावणे,संग्राम पवार, मारुती कांबळे, संजय सावंत, मुनीर डांगे, प्रताप दिलवाले, वाशीम मोमीन, कार्यालय अधीक्षक विलास माळी आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्ह्यातील ३४ हजार शेतकरी कर्जमुक्त

सातारा,ता.५(प्रतिनिधी)-

सातारा जिल्ह्यातील एकूण ५१४५३ कर्ज खात्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून त्यापैकी ४१५२६ पात्र शेतकऱ्यांची यादी प्रसिध्द करणेत आलेली आहे. त्यापैकी ३६४३१ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण (ई-केवायसी) पूर्ण केलेली आहे. आधार प्रमाणीकरण केलेल्या शेतकऱ्यांपैकी ३४५८१ शेतकऱ्यांना रु.२५२.८८ कोटी इतक्या रक्कमेचा लाभ प्राप्त झालेला आहे.

यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या तीन्ही याद्यांमध्ये मिळून सातारा जिल्हातील २९७७५ लाभार्थी शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यामध्ये रक्कम रुपये २१९.९० कोटी रुपये एवढी रक्कम प्राप्त झालेली आहे.ता.४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या चौथ्या यादीमध्ये आधार प्रमाणीकरण झालेल्या शेतकऱ्यांपैकी ४७७६ शेतकऱ्यांना ३२.९८ कोटी रुपये रक्कमेचा

चौथी यादी जाहीर; २५२.८८ कोटींचा लाभ



लाभ देण्यात आलेला आहे. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सातारा यांचे ३७८३ शेतकऱ्यांना रक्कम रुपये २२ कोटी व राष्ट्रीयकृत व इतर व्यापारी बँकांना मिळून १०९३ शेतकऱ्यांना १०.९८ कोटी रुपये रक्कमेचा लाभ देण्यात आलेला आहे.

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील २९६०१ शेतकऱ्यांना रक्कम रुपये २०५.७२ कोटी एवढ्या रक्कमेचा लाभ देण्यात आलेला आहे. तसेच राष्ट्रीयकृत व व्यापारी बँकांच्या ४९८० शेतकऱ्यांना ४७.१६ कोटी रुपये असे एकूण सातारा जिल्हातील ३४५८१ शेतकऱ्यांना २५२.८८ कोटी रुपयांचा लाभ प्राप्त झालेला आहे.त्यामुळे सातारा जिल्हातील ३४५८१ शेतकरी कर्ज मुक्त होवून पिक कर्ज घेण्यास पात्र झाले आहेत.

प्रसिध्द झालेल्या यादीतील सुमारे ५०९५ शेतकऱ्यांनी अद्याप ही त्यांचे आधार प्रमाणिकरण केलेले नाही. व २८१९ शेतकऱ्यांचे फार्म आवडी नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा संजयकुमार सुद्रिक यांनी आशा शेतकऱ्यांना त्यांचे फार्म आवडी काढून घ्यावेत व आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे. म्हणजे सदर कर्ज मुक्ती योजनेचा लाभ त्यांना तातडीने मिळणेस सुलभ होईल असे आवाहन केले आहे.

महाबळेश्वर अर्बन बँकेची वार्षिक सभा खेळीमेळीत

महाबळेश्वर,ता.५(प्रतिनिधी)-

महाबळेश्वर तालुक्याची अर्थवाहिनी दि महाबळेश्वर अर्बन को-ऑप बँकेची ९१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन चंद्रकांत उर्फ सी.डी.बावळेकर यांचे अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

बावेळी व्यासपीठावर व्हा. चेअरमन नदीम शरवान,संचालक राजेश कुंभारदरे,शरद बावळेकर, सतीश ओंबळे,उपालई ओंबळे, जावेद वलगे, मनीषा पारठे,प्रशांत कावट,संपत जाधव,अनिल साळुखे, तज्ञ संचालक मिलींद देवे, मुख्य व्यवस्थापक फकीर वलगे,अँड.संजय जंगम,अँड. व्ही.एन.भोईटे आदी उपस्थित होते. चेअरमन सी.डी. बावळेकर म्हणाले, संस्थेने अहवाल सालात उल्लेखनीय कामकाज करताना ५३ कोटींचा व्यवसाय केला आहे. तसेच थकबाकी वसुली रू.१



दि महाबळेश्वर अर्बन को-ऑप बँकेच्या वार्षिक सभेत बोलताना चेअरमन सी.डी.बावळेकर, शेजारी उपस्थित अन्य मान्यवर.

कोटी ६५ लाख केलेली आहे. तसेच भाग भांडवलामध्ये रू. १८ लाखाने वाढ केलेली असून संस्थेस अहवाल सालात नफा रू. ८१.६३ लाख झालेला आहे.बँकेच्या वतीने सभासद समृद्ध अपघात विमा योजनेअंतर्गत रू. ३.०० लाखाचा धनादेश के. संतोष वसंत कोंडाळकर यांचे कुटुंबीयांना चेअरमन व संचालक मंडळाचे हस्ते प्रदान करण्यात आला.सूत्रसंचालन, इतिवृत्त वाचन, ऑडिट रिपोर्ट वाचन मुख्यव्यवस्थापक फकीर वलगे यांनी केले.संचालक समीर सुतार यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. अहवाल वाचन संचालक अँड. सतीष ओंबळे यांनी केले

या सभेस प्रभाकर कुंभारदरे, प्रभाकर देवकर,अंकुश बावळेकर, विजय नायडू,अशोक फळणे,राजेंद्र पवार,दिपक बावळेकर, नगरसेवक, संतोष शिंदे,असिफ मुलाणी, मुबारक शेख,मेघा चोरगे,वृषाली डोईफोडे आदींसह मान्यवर उपस्थित होते. आभार जावेद वलगे यांनी मानले.

दीपावली वस्तूंच्या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

सांगली,ता.५(प्रतिनिधी)-

जिल्हा परिषद सांगली व जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या दीपावली वस्तूंच्या प्रदर्शन व विक्री उपक्रम माला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या प्रदर्शनात जिल्हाातील २४ विशेष शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून, तब्बल ३५ हजार रुपयांपर्यंतची विक्री झाली.

विद्यार्थ्यांनी स्वत:च्या कल्पकतेतून, कलाकौशल्यातून आणि मेहनतीतून तयार केलेल्या विविध आकर्षक वस्तूंचे प्रदर्शन जिल्हा परिषदेच्या आवारात आयोजित करण्यात आले होते . या प्रदर्शनाचे उद्घाटन समाजकल्याण सभापती दादासाहेब कोळेकर यांच्या हस्ते आणि जिल्हा



दीपावली वस्तूंच्या प्रदर्शनाचे उद्घाटनप्रसंगी दादासाहेब कोळेकर,विशाल नरवाडे व इतर प्रमुख मान्यवर.

परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव, जिल्हा कृषी अधिकारी मनोज वेताळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुनीता ढवळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नानासाहेब हजारे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी संदीप



यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.



मृत व्यक्तींच्या वारसांना आर्थिक मदतीचा धनादेश देताना आ. डॉ.सुरेश खाडे,तहसीलदार अपर्णा धुमाळ आदी मान्यवर.

वेचले विकास सोसायटीकडून सभासदांना १५ टक्के लाभांश

सातारा,ता.५(प्रतिनिधी)-

सातारा तालुक्यातील वेचले विकास सेवा सोसायटी लि., वेचले या संस्थेने सभासदांची दिवाळी गोड केली आहे. संस्थेच्या वतीने सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला असून, लाभांश रकमेस सभासदांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन प्रमोद जाधव व व्हाईस चेअरमन राहुल खामकर यांनी दिली आहे.

संस्थेच्या नवीन इमारतीचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. बांधकाम लवकरच पूर्ण होणार असून नवीन इमारतीमुळे संस्थेच्या कामकाजाला गती आणि सभासदांना अधिक चांगल्या सेवा मिळणार आहे. संस्थेच्या वतीने सभासदांसाठी विशेष अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. या दौऱ्याच्या माध्यमातून सभासदांना विविध सहकारी संस्थांचे कामकाज, आधुनिक व्यवस्थापन पद्धती आणि शेतीविषयक उपक्रमांची माहिती घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे सभासदांच्या ज्ञानात भर पडून संस्थेच्या भविष्यातील प्रगतीसाठी नवी दिशा मिळेल, असा विश्वास चेअरमन जाधव यांनी व्यक्त केला.

मनपाच्या शाळा क्र.३६ मध्ये स्वच्छतागृहाची सुविधा

सांगली,ता.५(प्रतिनिधी)-

येथील विवेकानंद सोसायटीतील महापालिकेच्या शाळा क्रमांक ३६ मधील अंगणवाडीतील चिमुकल्यांची स्वच्छतागृहाअभावी होणारी गैरसोय आता दूर झाली आहे.

जायंट्स ग्रुप ऑफ सांगली पर्लच्या वतीने अंगणवाडीला स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या सामाजिक उपक्रमासाठी नीलिमा काळे यांनी विशेष सहकार्य केले. बावेळी जायंट्स फेडरेशनच्या अध्यक्षा अनुजा पाटील, उपाध्यक्षा स्नेहलता कुलकर्णी, नीलिमा काळे, अंगणवाडी प्रकल्प अधिकारी सतीश नवले, जया जोशी, नगरसेवक विष्णू माने, रंजना साळे, वैशाली कुलकर्णी, कांचन पाटील, रोहिणी मंगल, भारती कलगुटगी,सुरेखा मिरजकर आणि मुख्याध्यापक डोरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

गावनिहाय पाणी उपलब्धतेचा वस्तुनिष्ठ आढावा घ्या

आ.सत्यजित देशमुख यांची बैठकीत सूचना

शिराळा,ता.५(प्रतिनिधी)-

तालुक्यातील पाणीटंचाईचा प्रश्न गांभीर्याने घेत आमदार सत्यजित देशमुख यांनी प्रशासकीय अधिकारी आणि ठेकेदारांची चांगलीच कानउघाडणी केली. पाण्याच्या प्रश्नावरून मला कोणाकडूनही 'नाही' हा शब्द ऐकायला नको. केवळ कागदोपत्री घोडे नाचवू नका, तर प्रत्यक्ष काम करून दाखवा, अशा स्पष्ट शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांना सुनावले.

शिराळा तहसीलदार कार्यालयात सरपंच, ग्रामसेवक तसेच विविध शासकीय विभागातील अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आयोजित पाणीटंचाई आढावा बैठकीत ते बोलत होते. बावेळी तालुक्यातील दुष्काळजन्य परिस्थिती, पिण्याच्या पाण्याचे नियोजन, शेतीसाठी पाणी, महावितरणचा



शिराळा तहसिलदार कार्यालयातील आढावा बैठकीप्रसंगी आम. सत्यजित देशमुख,समवेत सरपंच,ग्रामसेवक व इतर अधिकारी.

वीजपुरवठा आणि जलजीवन मिशनच्या कामांचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला.

आ.देशमुख पुढे म्हणाले,पिण्याच्या पाण्याची कामे अपूर्ण ठेवणाऱ्या अधिकारी आणि ठेकेदारांची गय केली जाणार नाही. गावोगावी जाऊन पाणीपुरवठ्याच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करा. कामात कसूर करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच गावनिहाय पाणी उपलब्धतेचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन त्यानुसार नियोजन करण्याच्या सूचना दिल्या.

भूजल पातळीच्या माहितीवरून अधिकाऱ्यांना सूचना देताना, जुन्या माहितीच्या आधारे नियोजन करू नका. प्रत्येक गावातील जमिनीतील पाण्याच्या साठ्याची वस्तुस्थिती लक्षात घेऊन माहिती घ्या. शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध होण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्या, असेही त्यांनी स्पष्ट केले.जलजीवन मिशन आणि महावितरणमधील ठेकेदारांच्या कामकाजाबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. ६० ते ८० टक्के कामे झाल्याची माहिती दिली जात असली, तरी कामे वेळेत पूर्ण होत नसल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत. कामात दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांवर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करावी. शेतीसाठी महावितरणने सलग वीजपुरवठा करावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

जलजीवन मिशन अंतर्गत तालुक्यासाठी आतापर्यंत ७० ते ८० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. मात्र, निधी उपलब्ध असूनही अनेक गावांमध्ये कामे अपूर्ण आहेत. त्यामुळे एकाही घराला पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागता कामा नये याची दक्षता घ्यावी, असे आमदार देशमुख यांनी अधिकाऱ्यांना बजावले.

म्हैसाळ येथील अपघातग्रस्तांच्या वारसांना प्रत्येकी १ लाखाची मदत

मिरज/म्हैसाळ,ता.५(प्रतिनिधी)-

मिरज-पंढरपूर महामार्गावर ता. १३ एप्रिल २०२५ रोजी कुची फाटा (ता. कवठेमहांकाळ) येथे झालेल्या अपघातात मृत्यू झालेल्या म्हैसाळ येथील ४ व्यक्तींच्या वारसांना महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी १ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे.

आ.डॉ.सुरेश खाडे यांच्या माध्यमातून संबंधित मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळावी, वासाठी पाठपुरावा केला. त्यानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून चारही मृतांच्या वारसांना प्रत्येकी १ लाख रुपयांचे धनादेश वितरीत झाले.बावेळी मिरज तहसीलदार डॉ.अपर्णा धुमाळ-मोरे, भाजपचे सरचिटणीस धनंजय कुलकर्णी,नगरसेवक मोहन वाटवे, मिरज ग्रामीण दक्षिण मंडल अध्यक्ष अभिजीत गौराजे, नाना कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

महापौर धीरज सुर्यवंशी यांची मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देणगी

सांगली,ता.५(प्रतिनिधी)-

राज्यातील दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे महापौर धीरज सूर्यवंशी यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस पाच लाख रुपयांची देणगी दिली. या सेवाभावी उपक्रमाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केले. बावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आ. गोपीचंद पडळकर उपस्थित होते.

महापौर धीरज सूर्यवंशी यांचा स्वत:चा वाहदिवस मोठ्या थाटामाटात साजरा करण्याऐवजी अनावश्यक खर्च टाळून तो दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी देण्याचा त्यांचा हा निर्णय सामाजिक बांधिलकी जपणारा ठरला आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा संकटाच्या काळात आनंदोत्सवापेक्षा गरजूंच्या मदतीला प्राधान्य देणे आवश्यक असल्याची भावना धीरज सूर्यवंशी यांनी आपल्या कृतीतून व्यक्त केली आहे.

कागल पश्चिम भागातील खरीप पिके करपली

अल्प भूधारक शेतकरी संकटात; तालुक्यात दुष्काळ जाहिर करण्याची मागणी

मुरगूड,ता.५(प्रतिनिधी)-

कमी पावसामुळे कागल तालुक्याच्या पश्चिम भागातील डोंगराळ परिसरातील खरीप हंगाम पूर्णपणे संकटात सापडला आहे. पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या हजारो हेक्टर क्षेत्रातील भात,भुईमूग,सोयाबीन आणि नाचणी ही पिके करपून गेली आहेत. कष्टाने पिकविलेली शेती हातची गेल्याने अल्पभूधारक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे संपूर्ण कागल तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी मुरगूड येथील शेतकरी संघटनेने केली आहे.

कागल तालुक्यातील चिमगाव, ठाणेवाडी, बोळावी, जखवेवाडी, बोळवाधीवाडी, हळदी, बेलिए,करंजिवने,केलेवाडी, कासारी, हासूर सेनापती, कापशी, बाळेघोल, तमणाकवाडा, माद्याळ, हणबरवाडी, अर्जुनी, उंदरवाडी, सोनाळी, पिराचीवाडी, सावर्डेबुद्रुक, सावर्डे खुर्द, चौंडाळ, साके, खानाळी, केनवडे, गोरंबे, मुरगूड, बगणे, हमीदवाडा, बामणी, सोंडूर, एकोंडी यांसह पश्चिम भागातील ७० ते ८० गावातील शेतकऱ्यांना पावसाअभावी मोठा फटका बसला आहे. डोंगर उतारावरील आणि पावसावर अवलंबून असणाऱ्या जमिनीतील पिके जळून गेल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.



मुरगूड परिसरातील शेतातील वाळलेली पिके

तालुक्यातील बारमाही सिंचनाखालील जमिनी आणि डोंगराळ भागातील कोरडवाहू शेती यांच्यात मोठी तफावत आहे. मोठ्या शेतकऱ्यांच्या तुलनेत गुंठा-दोन गुंठ्यांवर शेती करणारा अल्पभूधारक शेतकरी अधिक अडचणीत आहे. वाढती महागाई, दिवाळीचा खर्च, मुलांची शैक्षणिक फी आणि दहावी-बारावीच्या परीक्षा शुल्कामुळे शेतकरी कुटुंबाची आर्थिक कोंडी झाली आहे. मुलांची फी भरावी की घरखर्च भागवावा, असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला आहे.

खरीप पिकहानाशी आल्यानंतर दिवाळीच्या काळात ग्रामीण बाजारपेठांमध्ये आर्थिक उलाढाल वाढते. मात्र यंदा पिकांचे नुकसान झाल्याने मुरगूड, गारगोटीसह अन्य बाजारपेठांमध्ये मंदीचे वातावरण आहे. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. मुरगूड येथील हुतात्मा तुकाराम चौकात झालेल्या शेतकरी संघटनेच्या बैठकीत कागल तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीवर चर्चा करण्यात आली. गावनिहाय पीक नुकसानीची पाहणी करून संपूर्ण तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

बैठकीस सुरेश साळोखे,राणोजी गोपडे, अमोल मेटकर,संदीप भारमाल, कॉ.अशोक चौगले, चंद्रकांत हळदकर,नामदेव खंडागळे, विजय आढाव,राजू भारमाल, गजानन साळोखे,समाधान हेंदळकर, अण्णा कदम, पांडुरंग खंडागळे, राजाराम राणे, श्रीमंत महाजन, बबन बाबर, संदीप पाटील, सातापा मेटकर, शशिकांत चौगले, राम सातवेकर, गजानन मोरबाळे, केरबा खंडागळे, सचिन मेंडके, सचिन भारमाल, प्रकाश मेंडके, प्रशांत मोरबाळे, गौतम कांबळे, दत्तात्रय लोखंडे, संतोष मेंडके, सुनील पराट, उदय भोसले, राजबा भोसले,संतोष भोसले आदी उपस्थित होते.

डेंग्यूसदृश रुग्ण आढळल्यानंतरच ग्रामपंचायत प्रशासनाची सतर्कता

बुवनाळ,ता.५(वार्ताहर)-

शिरोळ तालुक्यातील औरवाड येथे डेंग्यूसदृश आजाराचे रुग्ण आढळल्यानंतर आरोग्य विभाग व ग्रामपंचायत प्रशासनाला अचानक जाग आली आहे. गावात रुग्ण सापडल्यानंतर प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू करण्यात आल्याने,''प्रशासन गावात साथरोग पसरण्याची किंवा निष्पाप नागरिकांचा जीव जाण्याची वाट पाहत होते का?''असा संतप्त सवाल औरवाड मधील जनतेतून विचारला जात आहे. प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.



औरवाडमधील जनतेतून तीव्र संताप

गावातील गटारींची वेळेवर स्वच्छता करणे,घरोघरी नियमित कचरा उठाव करून त्याची योग्य विल्हेवाट लावणे,डासांची उत्पत्ती होवू नये म्हणून नियमित गप्पीगप्पी डास प्रतिबंधक औषध फवारणी करणे आदी ग्रामपंचायतीची प्राथमिक कर्तव्ये आहेत. मात्र औरवाड जुन्या पुलाजवळ साठलेला कचऱ्याचा ढीग गावात ठिकठिकाणी तुंबलेल्या गटारी,अस्वच्छता, साचलेले पाणी यामुळे डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर वाढली होती. वातच कचऱ्याचे ढिग उघड्यावरच जाळले जात असल्यामुळे हवेचे प्रदूषण होत होते. ग्रामस्थांनी वारंवार अनेकदा स्वच्छता करण्याची मागणी करूनही ग्रामपंचायत प्रशासनाने याकडे सपशेल दुर्लक्ष केले. अखेर गावात डेंग्यूसदृश रुग्ण आढळून आल्यानंतरच ग्रामपंचायत व आरोग्य यंत्रणेने धावपळ सुरू केल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

गावात डेंग्यूचा प्रादुर्भाव झाल्याचे स्पष्ट होताच आरोग्य विभागाने तातडीने पावले उचलत संशयित तापाच्या रुग्णांचे रक्ताचे नमुने तपासणीसाठी घेतले आहेत. आरोग्य सेविका आणि आशा वर्कर्समार्फत घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले जात आहे. डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी धूर फवारणी आणि औषध फवारणी करण्यात येत आहे. हीच खबरदारी जर यापूर्वीच घेतली असती तर गावात डेंगूसदृश आजाराचा फैलाव झाला नसता, अशी चर्चा ग्रामस्थांमधून सुरु आहे. ''दरवर्षी पावसाळ्यानंतर डासांचा प्रादुर्भाव वाढतो हे माहीत असतानाही प्रशासन आधीच पावले का उचलत नाही? एखादा रुग्ण गंभीर झाल्यावरच फवारणी का केली जाते?'' असा सवाल स्थानिक ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. केवळ रुग्ण आढळल्यावर धावपळ न करता, गावात नियमित स्वच्छता आणि औषध फवारणी करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.



पुशिरे येथे दालमिया साखर कारखान्याचे ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टर अडवताना कार्यकर्ते

दालमियाची ऊस वाहतूक शेतकरी संघटनेने रोखली

कारखाना कर्मचारी अन् कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची

बाजारभोगाव,ता.५(वार्ताहर)-

ऊसदराचा प्रश्न अद्याप मार्गी लागलेला नसतानाच आसुर्ले-पोर्ले येथील दत्त दालमिया साखर कारखान्याला ऊस पुरवठा करणारी वाहतूक सुरू झाल्याने शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. पन्हाळा तालुक्यातील पुशिरे येथे शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कारखान्याला ऊस पुरवठा करणारे ट्रॅक्टर अडवून धरल्याने परिस्थिती काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

ऊसदराचा प्रश्न निकाली निघाल्याशिवाय ऊसतोडणी आणि वाहतूक सुरू करू नये, असा इशारा शेतकरी संघटनेकडून वारंवार देण्यात आला होता. मात्र, हा इशारा धुडकावून काही ठिकाणी ऊसतोडणी सुरू असल्याचा आरोप संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.वाच पार्श्वभूमीवर पुशिरे येथे दालमिया कारखान्याकडे ऊस घेऊन जाणारे ट्रॅक्टर कार्यकर्त्यांनी अडवले. घटनेची माहिती मिळताच कारखान्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी सध्या ट्रॅक्टर सोडून द्यावेत, अशी विनंती कार्यकर्त्यांकडे केली. मात्र,ऊसदराचा प्रश्न अद्याप सुटलेला नसताना कारखान्याने ऊसतोडणी सुरूच का केली?असा सवाल उपस्थित करत कार्यकर्त्यांनी कर्मचाऱ्यांना धारेवर धरले. वावेकी दोन्ही बाजूंकडून जोरदार शाब्दिक खडाजंगी झाली.काही काळ बाचाबाची झाल्याने घटनास्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

एकीकडे ऊस उत्पादक शेतकरी योग्य दरासाठी संघर्ष करत असताना दुसरीकडे कारखान्यांची ऊसतोडणी सुरू असल्याने शेतकरी संघटना आणि कारखानदार यांच्यातील संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.पुशिरे येथील घटनेनंतर आता कारखाना प्रशासन ऊसदराच्या प्रश्नावर कोणती भूमिका घेणार आणि शेतकऱ्यांना न्याय दर कधी मिळणार, याकडे ऊस उत्पादकांचे लक्ष लागले आहे.

दराचा प्रश्न सुटेपर्यंत ऊसतोडणी नको

शेतकऱ्यांच्या थामाला योग्य मोबदला मिळावा, यासाठी शेतकरी संघटना ऊसदराच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत आहेत.शेतकऱ्यांनी आपल्या हक्काचा दर मिळण्यासाठी घाईघाईने ऊसतोडणी करू नये,असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे. दराचा प्रश्न प्रलंबित असताना कारखान्याकडून जाणीवपूर्वक ऊसतोडणी आणि वाहतूक सुरू केली जात असल्याचा आरोपही कार्यकर्त्यांनी केला.

तीस वर्षांपासून वाघोबावाडी रस्त्याचे काम रखडले

संतप्त ग्रामस्थांकडून रस्त्याची पूजा करून अनोखे आंदोलन

...अन्यथा सर्व निवडणूकांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा

सांगरूळ,ता.५(प्रतिनिधी)-

आमशीपैकी वाघोबावाडी (तालुका करवीर) येथे गेली ३० वर्षे रस्त्याचे काम रखडले आहे. यामुळे विद्यार्थी नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून संतप्त झालेल्या महिला ग्रामस्थांनी खराब झालेल्या रस्त्याचे पूजन करून आंदोलन केले. रस्ता तातडीने न केल्यास येणाऱ्या सर्व निवडणुकीमध्ये मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्धार व्यक्त केला.

सुमारे ७०० लोकसंख्या व ५०० मतदान असणाऱ्या या वस्तीवर तत्कालीन आमदार संपतराव पवार पाटील यांनी ३० वर्षांपूर्वी रस्ता केला होता. आमसी बेचून सुमारे अडीच किलोमीटर डोंगरात ही वस्ती आहे. वाहेत डोंगर व मोठी दरी आणि खराब रस्ता यामुळे अपघात होत आहेत. विद्यार्थ्यांना कोणतीही वाहतूकीची सुविधा नाही, यामुळे पायपीट करत आमशी येथे यावे लागते. रस्ता खराब असल्यामुळे सतरा विद्यार्थिनींना सायकली देता आलेल्या नाहीत.



रस्त्याचे पूजन करून अनोखे आंदोलन करताना वाघोबावाडीचे ग्रामस्थ

रस्ता खराब असल्यामुळे वाहतूकीची सोय नाही, मुलींना, विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास होत आहे. वस्तीवर मुलगी दिल्यास कोणी तयार नसल्यामुळे मुलांची लग्न होत नाहीत. तत्काळ तत्काळ रस्ता करावा.

– शोभा पाटील,महिला ग्रामस्थ.

तसेच पुढे धोंडेवाडी, गणेशवाडी, कसबा बीड,सातेरी देवस्थान असल्यामुळे राज्यभरातून हजारो भाविक वा टिकाणी येत असतात. यामुळे सर्वांची गैरसोय होत आहे. बातून संतप्त झालेल्या नागरिकांनी खराब रस्त्याचे हळदीकुंकू वाहून पूजन केले व शासनाच्या विरोधात घोषणा दिल्या.ताततीने रस्ता न केल्यास मतदारांनी आगामी सर्व निवडणुकांच्या मतदानवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे.

गेली तीस वर्षे रस्त्याला ठेंबर लागले नाही. निवडणुकीवेळी लोकप्रतिनिधी यांनी हनुमानाच्या पायरीची शपथ घेऊन निधी देऊ असे आश्वासन दिले होते. रस्ता खराब असल्यामुळे अपघात होत आहेत.विद्यार्थ्यीची गैरसोय होत आहे.ताततीने रस्ता करावा अन्यथा सर्व निवडणूकांमध्ये मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्धार केला आहे.


– प्रदीप पाटील युवा नेते

वावेळी ग्रामस्थ शंकर पाटील, ज्ञानदेव पाटील, प्रदीप पाटील, कृष्णा पाटील, रमेश पाटील,प्रकाश पाटील, शंकर पाटील, दत्तात्रय पाटील, धनाजी पाटील, मंगल पाटील, दगडूबाई पाटील, चांदणी पाटील, महिला उपस्थित होत्या.

साजणी सोसायटीच्या चेअरमनपदी दिपक पाटील

साजणी,ता.५(वार्ताहर)-

साजणी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्थेच्या



चेअरमनपदी दिपक दिनकर पाटील तर व्हा. चेअरमनपदी अनिमा तीमिनाक्षी शशिकांत पाटील यांची बिनविरोध निवड संचालक मंडळाच्या बैठकीत करण्यात आली.

अध्यासी अधिकारी म्हणून उपनिबंधक कार्यालय अधिकारक उदय उलपे यांनी काम पाहिले. याप्रसंगी संचालक जगन्नाथ पाटील, बापूसो पाटील, महादेव जाधव, कलगोंडा मागगावे, भरत पाटील, यांच्यासह सर्व संचालक कर्मचारी उपस्थित होते.

शहराच्या विकासासाठी भरघोस निधी देणार

खास.धनंजय महाडिक; ६० लाखांच्या रस्त्याचे लोकार्पण

कोल्हापूर,ता.५(प्रतिनिधी)-

केंद्र आणि राज्यात महायुतीची सत्ता असल्याने कोल्हापूर शहराच्या विकासासाठी महापालिकेला आगामी काळात भरघोस निधी उपलब्ध करून दिला जाईल. जनतेने महायुतीवर टाकलेला विश्वास सार्थ ठरवू, अशी ग्वाही खा.धनंजय महाडिक यांनी दिली. जुना वाशी नाका ते बुवा चौक या ६० लाख रुपये खर्चून तयार केलेल्या रस्त्याचा लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते.



रस्त्याच्या लोकार्पणप्रसंगी उपस्थित खास. धनंजय महाडिक व इतर.

उभा मारुती चौक ते साने गुरुजी वसाहत हा महत्त्वाचा मार्ग गेल्या २५ वर्षांपासून दुरवस्थेत होता. रस्त्याच्या कामासाठी पाठपुरावा केला. त्यानुसार ड्रेनेजसाठी उपमहापौर अक्षय जरग,माजी नगरसेवक उदय कोरणे आणि माजी उपमहापौर विक्रम जरग यांनी आमदार राजेश क्षीरसागर यांनी २० लाख,तर रस्त्यासाठी खासदार महाडिक यांनी ६० लाखांचा निधी दिला.

महाडिक यांच्या हस्ते रस्त्याचे लोकार्पण झाले.यावेळी भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक, उपमहापौर अक्षय जरग, नगरसेवक अजय इंगवले,अर्चना कोरगे, पूर्वा राणे, प्रसाद चव्हाण, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुजित चव्हाण,महेश जाधव उपस्थित होते. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे रहिवासी, व्यावसायिक आणि वाहनधारकांना त्रास होत होता. त्यांना दिलासा देण्यासाठी रस्त्याचे काम मार्गी लावल्याचे माजी उपमहापौर विक्रम जरग यांनी सांगितले. वावेळी माजी महापौर बाजीराव चव्हाण यांच्यासह नागरिक उपस्थित होते.



शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाला स्थगिती

महासंघाचे शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

बालिंगा,ता.५(प्रतिनिधी)-

राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांकडे कार्यरत लिपिक व सेवक यांचे त्याच शाळेतील माध्यमिक शाळांच्यामध्ये समायोजन करण्याचे आदेश शिक्षण विभागामार्फत दिले होते.

या विरोधात मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंच मध्ये याचिका दाखल करण्यात आली होती.या याचिकेवर झालेल्या सुनावणीनुसार सदर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाला स्थगिती देण्यात आली आहे.या बाबतचे निवेदन शिक्षणाधिकारी अशोक धुरी यांना देण्यात आले.

शिक्षण अधिकारी यांना भेटलेल्या शिष्टमंडळामध्ये, महासंघाचे राज्य सचिव राजेंद्र कोरे,राज्य सल्लागार एमडी पाटील, विभागीय शिक्षकेतर प्रमुख राजू पांढरबळे, जिल्हा शिक्षकेतर प्रमुख सागर जाधव, संजय चव्हाण, कुसुम पांढरबळे, अनघा कुलकर्णी, गीता चव्हाण इत्यादी उपस्थित होते.

वनराई बंधारे ठरताहेत मुक्या जीवांसाठी नवसंजीवनी

बाजारभोगाव,ता.५(वार्ताहर)-

एकीकडे उन्हाची तीव्रता वाढत आहे,तर दुसरीकडे जंगलातील नैसर्गिक ओढे,नाले आणि पाणवठे आटू लागल्याने वन्यप्राण्यांसमोर पाण्याचे संकट उभे राहत आहे.पाण्याच्या शोधात वन्यप्राण्यांना जंगलाबाहेर भटकंती करावी लागू नये, तसेच त्यांची तहान जंगलातच भागावी, या संवेदनशील भूमिकेतून पन्हाळा वनपरिक्षेत्र वन कार्यालयाने स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे.

वनक्षेत्रातील नैसर्गिक ओढ्यांवर वनराई बंधारे उभारणे आणि नैसर्गिक जलस्रोतांची स्वच्छता करण्याचा उपक्रममुळे जंगलात पाणीसाठ्यांचे पुनर्भरण होण्यास मदत होत आहे.त्यामुळे वन्य प्राण्यांसाठी हे बनराई बंधारे खऱ्या अर्थाने नवसंजीवनी ठरत आहेत.सध्या उन्हाची तीव्रता आणि पावसाची अनिश्चितता यामुळे जंगल परिसरातील अनेक नैसर्गिक जलस्रोतांमधील पाणीसाठा कमी होत आहे.जंगलात वास्तव्य करणारे गवे, रानडुक्कर,हरीण,साळिंदर यांसह विविध वन्यजीव पाण्यावर अवलंबून असतात. नैसर्गिक पाणवठे आटल्यास या मुक्या जीवांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. अशा परिस्थितीत वन्यप्राण्यांचे हाल होऊ नयेत, त्यांना जंगलातच पाणी उपलब्ध व्हावे,यासाठी पन्हाळा वनविभागाने नियोजनबद्ध प्रयत्न करून जंगलक्षेत्रात ३६ बनराई बंधारे बांधण्यात आले आहेत. त्याचबरोबर नैसर्गिक जलस्रोतांची स्वच्छता करून त्यांची पाणी साठविण्याची क्षमता वाढविण्याचे कामही केले जात आहे. यामुळे वाहून जाणारे पाणी अडविण्यास जमिनीत मुरण्यास आणि भूजल पुनर्भरणास मदत होत आहे.

जलसंधारण उपक्रमामुळे वन्यजीवांना जंगलातच मिळतोय पाण्याचा आधार



पन्हाळा वनविभागाच्या जलसंधारण उपक्रमाअंतर्गत बांधण्यात आलेल्या वनराई बंधाऱ्यात साठलेल्या पाण्याचा वन्यजीवांना चांगला आधार मिळत आहे.

''जंगलातील मुक्या जीवांना पाण्यासाठी जंगलाबाहेर भटकावे लागू नये,त्यांच्या वाट्याला तहान आणि उपासमार येऊ नये,यासाठी वनविभागाने उचललेले हे पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे.वनराई बंधाऱ्यांमधील पाणीसाठा आणि नैसर्गिक जलस्रोतांचे पुनर्भरण यामुळे वन्यजीवांना मोठा आधार मिळणार असून,जंगलातील जैवविविधता टिकविण्यासही मदत होणार आहे.''

बाळासो पाटील,कोलीक

जंगलातील वन्यप्राण्यांचे संरक्षण करणे ही वनविभागाची महत्त्वाची जबाबदारी आहे. जंगलातील प्रत्येक जलस्रोत हा वन्यजीवांच्या जीवनाचा आधार आहे. त्यामुळे वनसंवर्धनाबरोबरच जल संधारणालाही आम्ही प्राधान्य देत असून, वन्यप्राण्यांना जंगलातच मुबलक पाणी उपलब्ध व्हावे,हा आमचा प्रयत्न आहे.

– रुपाली बुचडे,
परिमंडल वनधिकारी, मानवाड

विशेष म्हणजे, या उपक्रमात वनविभागाच्या कर्मचाऱ्यांसोबत गावकऱ्यांनीही सहभाग नोंदविला आहे. जंगलाचे संरक्षण ही केवळ वनविभागाची जबाबदारी नसून निसर्गाशी नाते जोडलेल्या प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, याची जाणीव या लोकसहभागातून दिसून येत आहे.निसर्ग वाचला तर जंगल वाचेल आणि जंगल वाचले तरच वन्यजीवांचे अस्तित्व टिकेल.या भावनेतून पन्हाळा वनविभागने राबविलेला हा उपक्रम पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने आशादायी ठरत आहे.

उधापासून ऊस आंदोलन तीव्र करणार

पेठ वडगांव, ता.५ (प्रतिनिधी)-

माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली किणी टोलनाक्यावर ऊस दराबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सुरू असलेल्या आंदोलनाचा आजचा तिसरा दिवस आहे पण यावर अजूनही तोडगा निघालेला नाही. बळीराजा हा देशाचा अन्नदाता आहे पण सरकार जाणून चूकून या आंदोलनाकडे दुर्लक्ष करत आहे.त्यामुळे शुक्रवारचा दिवस आम्ही वाट पाहणार आहोत.शनिवार पासून आंदोलन तीव्र करणार असून कोल्हापूर सांगली जिल्हा बंद पुकारणार आहे असे राजू शेट्टी म्हणाले.



तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आंदोलनासाठी तोडगा काढण्यासाठी मंत्री हसन मुश्रीफ यांच्यावर जबाबदारी सोपवली आहे. मंत्री मुश्रीफ मुंबईहून संध्याकाळपर्यंत कोल्हापूर मध्ये येणार असून शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात ऊस दर तोडगा काढण्यासाठी बैठक होणार आहे.गुरूवारी जिल्हाधिकारी कार्यालयात ऊस दर संदर्भात बैठक झाली पण ती निष्फळ ठरली.गुरूवारी विजय राठोड यांच्या आदेशानुसार हातकणंगले तहसीलदार सुशिलकुमार बेल्हेकर यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन राजू शेट्टी यांना आंदोलन थांबवण्याची विनंती केली.परंतू दर जाहीर झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही असे शेट्टी यांनी सांगितले.

दरम्यान स्वाभिमानी शेतकरी संघटनेने सुरू केलेल्या आंदोलनाला कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातून अन्न, धान्य व रोख स्वरूपात मदतीचा ओघ सुरू आहे.शंभर रूपयापासून आपापल्या परीने लोक मदत करीत आहेत.कोल्हापूर जिल्हा ट्रीप डीलर संघटनेने पंचवीस हजार,टोल नाका कर्मचारी असोसिएशन यांच्यावतीने एकतीस हजार मदत मिळाली आहे.

इचलकरंजीत पहिल्यांदाच 'ध्यानोत्सव २०२६'चे आयोजन

इचलकरंजी, ता. ५

इचलकरंजी शहराला वस्त्रनगरीबरोबरच 'स्वास्थ्यनगरी' म्हणून नवी ओळख मिळवून देण्याच्या व्यापक संकल्पनेतून हेल्थी लाइफस्टाइल फाउंडेशनच्यावतीने रविवार, दि. २० डिसेंबर २०२६ रोजी भव्य 'ध्यानोत्सव २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित बैठकीत विविध नियोजनात्मक बाबींवर चर्चा करण्यात आली. ध्यानोत्सवासाठी २० नोव्हेंबरपासून नोंदणी प्रक्रिया सुरू होणार आहे.

'वस्त्र नगरीतून... स्वास्थ्य नगरीकडे!' या संकल्पने अंतर्गत इचलकरंजी शहरात मनाचे स्वास्थ्य, सकारात्मक जीवनशैली आणि सामाजिक एकात्मतेची संस्कृती रुजविण्याचा हेल्थी लाइफस्टाइल फाउंडेशनचा मानस आहे. या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून ध्यानोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे.

साधना मंदिराच्या माध्यमातून २९ ऑगस्ट रोजी 'ध्यान आरंभ' उपक्रमाला सुरवात करण्यात आली. त्यानंतर नियमितपणे राबविण्यात येणाऱ्या 'ध्यान यात्रा' उपक्रमातून अनेक नागरिकांना ध्यानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली आहे. या उपक्रमाचा लाभ घेतलेल्या अनेकांनी मन:शांती, प्रसन्नता आणि दैनंदिन जीवनातील सकारात्मक अनुभव व्यक्त केले आहेत. या उपक्रमाला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन आता ध्यानाचा अनुभव शहरातील अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी ध्यानोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे.

इचलकरंजीला स्वास्थ्यनगरी बनविण्याचे स्वप्न हे केवळ एका संस्थेचे नसून संपूर्ण शहराचे आहे. ध्यानोत्सवाच्या माध्यमातून आपण मनाच्या स्वास्थ्याची एक सामूहिक चळवळ उभी करूया. शहरातील विविध संस्था, संघटना, उद्योगसमूह, सामाजिक कार्यकर्ते आणि जागरूक नागरिकांनी या उपक्रमाचे 'कम्युनिटी पार्टनर' बनून सहकार्य करावे. तसेच अधिकाधिक नागरिकांनी ध्यानोत्सवात सहभागी होऊन स्वस्थ इचलकरंजीच्या निर्मितीसाठी आपले योगदान द्यावे असे आवाहन डॉ. अमित राठी यांनी केले आहे.

जागा आरक्षणावरुन छोट्या व्यापाऱ्यांच्यात पुन्हा वादावादी



बंगला रोडवर व्यावसायीकांनी रस्त्याच्या मधोमध व्यवसाय थाटला.त्यावेळी वादावादी झाली(छाया –मयूर चिंदे)

इचलकरंजी, ता.५

येथील शंभुतिर्थ ते प्रांतकार्यालय मार्गावर दिवाळी बाजारासाठी जागा आरक्षणावरुन छोट्या व्यापाऱ्यांच्यात गुरूवारी पुन्हा वादावादी, हाणामारीचा प्रकार घडल्याने गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे महापालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन पथकाने रस्त्याच्या मधोमध आणि दुकानदारांसमोर जागा आरक्षित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यापाऱ्यांचे साहित्य जप्त करुन रस्ता वाहतुकीस मोकळा करण्यास भाग पाडले.मात्र,सायंकाळनंतर रस्त्याच्या मधोमध व्यवसाय थाटले होते.

छोटे व्यापारी संघटनेने परंपरेनुसार मुख्य मार्गावर बाजार भरवण्यासाठी आंदोलन केले. मात्र, महापालिका आणि पोलीस प्रशासन न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यावर ठाम राहत यावर्षी शंभुतिर्थ ते प्रांतकार्यालय याचबरोबर थोरात चौक आणि अन्य पर्यायी ठिकाणी बाजार भरवण्याचा निर्णय घेतला आहे. तरीही गुरूवारी पुन्हा शंभुतिर्थ ते प्रांतकार्यालय या मार्गांच्या दुतर्फा बाजारासाठी जागा आरक्षित करण्यावरुन छोट्या व्यापाऱ्यांच्यात वादावादी, हाणामारीची घटना घडली. तसेच काही दुकानासमोरही व्यापाऱ्यांनी जागा आरक्षित करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे महापालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन पथकाने पथकाने पाय घेऊन रस्त्याच्या मधोमध आणि दुकानांसमोर जागा आरक्षित करण्यासाठी ठेवलेले साहित्य जप्त केले. त्याला काहींनी विरोध केला. मात्र, पथकाने त्याला न जुमानता रस्ता वाहतुकीस मोकळा करण्यास भाग पाडले.

उसाची ट्रॉली दुचाकीवर पलटी; आईचा मृत्यू, मुलगा गंभीर

कराड,ता.५(प्रतिनिधी)

ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला अचानक ब्रेक लावावा लागल्याने उसाने भरलेली ट्रॉली विरुद्ध दिशेला जाऊन दुचाकीवर पलटी झाली. या भीषण अपघातात दुचाकीवरील मालन मोहन सुतार (वय ६०, रा. काढणे, ता. पाटण) यांचा मृत्यू झाला, तर त्यांचा मुलगा यशवंत मोहन सुतार (वय २८) गंभीर जखमी झाला. त्याच्यावर कृष्णा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

त्याच्यासोबत असलेल्या पत्नीने प्रसंगावधान राखत पळ काढल्याने ती सुदैवाने बचावली. गुरुवारी सकाळी दहाच्या सुमारास आगाशिवनगर येथील कोणर्क अपार्टमेंटसमोर ही दुर्घटना घडली. चचेगाव (ता. कराड) येथून ऊसतोड करून ट्रॅक्टर दोन ट्रॉल्यांसह कृष्णा कारखान्याकडे निघाला होता. आगाशिवनगरमधील कोणर्क पार्क अपार्टमेंटसमोर ट्रॅक्टर आला असता, अपार्टमेंटमधून अचानक एक दुचाकी रस्त्यावर आली. तिला वाचवण्यासाठी ट्रॅक्टरचालकाने अचानक ब्रेक लावला. त्यामुळे मागील उसाने भरलेली ट्रॉली नियंत्रण सुटून विरुद्ध बाजूला गेली आणि तेथून जाणाऱ्या सुतार कुटुंबाच्या दुचाकीवर पलटी झाली.

दरम्यान, मालन सुतार, त्यांचा मुलगा यशवंत आणि सून असे तिघे कराडमधील काम आटोपून काढणे गावी निघाले होते. यशवंत यांना फोन आल्याने त्यांनी दुचाकी रस्त्याच्या बाजूला थांबवली होती. त्याचवेळी ट्रॉली आपल्याच दिशेने येत असल्याचे सुनेच्या निदर्शनास आले. तिने आरडाओरडा करत तत्काळ बाजूला पळ काढला. मात्र, ट्रॉली थेट दुचाकीवर पलटी झाल्याने मालन आणि यशवंत हे दोघेही उसाखाली दबले गेले. अपघाताचा आवाज ऐकताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. दोघांना बाहेर काढण्यासाठी नागरिकांनी शर्थीचे प्रयत्न केले. त्यानंतर त्यांना तातडीने कृष्णा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारपूर्वीच मालन सुतार यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले. यशवंत यांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

थकीत वेतनापोटी कंत्राटी कर्मचाऱ्यांचा महापालिकेसमोर ठिय्या

इचलकरंजी, ता. ५



महापालिकेच्या प्रवेशद्वारात कंत्राटी कामगारांनी ठिय्या आंदोलन केले.

येथील महापालिकेच्या घंटागाडीवर आणि स्वच्छतेसाठीच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी काहींना तीन महिन्याचा तर काहींना एक महिन्याचा पगार मिळाला नाही. दिवाळी तोंडावर आली तरी पगार थकताच आणि बोनस न मिळाल्याने गुरुवारी या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी महापालिकेत घोषणाबाजी करत आंदोलन केले. बावेळी सुरक्षारक्षकांनी आंदोलकांना प्रवेशद्वारात रोखल्याने धक्काबुक्कीचा प्रकार घडला. त्यानंतर आंदोलकांनी आरोग्य विभागात ठिय्या आंदोलन सुरु केल्याने उपायुक्त अशोक कुंभार, रोशनी गोडे यांनी ६ नोव्हेंबर रोजी चर्चा करुन तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. मात्र, आंदोलकांनी पगार आणि बोनस न मिळाल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला.

येथील महापालिकेच्या घंटागाडीवर आणि स्वच्छतेसाठी १२५ कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. यापैकी स्वच्छता कर्मचाऱ्यांचा ३ महिन्याचा पगार थकीत आहे तर घंटागाडीवरील कर्मचाऱ्यांना दिवाळी तोंडावर आली तरी ऑक्टोबर महिन्याचा पगार मिळाला नाही. वारंवार मागणी करूनही थकीत पगार आणि बोनस मिळत नसल्याने संतप्त कंत्राटी कर्मचाऱ्यांनी कामगार नेते ए.बी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेत पोहचले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेत जाण्यासाठीचे सर्व मार्ग बंद करण्यात आले होते.बावेळी जोरदार घोषणाबाजी करत आंदोलक महापालिकेच्या मुख्यप्रवेश प्रवेशद्वारात पोहचले. त्यावेळी सुरक्षारक्षकांनी त्यांना प्रवेशद्वारात रोखले. यावेळी शाब्दीक वाद आणि धक्काबुक्कीचा प्रकार घडला. तरीही आंदोलक सुरक्षारक्षकांचे कडे भेदून आरोग्य विभागात पोहचले. त्या ठिकाणी घोषणाबाजी करत ठिय्या मांडल्याने गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती.



साथी शंकरराव निर्मळ यांचा स्मृतिदिन साजरा

टाकवडे, ता. ५ (प्रतिनिधी)

टाकवडे ता. शिरोळ येथील सुपुत्र व थोर विचारवंत समाजवादी नेते श्री करवीर विकास सोसायटीचे व के. साथी शंकरराव निर्मळ पतसंस्थेचे स्फूर्ती स्थान असलेले के. साथी शंकरराव निर्मळ यांचा ३१ वा पुण्यस्मरण दिन करवीर सोसायटीच्या हॉलमध्ये संपन्न झाला.

ज्येष्ठ पत्रकार दिलीप कोळी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले .यावेळी संस्थेचे अध्यक्ष मानवेंद्रनाथ निर्मळ, साथी शंकराव निर्मळ पतसंस्थेचे अध्यक्ष सौरभ निर्मळ, अमोल चौगुले ,बंटी उर्फ प्रतीक प्रकाश पाटील, अविराज पाटील, पिरगोंडा पाटील ,हुसेन शेख, यशवंत नाईक, उदय झुंजार ,सुखदेव जनवाडे ,बाबासाहेब नदाफ, जमाल फकीर, मोहन निर्मळ, मधुकर झुंजार, किरण गोटखिंडे, विनायक करडे ,मोहन चव्हाण बंडू बागरीर, विजय पाटील , अनिल पाटील, बाळासाहेब पाटील, गणपती कोळी,गणेश कांबळे यासह दोन्ही संस्थेचे सेवक वर्ग व हितचिंतक उपस्थित होते.

ऊसदराच्या मागणीवर स्वाभिमानीचा एल्गार कायम

जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीवर बहिष्कार, महामार्गावरील वाहतूक विस्कळीत

सातारा, ता. ५(प्रतिनिधी)

ऊसाला प्रतिटन २ हजार ५०० रुपये पहिली उचल आणि अंतिम दर ५ हजार रुपये मिळावा, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने सुरू केलेले चक्काजाम आंदोलन तिसऱ्या दिवशीही सुरूच असल्याने जनजीवन विस्कळित झाले आहे. आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजू शेळके यांनी दिला आहे. आंदोलनाला वाढता पाठिंबा पाहूनी प्रशासनाने सबुरीची भूमिका घेतली आहे. कारखानदारांकडून पहिल्या उचलीबाबत ठोस निर्णय किंवा लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय महामार्गावरून एक इंचही मागे हटणार नाही अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे.

पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावील नागठाणे येथे राजू शेळके यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी ठिय्या मांडला आहे. दरम्यान, आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने साखर कारखान्यांचे अध्यक्ष, संचालक आणि शेतकरी प्रतिनिधींची बैठक आयोजित केली होती. मात्र, केवळ आश्वासनांच्या चर्चा करून प्रश्न सुटणार नाही, अशी भूमिका घेत राजू शेळके यांनी या बैठकीवर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली. सातारा तहसीलदार तसेच प्रशासकीय पातळीवर झालेली मध्यस्थीही निष्फळ ठरल्याने मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार संघटनेने व्यक्त केला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील किणी टोलनाका येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली मुख्य आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला साताऱ्यातून पूर्ण ताकद देण्यासाठी नागठाणे येथील महामार्गरोको आंदोलन अधिक प्रभावीपणे सुरू ठेवण्याचा निर्णय राजू शेळके व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतला आहे.

या चक्काजाम आंदोलनाचा मोठा फटका पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावील वाहतुकीला बसला आहे. नागठाणे, अतित, उंब्रज तसेच सातारा परिसरात महामार्गांच्या दोन्ही बाजूना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. एसटी बसेस, खासगी वाहने आणि मालवाहू ट्रक अडकून पडल्याने प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. विशेषत: महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना खाण्यापिण्याच्या तसेच पाण्याच्या अडचणींचा सामना करावा लागत आहे

महापौरांच्या जनता दरबारात १९ नागरिकांचे अर्ज दाखल

कोल्हापूर, ता. ५ (प्रतिनिधी)

कोल्हापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील नागरिकांच्या समस्या व अडचणी थेट जाणून घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी महापौर रुपाराणी निकम यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या 'जनता दरबारात १९ नागरिकांनी विविध समस्या व मागण्यांबाबत अर्ज दाखल केले.

महापौर सौ.रुपाराणी निकम यांनी जनता दरबारात नागरिकांच्या समस्या व तक्रारी प्रत्यक्ष जाणून घेतल्या. नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांवर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेत प्रामतक्रारींचे तातडीने निराकरण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

|| हार्दिक शुभेच्छा ||



श्री. सुरेश दिनकर माने
आमचे परममित्र,
श्री. सुरेश दिनकर माने यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

दिशात तोंडे (बारवा)
अविनाश शेंडे ❖ अमोल पुजारी
अंकदुत्ता मोमीन ❖ किरण जाधव
मनोज पुजारी (बिटू)
संदिप माने ❖ फिकिर शेख
राजू कांबळे ❖ पांडु मुदगल
अस्लम किस्मतगर ❖ अमित बुवडे

एक दिवा शिवरायांसाठी दीपोत्सव सोहळा

जयसिंगपूर, ता.५(प्रतिनिधी)

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आणि त्यांच्या पराक्रमाची प्रेरणा घरघरात पोहोचवण्यासाठी जयसिंगपूर येथे भव्य दीपोत्सव सोहळा–एक दिवा शिवरायांसाठी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवारी (ता.सात) सायंकाळी ७ वाजता शहरातील ऐतिहासिक शिवतीर्थ येथे हा दीपोत्सव संपन्न होणार आहे. दीपांच्या देदिप्यमान प्रकाशात शिवरायांचे शौर्य, पराक्रम आणि स्वराज्याचा दैदीप्यमान इतिहास उजळवून टाकणे हा या सोहळ्याचा मुख्य उद्देश आहे. संपूर्ण शिवतीर्थ परिसर हजारो दिव्यांच्या प्रकाशाने आणि शिवप्रेमाच्या भक्तीने न्हाऊन निघणार आहे. या निमित्ताने शिवरायांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करत, एक दिवा शिवरायांसाठी आणि एक संकल्प स्वराज्यासाठी हा उदात्त विचार घेऊन नागरिक एकत्र येणार आहेत. या पवित्र आणि प्रेरणादायी सोहळ्यात जयसिंगपूर व परिसरातील सर्व शिवप्रेमी, आबालवृद्ध, महिला आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

अरिहंत दूध संघाकडून सभासदांना बोनस वितरण

चोरगाव ,ता.५(प्रतिनिधी)

दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टाला प्रोत्साहन देत अरिहंत दूध उत्पादक संघाच्या वतीने सभासदांना दिवाळीचे बोनस वाटप करण्यात आले. पुढारीतेपूर्वीशत्रुजीत पाटीलयांच्या हस्ते सभासदांना बोनस वितरणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

व्यवस्थापक बाहुबली कवटे यांनी दूध उत्पादकांचा हितासाठी संघाने राबविलेल्या या उपक्रमाचे माहिती दिली.

चालू आर्थिक वर्षात दूध संघाकडून म्हैस व गाईचे एकूण २,२६,७८९ लिटर दूध संकलित केले आहे. वंदा म्हैस दूध उत्पादकांना ४ टक्के व गाय दूध उत्पादकांना ३ टक्के बोनस देत ८ लाख ९८ हजार ७८ रुपयांचा विक्रमी बोनस वितरण केले असल्याचे सांगितले.

यावर्षी महेश दूध उत्पादन मध्ये प्रकाशित चव्हाण अशोक मुळे व सुरेश छबेदार यांनी अनुक्रमे क्रमांक पटकाविले. तसेच गाय दूध उत्पादकामध्ये भरत अम्मन्नावर यांनी कल्लाप्पा कुरुंदवाडे यांनी अनुक्रमे क्रमांक पटकाविले.कार्यक्रम संपाचे अध्यक्ष शिवाजी तोडकर ,उपाध्यक्ष सिकंदर अकराज, संचालक मारगोंडा पाटील शितल हवले, रमेश माळी, रावसाब पाटील, हिराबंद चव्हाण, बाळासाहेब माडीवाळ, भारती सावळवाडे, वैशाली कुलवुले, जयपाल कोरवी, कुर्वी संघाचे सीईओ आर.टी .चौगुला उपस्थित होते.

माळवाडीत चोरट्यांचा धुमाकूळ

भिलवडी,ता.५(प्रतिनिधी)

पलूस तालुक्यातील माळवाडी परिसरात अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घालत दोन बीअर बार, एका घरात चोरीचा प्रयत्न आणि एक दुचाकी लंपास केल्याची घटना समोर आली आहे. चार ते पाच चोरट्यांच्या टोळीने एकाच रात्री विविध ठिकाणी हात साफ केल्याने भिलवडी–माळवाडी परिसरात खळबळ उडाली असून, ऐन दिवाळीच्या तोंडावर नागरिक आणि व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सांगली–माळवाडी रस्त्यालगत असलेल्या हॉटेल मंथन बीअर बार आणि हॉटेल अर्णव बीअर बार या दोन आस्थापनांना चोरट्यांनी लक्ष्य केले. हॉटेल अर्णवमधून ११ हजार रुपयांची रोकड आणि सुमारे ४० हजार रुपयांचा मद्यसाठा चोरट्यांनी लंपास केला. याशिवाय हॉटेलमधील जिल्लक मटण, चिकन आणि अंडीही चोरून नेली. हॉटेल मंथन वेथुनही मद्यसाठा चोरीला गेल्याची माहिती हॉटेल मालक अनिल मोरे यांनी दिली.

दरम्यान, माळवाडी शिवाजीनगर येथील डॉ. राहुल किणीकर यांच्या घरात गच्चीवरून प्रवेश करून खिडकीच्या काचा फोडून चोरट्यांनी आत शिरण्याचा प्रयत्न केला. मात्र, डॉ. किणीकर यांच्या सतर्कतेमुळे चोरीचा प्रयत्न फसला. तसेच वसगडे–मांगली रस्त्यावरील माळी वस्ती येथून राजू माळी यांची दुचाकी अज्ञात चोरट्यांनी लंपास केली

कोगनोळीत आज बैलगाडी शर्यतीचा थरार

कोगनोळी, ता.५ (प्रतिनिधी)

येथील श्री विरदेव यात्रा कमिटीतर्फे सर्व ग्रामपंचायत सदस्य, सर्व संस्थांचे पदाधिकारी यांच्या सहकार्याने श्री विरदेव यात्रेनिमित्त आज शुक्रवार दि. ६ रोजी सकाळी ९ वाजता भव्य बैलगाडी शर्यतीसह अन्य शर्यतीचा थरार पाहायला मिळणार आहे.

भव्य जनरल अ गट बैलगाडी शर्यतीसाठी अनुक्रमे ५१ हजार १ रुपये व निशाण, ३१ हजार १ रुपये , २१ हजार १ रुपये अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ब गट बैलगाडी शर्यतीसाठी अनुक्रमे १५ हजार १ रुपये , १० हजार १ रुपये , ७ हजार १ रुपये , एक घोडा एक बैल शर्यतीसाठी अनुक्रमे ७ हजार १ रुपये , ५ हजार १ रुपये व निशाण, ३ हजार १ रुपये , घोडागाडी शर्यतीसाठी अनुक्रमे १५ हजार १ रुपये , १० हजार १ रुपये , ७ हजार १ रुपये अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. घोडेस्वार शर्यतीसाठी अनुक्रमे ५ हजार १ रुपये, ३ हजार १ रुपये , २ हजार १ रुपये अशी बक्षिसे दिली जाणार आहेत.शर्यत शौकीनांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

|| हार्दिक शुभेच्छा ||

श्री. राजू कबाडे (सरकार) श्री. विनायक सोलगे

आमचे परममित्र मा.श्री. राजू कबाडे (सरकार) व श्री. विनायक सोलगे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

▶ मच्छिंद्र नगारे ▶ अमोल कोकणे
▶ प्रमोद बागडे ▶ सागर मस्के (ताल्या)

जलसंपदा विभाग शासन निर्णय, क्रमांक निवीदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप–१ दि. १८/१०/२०२३

परिशिष्ट– ३
महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय.
पत्ता :– जलविज्ञान प्रकल्प विभाग, जी वरिष्ठ, मध्यवर्ती इमारत, पुणे–४११००१
ई–मेल पत्ता :– eehpd.pune@gmail.com दुरध्वनी क्र. ०२०–२६१२६९१८
ई–निविदा सूचना क्र. ७ सन २०२६–२७

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने, कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे–४११००१ जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारकडून खालील कामाकरीता ब–१ लघुनालीत ई–निविदा प्रणालीपध्दती (ऑनलाईन) निविदा मागविले आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वेबपृष्ठ डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई–निविदेबाबत सर्व माहिती शासनाचे संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा अथवा कोणतेही कारण व देता निविदा सूचना रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे–४११००१ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही. सदर निविदा सुचनेबाबे काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

कामाची नावे :– Data Collection through Data as-a-Service for RTDAS (Real Time Data Acquisition System) in the Krishna and Bhima River Basins in Maharashtra initial 6 Months using the existing network established under HP-II, followed by 5 years using the newly installed system (2026-2031)
जिल्हा :– वरील काम हे पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील आहे.
निविदेची किंमत रुपये :– रु.१८,०५,१८,७२३/–
निविदा उपलब्ध कालावधी :– दिनांक :– २६/११/२०२६ ते दिनांक २०/१२/२०२६.
निविदा उपडण्याचा दिनांक :– दिनांक २३/११/२०२६ रोजी दुपारी १५.०० वा.

❖ स्थळ :– कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, जी वरिष्ठ, मध्यवर्ती इमारत, पुणे–४११००१.
❖ संकेतस्थळावर प्रसिद्ध होणाऱ्या निविदा उपडण्याची तारीख, व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीनी संबंधीत कार्यालयात उपस्थित राहावे. अन्यथा निविदा उपडल्यास कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही.
❖ या कामाच्या निविदेसाठी पात्रता अहेता पढ़ती लागू आहे.

जा.क्र. जविप्रवि/लेखा–१/निविदा/२०४२/२०२६. सही/–
जलविज्ञान प्रकल्प विभाग, पुणे– ०१. (मयुरा स. जोशी)
दिनांक :–२७/१०/२०२६. कार्यकारी अभियंता
प्रत :– नोटीस बोर्ड (विभागीय कार्यालय) जलविज्ञान प्रकल्प विभाग पुणे–४११००१.

दैनिक महासत्ता

शुभ दिपावली

शुक्रवार, ता. ६ नोव्हेंबर २०२६ पान नं. १२



धनत्रयोदशीचे धार्मिक महत्त्व

दिवाळी या सणाच्या प्रारंभी धनत्रयोदशीच्या दिवशी धन्वंतरी जयंतीची सांगड घातली जाणे हे खरोखरच मोठे सूचक आहे, नाही? वैद्यकशास्त्र तरी दुसरे काय करते? अकाली मृत्यू येऊ नये म्हणून धडपड करते. प्रकृती बरी राहावी, मृत्यू दूर असावा, यासाठी मार्गदर्शन करते. धार्मिक आचरणातून आपण अकाली मृत्यू टाळावा म्हणून यमराजाचे सांगणे ऐकून त्याप्रमाणे पिढ्यान्?पिढ्या दक्षिणेकडे तोंड करून दिवे लावतो. धर्म आणि आरोग्य या दोन्ही गोष्टी धनत्रयोदशीच्या निमित्ताने अशा एकत्र आल्या आहेत.

धनत्रयोदशीचे महत्त्व दिवाळीचा शुभारंभ करणारा दिवस म्हणून तर आहेच पण अपमृत्यू टाळण्यासाठी आपण हा दीपोत्सव करीत आहोत आणि मिळणारे आयुष्य आरोग्यपूर्ण असावे, धर्माच्याच चौकटीत राहून त्यांचा उपभोग घेता यावा म्हणून त्या दिवशी धन्वंतरीचेही स्मरण करतात.

त्या राजपुत्राचे प्राण यमदूतांनी हरण केले. त्याचे प्राण हरण करण्यासाठी म्हणून जे यमदूत गेले होते, त्यांनाही या प्रसंगामुळे दुःख झाले. खरे म्हणजे यमदूतांना कोणाच्याही सुख-दुःखाची तमा असण्याचे कारण नाही, असे समजले जाते पण असे यमदूतसुद्धा राजवाड्यातील सर्व लोकांचा आक्रोश पाहून व्यथित झाले, दुःखी झाले. पुढे त्यानी एकदा यमराजाला विचारले, अशा प्रकारे अकाली मृत्यू येऊ नये म्हणून काय करावे '' तेव्हा यमराजाने आश्विन कृष्ण त्रयोदशीपासून पाच दिवस सूर्यास्तानंतर जो कोणी दीपोत्सव करील, त्याला अकाली मृत्यू येणार नाही असे आश्वासन दिले. त्याप्रमाणे सर्व लोक हा दीपोत्सव करू लागले. दीपोत्सवात, दिवाळीत आनंदाची, उत्साहाची लयलूट असली तरी त्याचे मूळ कारण अपमृत्यूपासून सुटका व्हावी, अशी इच्छा ही आहे.

आश्विन पौर्णिमा ही वर्षातील सर्वांत सुंदर रात्र त्यानंतर पंधरा दिवसांनी येणारी अमावास्या ही काळोखाची असली तरी आपण भारतीय लोक दिवे लावून ती आपल्या परीने अधिकाधिक सुंदर करण्याचा प्रयत्न करीत असतो. हा दिवाळीचा सण धनत्रयोदशीपासून सुरू होतो.

धनत्रयोदशी हीच धन्वंतरी जयंतीही आहे. धन्वंतरी म्हणजे समुद्रमंथनातून जी चौदा रत्ने निघाली, त्यापैकी एक प्रमुख रत्न. धन्वंतरी हे आयुर्वेदाचे मूळ निर्माते. देवांचे राजवैद्य! कोणालाही अकाली मृत्यू येऊ नये, अशा अधिक सुंदर बनविण्याचा उदात्त विचाराने सुरू झालेल्या

GET ₹1000 OFF ON PURCHASE OF APPAREL WORTH ₹6999
Levi's USPA Raymond PETER ENGLAND
SHOP FOR ₹4999 & GET A BLACK BACKPACK WORTH ₹2499 FOR ₹299
JOCKEY Namor
FLAT ₹799
WISH LIFESTYLE STORE VYANKATRAO HIGHSCHOOL ROAD, OPP UNION BANK ICHALKARANJI
9762778687, 9762951313

॥ अर्थ एकति रक्षित: ॥
श्री आर्य चाणक्य
नागरी सहकारी पतसंस्था मर्या: इचलकरंजी.
प्रधान कार्यालय : सांगली रोड, गुलमोहर कॉलनी, इचलकरंजी. ☎ २४२००२७
आर्य चाणक्य फास्ट गोल्ड लोनद्वारे
तुमच्या सोन्याच्या सामर्थ्याचा अनुभव घ्या
सोने तारण कर्ज
कमीत कमी व्याजदरात...
। जलद व सुलभ कर्ज प्रक्रिया
। जास्तीत जास्त रक्कम
आता व्यावसायिकांना व्यवसाय वृध्दीसाठी
सोने तारण कॅश क्रेडीट कर्ज योजना
पूर्ण करा... स्वप्न तुमचे...
सोबत घ्या अर्थसहाय्य चाणक्यचे...
चाणक्य घरकुल कर्ज
जागा खरेदी कर्ज
सोलर कर्ज योजना
वाहन तारण
। प्रधान कार्यालय : 75880 93101 । गावभाग : 75882 17102 । सांगली रोड : 75880 95103
स्टेशन रोड : 75880 94104 । कोल्हापूर रोड : 75882 39105 । हुपरी : 75880 74106 । जवाहिरपूर : 75882 08107
कोल्हापूर : 75881 75808 । कुरुंदवाड : 75078 75809 । पेठ वडगांव : 75074 75810 । सांगली : 75173 75811

आज धनत्रयोदशी आहे. आश्विन महिन्यातील कृष्ण त्रयोदशी ज्या दिवशी प्रदोषकाल-व्यापिनी असेल त्या दिवसाला धर्मशास्त्राप्रमाणे 'धनत्रयोदशी' म्हटले जाते. धनत्रयोदशी या शब्दाचा अपभ्रंश 'धनतेरस' असा आहे. या दिवशी धनाची पूजा करण्याचा पूर्वापार परिपाठ आहे. याच दिवशी 'यमदीपदान' असाही एक शास्त्रार्थ दिलेला असतो' यमाला या दिवशी दीपदान करावे, असे धर्मशास्त्राचे सांगणे असले तरी यमाला दीपदान कसे करणार ? दक्षिण दिशेकडे एक दिवा लावणे, असा या दिवसाचा म्हणून एक आचार पाळला जातो. दक्षिण ही यमाची दिशा मानतात. दीपावली हा सण जीवन आणि मृत्यू यांचे निकटचे नाते मनावर बिंबवणारा आहे. प्राचीन कथेप्रमाणे कोण्या एका हैमराजाच्या मुलाचा मृत्यू त्याच्या लग्नानंतर चारच दिवसांत होईल, असे कोणी सांगितले होते.

राजपुत्राचा विवाहोत्सव चालू असतानाच सर्पदंशाने त्याचा मृत्यू झाला. विवाहोत्सवासाठी जमलेल्या सर्व मंडळींचा आक्रोश कानावर आदळत असतांनाच

सण दिवाळीचा, संकल्प प्रगतीचा !
वीरशैव बँकेच्या आकर्षक कर्ज योजनांचा !
श्री वीरशैव बँकेच्या आकर्षक कर्ज योजना
अद्ययावत डिजीटल बँकिंग सेवेसह
चारचाकी वाहन कर्ज: 9.00%
दुचाकी वाहन कर्ज: 10.00%
गृहकर्ज: 9.50%
सोने तारण कर्ज: 9.00%
रु.५ लाख व त्यावरील कर्ज व्याजदर: क्रेडीट रेटींगनुसार (कोणतीही कुपन कर्जे नाही)
शैक्षणिक कर्ज: 11.00%
धन्वंतरी कर्ज: 9.50%
कृषीपंप कर्ज: 10.50%
आकर्षक व्याजदराच्या ठेव योजना
ठेवींवर आकर्षक व्याजदर व सवलतीच्या व्याजदरात कर्ज योजना
श्री वीरशैव को-ऑप. बँक लि., कोल्हापूर
प्रधान कार्यालय: ताराराणी चौक, कोल्हापूर. (मल्टी-स्टेट शेडयुल्ड बँक)
फोन: २५३६९४० ते ४२

आपल्या आकांक्षांच्या क्षितिजाला 'अर्थ' देणारी बँक...
सुवर्णमहोत्सवी
वारणा बँक
कर्मयोगी
'वारणे'च्या मातीत सहकार रुजवला
सर्वसामान्यांचा जीवनवृक्ष फुलवला...
दिशा दिली परिसराच्या उन्नतीला
कृतज्ञतापूर्वक वंदन तुम्हाला...
कृषी आणि उद्योगाची सुरेख सांगड घालत
वारणा खोऱ्याचा कायापालट करणारे सहकारमहर्षी,
आदरणीय तात्यासाहेब कोरे यांना
१९२ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन...
आई कर्ज योजना
महिला उद्योजकांना पर्यटन क्षेत्राशी निगडित व्यवसायाकरिता कर्ज
कर्जमर्यादा - १५ लाख मुदत - ७ वर्षे
(Effective Interest Rate 0%)*
अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्या. मुंबई यांची आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी अर्थसहाय्य योजना
(Effective Interest Rate 0%)*
महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ यांची व्याज परतावा कर्ज योजना
(Effective Interest Rate 0%)*
ज्येष्ठ नागरिकांसाठी 8.25% व्याजदराने विशेष ठेव योजना
अधिक माहितीसाठी नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत कर्ज योजना
(Effective Interest Rate 0%)*
प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी कर्ज योजना (PMFME)
*वास्तू गृहकर्ज योजना
पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना (पीएमईजीपी)
वाहन तारण कर्ज
*सौर ऊर्जा कर्ज योजना
बँकेमार्फत देण्यात येणाऱ्या सुविधा
▸ रुपे कार्डद्वारे देशातील कोणत्याही NFS/ATM यरून पैसे काढणे, POS व E-COM सुविधा
▸ कॉर्पोरेट एजन्सी मार्फत जनरल व लाईफ विमा सुविधा
▸ एस.एम.एस. व मोबाईल बँकिंग सुविधा
▸ लॉकर सुविधा
▸ UPI RTGS/ NEFT सुविधा
श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर
प्रधान कार्यालय: वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. फोन ०२३२८-२७२८८/८७ Visit : www.waranabank.bank.in
मो. - कोल्हापूर : ९१७१९१७७००, ९७४३७१८७७७, ८८०७०९८१७८, इचलकरंजी व सांगली: ९७४३७१९८८८ / मुंबई : १७८३७१८१७० पुणे : १७८३७१८३१३

SUZUKI
नवा जोश, नवा थ्रिल!
एक्सचेंज ऑफर* रु. 10,000/- किंवा रु. 7,000/- चे गिफ्ट व्हाउचर*
रु. 5,000/- चे गिफ्ट व्हाउचर*
THE EVERYDAY EXPLORER
150 cc / 250 cc मध्ये उपलब्ध
250 cc मध्ये उपलब्ध
Fuel Tank Pad
Accessory Bar
Seat Assembly-Low Height
Fuel Tank Protection
Wheel Decals (Red & Yellow)
*नियम व अटी लागू ** फक्त सर्व ओरिजनल डीलर्स साठी. SMPL (मोफत सर्विस) उपलब्ध आहेत.
100% पर्यंत कर्ज कोणत्याही तारणा शिवाय
सर्व मॉडेल्स, सर्व रंगात हजर स्टॉकमध्ये उपलब्ध
रविवारी शोरुम आणि वर्कशॉप चालू राहतील.
कोणत्याही कंपनीची व कितीही जुनी दुचाकी घेऊन या व बाजारभावापेक्षा जास्त किंमत मिळवा.
द्रायो सुझुकी
सांगली रोड, यड्राव, इचलकरंजी.
संपर्क: 02322-252199/ 9326390908

महासत्ता
रंगारंग
शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६

१०० हून अधिक देशांत 'रामायण' प्रदर्शित

भारतीय संस्कृती, परंपरा आणि समृद्ध कथाकथनाचा वारसा जगभर पोहोचवण्यासाठी सज्ज झालेला 'रामायण' हा चित्रपट भारतीय सिनेमासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. निर्माता नमित मल्होत्रा आणि दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या या महत्त्वाकांक्षी चित्रपटाचे प्रदर्शन जगभरातील १०० हून अधिक देशांमध्ये ५० हजार स्क्रीन्सवर होणार असल्याची माहिती समोर आली आहे. या माध्यमातून भारतातील सर्वाधिक पूजनीय महागाथांपैकी एक असलेलं रामायण आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे.

'रामायण' हा केवळ मनोरंजनासाठी तयार केलेला चित्रपट नसून, भारतीय संस्कृती आणि सभ्यतेशी जोडलेली कालातीत कथा मोठ्या पडद्यावर सादर करण्याचा प्रयत्न आहे. शौर्य, कर्तव्य, त्याग आणि धर्म-अधर्म यांच्यातील संघर्ष यासारखी मूल्ये या महागाथेच्या केंद्रस्थानी आहेत. त्यामुळे विविध देशांतील आणि वेगवेगळ्या पिढ्यांतील प्रेक्षकांनाही या कथेशी जोडता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

चित्रपटाचं जगभरात होणारं प्रदर्शन भारतीय सिनेमाची वाढती आंतरराष्ट्रीय पोहोच अधोरेखित करतं. १०० हून अधिक देशांमध्ये आणि ५० हजार स्क्रीन्सवर चित्रपट प्रदर्शित झाल्यास भारतीय पौराणिक कथांना जागतिक स्तरावर सादर करण्याची मोठी संधी मिळणार आहे.

'रामायण'च्या कलाकारांची फळीही प्रेक्षकांसाठी आकर्षण ठरत आहे. या चित्रपटात रणबीर कपूर प्रभू श्रीराम यांच्या भूमिकेत, साई पल्लवी माता सीतेच्या भूमिकेत, यश रावणाच्या भूमिकेत, सनी देओल हनुमानाच्या भूमिकेत आणि रवी दुबे लक्ष्मणाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

चित्रपटाची भव्यता, व्हिज्युअल्स आणि भारतीय महाकाव्याला आधुनिक चित्रपटनिर्मितीच्या माध्यमातून सादर करण्याची संकल्पना यामुळे या चित्रपटाबद्दल मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

'रामायण'ची निर्मिती नमित मल्होत्रा यांच्या प्राइम फोकस स्टुडिओजने केली आहे. या प्रकल्पात डीएनईजी आणि यशच्या मॉन्स्टर माइंड क्रिएशन्स यांचं सहकार्य लाभले आहे. चित्रपटाचं दिग्दर्शन नितेश तिवारी यांनी केलं आहे.

भारतीय संस्कृतीच्या मुळांचा आणि रामायणाच्या मूळ भावनेचा आदर राखत, जागतिक दर्जाच्या चित्रपटनिर्मितीच्या माध्यमातून ही



बॉक्स ऑफिसवर आघाडी, 'रामायण'ची क्रेझ

महागाथा नव्या पिढीसमोर मांडण्याचा निर्मात्यांचा प्रयत्न आहे. चित्रपटाची निर्मिती दोन भागांमध्ये करण्यात आली असून, दोन्ही भागांच्या प्रदर्शनाकडे प्रेक्षकांचं लक्ष लागलं आहे.

'रामायण'चा पहिला भाग ५ नोव्हेंबर २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. तर दुसरा भाग दिवाळी २०२७ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. भारतात हा चित्रपट हिंदी, तमिळ, तेलुगू, कन्नड आणि मल्याळम या भाषांमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे.

चित्रपट आयमॅक्स फॉरमॅटमध्येही पाहता येणार आहे. भारताबाहेरील वितरणाची जबाबदारी सोनी पिक्चर्सकडे, तर हिंदी भाषिक बाजारपेठेतील वितरणाची जबाबदारी धर्मा प्रॉडक्शनकडे असल्याचं सांगण्यात आलं आहे.

भारतीय महाकाव्याची भव्यता जगभरातील प्रेक्षकांमोर आणण्याच्या उद्देशाने तयार झालेला 'रामायण' भारतीय सिनेमाच्या जागतिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरण्याची अपेक्षा आहे.

'रामायण : पार्ट वन' चित्रपटाच्या अ‍ॅडव्हान्स बुकिंगला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. विशेष म्हणजे, भारतातील तिकीट विक्रीपासून ते परदेशातील प्रीमियर शोजपर्यंत या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर मोठी आघाडी घेतली आहे.चित्रपटाने अ‍ॅडव्हान्स बुकिंगमध्येच १०० कोटींचा टप्पा पार केलाय. दिवाळीच्या आधी प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांना सहसा मिळणारा मर्यादित प्रतिसाद लक्षात घेता 'रामायण'ची ही घोडदौड विशेष महत्त्वाची मानली जात आहे. आकडेवारीनुसार, 'रामायण'ने भारतात अ‍ॅडव्हान्स बुकिंगमधून सुमारे ७५.५६ कोटी रुपयांचा ग्रॉस व्यवसाय नोंदवला आहे. या आकडेवारीत ब्लॉक केलेल्या सीट्सचाही समावेश आहे. त्याव्यतिरिक्त सुमारे १९.१३ लाख तिकिटांची आगाऊ विक्री झाल्याची नोंद आहे. ब्लॉक केलेल्या सीट्स वगळल्यास हा आकडा ६०.०९ कोटी रुपये आणि तिकीट विक्री १५.२२ लाख इतकी आहे. भारत आणि परदेशातील आगाऊ बुकिंगचा एकत्रित आकडा १०५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. उत्तर अमेरिकेतही चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळत असून प्रीमियर शोजसाठी मोठ्या प्रमाणात तिकिटांची विक्री झाली आहे. चित्रपटगृहांच्या साखळीमध्येही 'रामायण'ची क्रेझ पाहायला मिळत आहे.

जाह्नवी कपूर होणार महाराष्ट्रातील मोठ्या राजकीय घराण्याची सून?

जाह्नवी कपूर सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. अभिनेता वरुण धवनसोबत तिने करण जोहरच्या लोकप्रिय चॅट शो 'कॉफी विथ करण'च्या नवव्या सीझनमध्ये हजेरी लावली. या एपिसोडमध्ये अर्जुन कपूरही विशेष पाहुणा म्हणून सहभागी झाला होता. शोमध्ये कलाकारांनी त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल आणि नातेसंबंधांबद्दल मनमोकळ्या गप्पा मारल्या. याचदरम्यान जाह्नवीने तिच्या लग्नाच्या योजनांबद्दल केलेल्या वक्तव्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.करण जोहर त्याच्या शोमध्ये पाहुण्यांना त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल थेट प्रश्न विचारण्यासाठी ओळखला जातो. जाह्नवीसोबतच्या संभाषणादरम्यान त्याने अभिनेत्रीला तिच्या लग्नाच्या योजनांबद्दल विचारले. यावर जाह्नवीने कोणताही संकोच न बाळगता, "पुढील दोन ते तीन वर्षांसाठी निश्चितपणे नाही," असे उत्तर दिले. जाह्नवीच्या या उत्तारवरून सध्या तरी लग्न करण्याची तिची घाई नसल्याचे स्पष्ट झाले. मात्र, तिने लग्नासाठी कोणतीही ठरावीक तारीख किंवा भविष्यातील योजना सांगितली नाही. तिचे लक्ष सध्या काम आणि चित्रपटांवर असल्याचे तिच्या वक्तव्यावरून दिसून आले.

जाह्नवी कपूरचे नाव बऱ्याच काळापासून शिखर पहाडियासोबत जोडले जात आहे. दोघेही अनेकदा एकत्र दिसले आहेत. त्यामुळे त्यांच्या नात्याबद्दल नेहमीच चर्चा रंगत असते. मात्र, 'कॉफी विथ करण' मध्ये जाह्नवीने शिखरसोबतच्या लग्नाबाबत कोणतीही तारीख किंवा तयारी जाहीर केली नाही. त्यामुळे ती लवकर लग्न करणार नाही.जाह्नवी कपूरसोबतच्या नात्यामुळे चर्चेत असलेला शिखर पहाडिया हा उद्योजक आणि व्यावसायिक पोलो खेळाडू आहे. त्याचे वडील संजय पहाडिया हे व्यावसायिक आणि गुंतवणूकदार आहेत. तसेच महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे हे शिखरचे आजोबा आहेत. त्यामुळे शिखरचे नाव महाराष्ट्रातील एका मोठ्या राजकीय कुटुंबाशीही जोडले जाते.



आता आयुष्मान खुरानाला रडारवर?

बॉलिवूडमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. अभिनेता आयुष्मान खुराना याला धमकीचा ऑडिओ मेसेज मिळाल्याची माहिती समोर आली आहे. या ऑडिओ मेसेजमध्ये स्वत:ला लॉरेन्स गँगचा सदस्य असल्याचे सांगणाऱ्या व्यक्तीने अभिनेत्याकडे कोट्यवधी रुपयांची मागणी केल्याचा दावा केला जात आहे. या घटनेमुळे बॉलिवूडमधील कलाकारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आयुष्मान खुराना याला एक धमकीचा ऑडिओ मेसेज पाठवण्यात आला. ऑडिओ पाठवणाऱ्या व्यक्तीने स्वत:ची ओळख लॉरेन्स गँगचा सदस्य अशी करून दिल्याचे सांगितले जात आहे. यामध्ये अभिनेत्याकडे कोट्यवधी रुपयांची मागणी करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, संबंधित व्यक्तीचा लॉरेन्स गँगशी प्रत्यक्ष संबंध आहे का, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आली नाही. पोलिसांनी या ऑडिओ मेसेजची गंभीर दखल घेत तपास सुरू केला आहे.



या प्रकरणात धमकीच्या ऑडिओ क्लिपची तपासणी केली जात आहे. ऑडिओमधील आवाजाची पोलीस रेकॉर्डमध्ये उपलब्ध असलेल्या आवाजाशी तुलना केली जात असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. धमकीचा मेसेज नेमका कोणी पाठवला, त्यामागे कोण आहे आणि संबंधित व्यक्तीचा कोणत्या गुन्हेगारी टोळीशी संबंध आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत.

दरम्यान, वायूवी अभिनेता तुषार कपूर यालाही धमकीचा ऑडिओ मेसेज मिळाल्याची घटना समोर आली होती. या प्रकरणात हॅरी बॉक्सरचे नाव वापरून धमकी देण्यात आल्याची माहिती होती. मात्र, प्राथमिक तपासात हा मेसेज बनावट असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती.

दुसरीकडे, अभिनेता टायगर श्रॉफशी संबंधित गोळीबाराच्या घटनेनंतर चित्रपटसृष्टीतील कलाकारांना मिळणाऱ्या धमक्यांच्या प्रकरणाकडे पोलिसांनी अधिक गांभीर्याने लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. कलाकारांना धमकी देणारे नेमके कोण आहेत, त्यामागे कोणत्या टोळ्यांचा हात आहे आणि या घटनांचा एकमेकांशी काही संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे.फक्तायुष्मान खुराना याला मिळालेल्या कथित धमकीच्या ऑडिओ मेसेजमुळे बॉलिवूडमध्ये पुन्हा चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, धमकी देणाऱ्या व्यक्तीची ओळख आणि लॉरेन्स गँगशी असलेला कथित संबंध याबाबत पोलिसांच्या तपासानंतरच अधिक स्पष्टता येणार आहे.

महालक्ष्मी अन् रविंदर पुन्हा चर्चेत



साऊथ अभिनेत्री महालक्ष्मी शंकर आणि तिचे पती, निर्माते रविंदर चंद्रशेखरन त्यांच्या लग्नापासूनच चर्चेत आहेत. रविंदर यांच्या वजनावरून आणि दोघांच्या वयातील अंतरावरून या जोडप्याला सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आलं होतं. महालक्ष्मीने पैशांसाठी रविंदर यांच्याशी लग्न केल्याचा आरोपही अनेकांनी केला होता. आता लग्नाच्या चार वर्षांनंतर हे जोडपं पुन्हा एकदा चर्चेत आलं आहे. महालक्ष्मीने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ट्रोलर्सना उत्तर दिलं असून, रविंदरसोबतची तिची प्रेमकहाणीही सांगितली आहे. महालक्ष्मीने तिच्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये त्यांच्या नात्याबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. ती म्हणाली, ''हे सर्वकाही तिरुपतीपासूनच सुरू झालं होतं. आमचं आयुष्य, आमचा प्रवास आणि एक नवीन सुरुवात याच ठिकाणापासून झाली.''

पुढे प्रेमाबद्दल बोलताना तिने लिहिलं की, इतर लोक आपल्या नात्याकडे कोणत्या नजरेने पाहतात, काय बोलतात किंवा कोणत्या कमेंट्स करतात, याला प्रेम म्हणता येत नाही. आपल्याला एकमेकांबद्दल काय वाटतं, आपण एकमेकांची किती काळजी घेतो आणि एकमेकांना कसं सुरक्षित ठेवतो, हेच खरं प्रेम आहे. तिच्या या पोस्टमधून महालक्ष्मीने ट्रोलर्सना अप्रत्यक्षपणे उत्तर दिलं आहे.महालक्ष्मी आणि रविंदर यांची पहिली भेट एका चित्रपटाच्या सेटवर झाली होती. रविंदर या चित्रपटाचे निर्माते होते, तर महालक्ष्मी त्यात अभिनय करत होती. एकत्र काम करताना दोघांमध्ये मैत्री झाली आणि पुढे या मैत्रीचं रूपांतर प्रेमात झालं. रविंदर यांनी एका मुलाखतीत सांगितलं होतं की, लग्न करण्यापूर्वी ते दोघे सुमारे दीड वर्षे रिलेशनशिपमध्ये होते.

दिया मिर्झाच्या दिवाळीच्या व्हिडिओवरून वाद

बॉलिवूड अभिनेत्री दिया मिर्झाचा प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन करणारा व्हिडिओ गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. या व्हिडिओवर भाजप नेते आणि मुंबई अध्यक्ष अमित साटम यांच्यासह काही नेत्यांनी आक्षेप घेतला होता. त्यानंतर मुंबई महानगरपालिकेने (बीएमसी) आपल्या 'एक्स' अकाउंटवरून हा व्हिडिओ हटवला. मात्र, या निर्णयामुळे निर्माण झालेला वाद मुंबई उच्च न्यायालयात पोहोचला. आता न्यायालयाने या प्रकरणावर नाराजी व्यक्त करत बीएमसीला दिया मिर्झाचा व्हिडिओ पुन्हा अपलोड करण्याचे निर्देश दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. पर्यावरण, वायू आणि ध्वनी प्रदूषणाबाबत जनजागृती करण्यासाठी तयार केलेल्या व्हिडिओला वेगळे वळण देण्यात आल्याबद्दल न्यायालयाने खेद व्यक्त केला. जनजागृतीसाठी सेलिब्रिटींची निवड करणे हा बीएमसी आयुक्तांचा योग्य निर्णय होता, असेही न्यायालयाने नमूद केले. ''आपला देश धर्मनिरपेक्ष आहे. हा पर्यावरणाचा प्रश्न आहे. या देशात सर्व धर्म आणि जातींचे लोक श्वास घेतात,'' असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. तसेच समाजातील प्रत्येक व्यक्तीचा, तिचा धर्म, जात किंवा पंथ कोणताही असो, आदर केला पाहिजे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. दिया मिर्झाच्या व्हिडिओवर काही भाजप नेत्यांसह मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनीही आक्षेप घेतला होता. त्यानंतर बीएमसीने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवरून ही क्लिप हटवली. मात्र, वाद निर्माण झाल्यानंतर महापालिकेने व्हिडिओ हटवायला नको होता, असे न्यायालयाने म्हटले. हटवलेला व्हिडिओ पुन्हा अपलोड करणे योग्य ठरेल, असे सांगत खंडपीठाने बीएमसीला तसे निर्देश दिले.



सार्वजनिक पदांवर असलेल्या व्यक्तींकडून समाजात एकोपा आणि धर्मनिरपेक्षतेची भावना जपण्याची अपेक्षा असते, असे न्यायालयाने अधोरेखित केले.या प्रकरणामुळे दिया मिर्झाच्या व्हिडिओची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

'जनक'चा ट्रेलर प्रदर्शित!

आरोप म्हणजेच सत्य, की या आरोपांच्या पलीकडे दडलंय काही वेगळंच वास्तव? एका बापाच्या सन्मानासाठी न्यायालयात उतरलेली लेक आणि सत्याचा शोध घेणारा हा संघर्ष प्रत्येक टप्प्यावर नवं गूढ निर्माण करतो. भावनांचा कल्लोळ, कोर्टरूममधील शाब्दिक युद्ध आणि प्रत्येक वळणावर गडद होणारं रहस्य अशा वेगळ्या विश्वाची झलक घेऊन अभिषेक केवर दिग्दर्शित, आर टी वी फिल्म्स प्रस्तुत 'जनक' या उत्कंठावर्धक ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. सत्यघटनेवर आधारित या चित्रपटाचा ट्रेलर प्रत्येक क्षणी नवं कोडं उभं करतो आणि पुढे नेमकं काय घडणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचवतो. 'जनक' सिनेमाचा ट्रेलर एका बापावरील आरोप आणि त्याच्या सन्मानासाठी लढणाऱ्या लेकीचा भावनिक संघर्ष मांडतो. न्यायालयीन प्रक्रियेतील गुंतागुंत, सत्यापर्यंत पोहोचण्याची धडपड आणि प्रत्येक टप्प्यावर समोर येणारे नवे पेच, हे सर्व अधिक परिणामकारक बनवतात. कोर्टरूममधील तणावपूर्ण वातावरण, कलाकारांचा प्रभावी अभिनय यामुळे ट्रेलरची पकड सुरुवातीपासून शेवटपर्यंत कायम राहते. आरोपांमागचं वास्तव काय? बापाचा खरंच आरोप खरे आहेत की त्यामागे दडलेलं असं काही वेगळंच आहे? आपल्या वडिलांचा सन्मान जपण्यासाठी लढणाऱ्या लेकीच्या प्रयत्नांना यश मिळणार का? असे अनेक प्रश्न ट्रेलर पाहताना मनात निर्माण होतात. वडिलांच्या सन्मानासाठी न्यायालयात संघर्ष करणाऱ्या लेकीची भूमिका अभिनेत्री सायली संजीवने ताकदीने साकारली आहे. तिच्या व्यक्तिरेखेतील भावनिक चढ-उतार, अविनाश नारकर यांचा प्रभावी अभिनय आणि सुरेश विश्वकर्मा यांच्यासोबतचे नाट्यमय प्रसंग ट्रेलरमध्ये विशेष लक्षवेधी ठरतात.

अभिषेक केवर यांनी या चित्रपटाचा दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद ओंकार भस्मे यांचे असून, त्रिलोक सिंग राजपूत यांनी असोसिएट प्रोड्युसर, तर सुजीत मुकादे यांनी कार्यकारी निर्माते म्हणून योगदान दिले आहे.

चित्रपटाला आदित्य कडतारे यांचे संगीत लाभले आहे. बापाच्या सन्मानाची शपथ, लेकीच्या जिद्दीची साथ. सत्याच्या लढाईत कोणाची होणार मात? आरोपाच्या पलीकडे दडलेले गूढ उलगडणार कसं? या सगळ्या प्रश्नांचा पडदा उपडणार १३ नोव्हेंबर २०२६ रोजी, मोठ्या पडद्यावर!

सोन्याची भेट देण्यापासून ते खास खरेदीपर्यंत धनत्रयोदशीच्या आठवणी






धनत्रयोदशी हा असा सण आहे, जेव्हा कुटुंबीय एकत्र येतात, समृद्धीचे स्वागत करतात, परंपरा साजऱ्या करतात आणि मनाजवळची खास खरेदी करतात. सोने आणि चांदी शुभ मानली जात असली तरी हा सण जीवनातील महत्त्वाचे टप्पे साजरे करण्याचा, कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि छोट्या-छोट्या गोष्टींमधील आनंद अनुभवण्याचाही असतो. येंदाच्या धनत्रयोदशीच्या निमित्ताने सोनी सब कलाकार दीक्षा जोशी, जितेन लालवानी, करुणा पांडे आणि गुल्की जोशी यांनी त्यांच्या सर्वात संस्मरणीय खरेदीच्या आठवणी सांगितल्या, आई-वडिलांसाठी काही खास करण्याच्या आनंदाबद्दल मनोगत व्यक्त केले आणि हा सण त्यांच्यासाठी विशेष का आहे हे उलगडले. हस्तिनापूर के वीरमध्ये द्रोणाचार्यची भूमिका साकारणारे जितेन लालवानी म्हणाले, ''आमच्यासाठी धनत्रयोदशी हा नेहमीच महागड्या वस्तू खरेदी करण्यापेक्षा कौटुंबिक परंपरांशी जोडलेला सण राहिला आहे. कानपूरमध्ये वाढताना आम्ही सहसा चांदीच्या वाट्या, ताटे, चमचे आणि ग्लास अशी भांडी खरेदी करायचो. माझी आई मुंबईला आल्यानंतर मला ही परंपरा पुढे सुरू ठेवायची होती आणि तिला चांदीची भांडी भेट द्यायची होती, कारण मला माहीत होते की ती स्वतःसाठी सोने खरेदी करण्यापेक्षा चांदीला अधिक पसंती देते. तिने नेहमी जपलेल्या गोष्टींला पुढे नेणे आणि तिच्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या पद्धतीने तिला आनंद देणे हे माझ्यासाठी खूप खास होते. माझ्यासाठी धनत्रयोदशी म्हणजे कुटुंब, परंपरा आणि प्रत्येक खरेदीमागील भावना. एखादी वस्तू किती महाग आहे यापेक्षा तिच्याशी जोडलेले प्रेम आणि जिव्हाळा अधिक महत्त्वाचा असतो.''

पुष्पा इम्पॉसिबलमध्ये दीक्षीची भूमिका साकारणाऱ्या दीक्षा जोशी म्हणाल्या, ''माझ्या सर्वात खास आठवणींपैकी एक म्हणजे मी कमाई करायला सुरुवात केल्यानंतर धनत्रयोदशीला माझ्या आईसाठी सोने खरेदी केले होते. तो क्षण माझ्यासाठी खूपच विशेष होता, कारण पहिल्यांदाच मी माझ्या स्वतःच्या कमाईतून तिच्यासाठी काही अर्थपूर्ण गोष्ट खरेदी करू शकले. लहानपणापासून आपण आपल्या आई-वडिलांना आपल्यासाठी खूप काही करताना पाहत मोठे होतो आणि त्यांना अगदी छोट्याशा स्वरूपात का होईना, काहीतरी परत देणे ही खूप सुंदर भावना असते. ती खरेदी केवळ सोने घेण्यापलीकडे जाऊन होती. तर माझ्या आईला ती किती प्रिय आणि महत्त्वाची आहे याची जाणीव करून देण्याबद्दल होती. ही आठवण मी कायम माझ्या हृदयाजवळ जपून ठेवेन आणि माझ्या मते, प्रेमातून दिलेल्या भेटवस्तू आणखी खास बनतात.''

पुष्पा इम्पॉसिबलमध्ये पुष्पाची भूमिका साकारणाऱ्या करुणा पांडे म्हणाल्या, ''माझ्या आवडत्या खरेदीपैकी एक म्हणजे मी स्वतःसाठी घेतलेली भगवान श्रीकृष्णांची चांदीची मूर्ती. ती आजही माझ्याकडे असलेल्या सर्वात जपलेल्या वस्तूंपैकी एक आहे आणि प्रत्येकवेळी तिच्याकडे पाहिल्यावर मला खूप आनंद होतो. कधीकधी आपण एखादी वस्तू सहजपणे खरेदी करतो, पण काही खरेदी अशा असतात ज्या त्याच्या खास अर्थामुळे अनेक वर्षे आपल्या मनाच्या अगदी जवळ राहतात. ही मूर्ती माझ्यासाठी तशीच एक खास खरेदी आहे. माझ्या मते, धनत्रयोदशी हा असा सुंदर सण आहे ज्याचेळी तुम्हाला आनंद देणारी एखादी गोष्ट घरी आणावी, मग ती सोने, चांदी किंवा तुमच्यासाठी वैयक्तिक महत्त्व असलेली कोणतीही वस्तू असो. माझ्यासाठी एखाद्या वस्तूशी असलेले भावनिक नातेच तिला खऱ्या अर्थाने अमूल्य बनवते.''

वादेमध्ये डॉ. सुष्टीची भूमिका साकारणाऱ्या गुल्की जोशी म्हणाल्या, ''मला सोने खरेदी करायला खूप आवडते कारण ते केवळ सुंदर वस्तू नसून भविष्यासाठी एक उत्तम गुंतवणूकही आहे असे मला वाटते. धनत्रयोदशीचे वैशिष्ट्य म्हणजे हा सण शहाणपणाने गुंतवणूक करण्याची संकल्पना आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या परंपरा यांना एकत्र आणतो. अशा शुभ प्रसंगी सोने खरेदी करण्यात एक वेगळाच आनंद आहे, कारण त्यात आर्थिक आणि भावनिक असे दोन्ही प्रकारचे मूल्य असते. माझ्यासाठी ही अशी परंपरा आहे जी पुढे सुरू ठेवण्यासारखी आहे, कारण ती आपल्याला सण साजरा करण्यासोबतच विचारपूर्वक गुंतवणूक करण्याची संधीही देते.''

''इक्बाल सर आमच्यासाठी नेहमी चॉकलेट्स, केक्स आणि मिठाई घेऊन येतात''

सोनी सबची वादे ही मालिका कथानक किल्लारी गावात पोहोचल्यानंतर नवनवीन नातेसंबंध आणि अनुभवांचा वेध घेत राहते. या बदलासोबतच मालिकेत ज्योती तिवारी यांचे आगमन झाले असून त्या सुहासिनींची भूमिका साकारत आहेत. सुहासिनी ही गावातील एक रहिवासी आहे, जिच्यावर पूर्वी डॉ. देव यांनी उपचार केले होते आणि आता ती डॉ. देव यांना पाठिंबा देणाऱ्या गावकऱ्यांपैकी एक बनली आहे. नव्या वातावरणाशी जुळवून घेत असताना, ज्योती इक्बाल खान आणि गुल्की जोशी या सहकलाकारांसोबत काम करण्याचा अनुभव मनापासून आनंद घेत आहेत. त्या सांगतात की नियमितपणे एकत्र काम केल्यामुळे त्यांच्यात एक सहज आणि जिव्हाळ्याचे नाते तयार झाले आहे, ज्यामुळे दृश्यांचे चित्रीकरण, कल्पनांची देवाणघेवाण आणि शूटिंगचा संपूर्ण अनुभव अधिक आनंददायी झाला आहे.



ज्योतीसाठी, शॉट्समधील छोटे-छोटे क्षण हा अनुभव आणखी खास बनवतात. दीर्घ शूटिंगच्या दिवसांमध्ये एकत्र हसणे-मस्करी करण्यापासून ते सहकलाकारांकडून शिकण्यापर्यंत, या संबांधामुळे सेटवर एक उबदार आणि सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत झाली आहे. तसेच, हे दोन्ही कलाकार आपल्या वेगळ्या व्यक्तिमत्त्वाने आणि उत्साहाने टीममध्ये योगदान देतात, ज्यामुळे कामाचे वातावरण अधिक आरामदायी आणि आनंददायी बनते. आपला अनुभव सांगताना ज्योती तिवारी म्हणाल्या, ''इक्बाल सर आणि गुल्कीसोबतचा माझा अनुभव खूपच मजेशीर राहिला आहे आणि सेटवर त्यांच्यासोबत वेळ घालवताना मला खूप आनंद मिळतो. मला अजूनही आठवतं, माझ्या पहिल्याच दिवशी इक्बाल सर आमच्यासाठी चॉकलेट्स घेऊन आले होते आणि ते आजही तसंच करतात! ते नेहमी चॉकलेट्स, केक्स, मिठाई आणि कधी कधी चिप्सदेखील सर्वांसाठी घेऊन येतात. माझ्या मते, अशा छोट्या गोष्टींमुळे सेटवरील वातावरण खूप उबदार आणि आरामदायी बनते.''

चिराग पुष्पाचा सल्ला ऐकेल का?

सोनी सबची पुष्पा इम्पॉसिबल ही मालिका नातेसंबंधांतील गुंतागुंत आणि त्यांना आकार देणाऱ्या निवडींचा वेध घेत राहते. टायगर (मुकुल हरीश) पुष्पा (करुणा पांडे) आणि शनाया (मुस्कान बामने) यांच्या अधिक जवळ येत असताना, चिराग (नितीन बाबू) मत्सराशी झुंजताना दिसतो. विशेषतः एक लहान मुलीचा जीव वाचवल्यानंतर टायगरच्या शौर्याचे कौतुक होऊ लागल्याने चिराग अधिक अस्वस्थ होतो. टायगरला मिळणारे वाहवत लक्ष सहन न झाल्याने, चिराग रचण दहनादम्यान त्याला इजा पोहोचवण्याच्या उद्देशाने रचनाच्या पुतळ्यात फटाके ठेवतो. मात्र, शेवटच्या क्षणी तो ते फटाके काढून टाकतो. असे असूनही स्फोट होतो आणि संशयाची सुई चिरागकडे वळते, ज्यामुळे त्याला आपल्या कृतीच्या परिणामांना सामोरे जावे लागते. परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत असताना, पुष्पा चिरागला समजावून सांगण्याचा प्रयत्न करते की त्याच्या निवडी त्याला चुकीच्या मार्गावर घेऊन जात आहेत. ती त्याला मत्सारापलीकडे जाऊन विचार करण्यास आणि त्याच्या नकारात्मक कृती त्याच्या मनातील चांगुलपणावर कशा प्रकारे मात करू लागल्या आहेत, हे ओळखण्यास सांगते. पुष्पासाठी हे केवळ त्याच्या चुका दाखवून देण्यापुरते मर्यादित नाही, तर अजूनही त्याच्याकडे परिस्थिती सुधारण्याची संधी आहे, हे त्याला समजावून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

चिराग पुष्पाचा सल्ला ऐकेल का, की त्याच्या असुरक्षित भावना त्याला अंधाऱ्या मार्गावरच पुढे नेत राहतील?

'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स'मधील भोंदूबाबाचे रहस्य उलगडले!

टिझरसह मनोज जोशींचा उत्कंठावर्धक लूक रिव्हील...

घोषणेपासूनच चर्चेचा केंद्रबिंदू ठरलेल्या 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या आगामी मराठी चित्रपटाने राजकीय वर्तुळासह विविध क्षेत्रांतील दिग्गजांचे लक्ष वेधून घेतले आहे. महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक विश्वातील कथित वादग्रस्त पडद्यामोड़ीना रुपेरी पडद्यावर आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या या चित्रपटात नेमके कोणाचे बुरखे फाटणार? कोणाची गुपिते उघड होणार? कोणाच्या पडद्यामागील कारनाम्यांचा पर्दाफाश होणार? अशा अनेक प्रश्नांनी रसिकांच्या मनात कुतूहल निर्माण केले आहे. शीर्षकापासूनच रहस्याची किनार लाभलेल्या या चित्रपटातील व्यक्तिरेखा आणि त्यांच्या कथित वास्तवातील संदर्भांबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे. अशातच आता चित्रपटातील 'कॅप्टन तुम्ही मी नौका, तुमच्या प्रेमाचा टेबल टाका...' या गाण्यासोबतच कथित भोंदूबाबाचे पहिले पोस्टरसह टिझर प्रदर्शित करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली असून, या सिनेमाबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.



आनंदी पिक्चर्स अमरावती आणि सचिन रोडे पाटील प्रस्तुत 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या मराठी चित्रपटाची निर्मिती माताेश्री एन्टरटेन्मेंट वर्ल्डच्या वैनरखाली करण्यात आली आहे. देवेंद्र भट, सूर्यकांत भुंडे आणि प्रशांत कदमपुरे यांनी या चित्रपटाच्या निर्मितीची धुरा सांभाळली आहे. दिग्दर्शक स्वरूप सावंत यांनी या चित्रपटाच्या माध्यमातून समाजात फोफावलेल्या भोंदूगिरीचा पर्दाफाश करत अशा प्रवृत्तींवर परखड भाष्य केले आहे. चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवादांची जबाबदारी संजय नवगिरे यांनी समर्थपणे पेलली असून संकल्पना सागरकुमार एस. जैन यांची आहे. पुणे येथील लेमन ट्री हॉटेलमध्ये आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात चित्रपटातील 'कॅप्टन तुम्ही मी नौका, तुमच्या प्रेमाचा टेबल टाका... हे गाणे प्रदर्शित करण्यात आले. याच सोहळ्यात चित्रपटातील कथित भोंदूबाबाचा चित्रपटातील लूक रिव्हील करण्यात आला आहे. संजय नवगिरे यांच्या लेखणीतून साकारलेल्या या गीताला रोहित नागभिडे यांनी संगीतसाज चढवला असून, सुग्धा कऱ्हाडे यांच्या आवाजाने त्याला खुमासदार रंगत आणली आहे. शब्दालंकार सूचक अर्थ, सुरासुरांत मिश्कीलपणा आणि टोकदारपणा उपरोधाची धार असलेले हे गाणे केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नाही. 'कॅप्टन' आणि 'नौका' या रूपकांतून नेतृत्व, संघीसाधुपणा आणि समेभोवती फिरणाऱ्या नातेसंबंधांवर मार्मिक भाष्य करण्याचा प्रयत्न यात करण्यात आला आहे. साहिल साह यांनी नृत्य दिग्दर्शन केलेल्या या गाण्यावर तानिया चॅटर्जी यांनी अप्रतिम नृत्य सादर केले आहे. गाण्याद्वतकाचा भोंदूबाबाचा लूकही लक्षवेधी ठरला आहे. मागील काही दिवसांपासून प्रेक्षकांच्या मनात कुतूहल निर्माण केलेले भोंदूबाबाचा पाठमोऱ्या गूढ पोस्टरवील चेहरा प्रकाशझोतात आला आहे. या भूमिकेसाठी मनोज जोशी याना केलेला लूक खऱ्या अर्थाने खूप वेगळा असून, याच गेटअपमध्ये त्यांनी कार्यक्रमात एन्ट्री करीत सर्वांचे लक्ष वेधले.त्या बहुचर्चित पोस्टरमध्ये पाठमोऱ्या दिसणाऱ्या भोंदूबाबाच्या भूमिकेत दुसरे-तिसरे कोणी नसून अभिनेते मनोज जोशी झळकणार असल्याचे उघड झाले आहे. त्यांच्या जोडीला अभिनेती दीपाली सय्यद महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकणार असून, त्यांचा लूक यापूर्वीच उघड करण्यात आला होता. मात्र, मनोज जोशी यांचा चेहरा मुद्दाम दडवण्यात आल्याने त्यांच्या व्यक्तिरेखेने नेमके स्वरूप काय असेल आणि हा भोंदूबाबा कथानकात कोणते रहस्य उलगडणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती.

या चित्रपटात मनोज जोशी, दीपाली सय्यद, सुबोध भावे, उदय टिकेकर, अक्षय टंकसाळे, माधुरी पवार, सुरेश विश्वकर्मा, भारत गणेशपुरे, अमिल नगरकर, मोनिका, शिवराज बालवेकर, सिद्धेश्वर झाडबुके, श्रेया कुलकर्णी, राहुल बेलापूरकर इत्यादी कलाकारांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. छायाचित्रणाच्या माध्यमातून चित्रपटात दृश्यात्मक उठाव देण्याचे काम आकाश काकडे यांनी केले आहे, तर अक्षय आंबेकर यांनी कलादिग्दर्शनातून कथानकाला साजेसा दृश्याविष्कार घडवला आहे. अपेक्षा गांधी सोनी यांनी वेशभूषेची धुरा सांभाळली असून, निर्मितीच्या नियोजनाची जबाबदारी नेहा घोडके यांनी प्रॉडक्शन कंट्रोलर म्हणून, तर सचिन घनवट यांनी प्रॉडक्शन हेड म्हणून पार पाडली आहे. लाईन प्रोड्युसर यश सणस आहेत तर विजय म्हस्के यांनी प्रॉडक्शन मॅनेजर म्हणून काम पाहिले आहे.

माधुरीसोबत '...करोडपती'च्या मंचावर रंगणार दिवाळीची धम्माल




दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह, नाती आणि भरपूर धमाल! यंदा हाच उत्साह कोण होणार करोडपतीच्या मंचावरही अनुभवायला मिळणार आहे. होस्ट माधुरी दीक्षितच्या साथीने यंदाची दिवाळी अधिक खास करण्यासाठी मनोरंजन विश्वातील तीन लोकप्रिय चेहरे सहभागी होणार आहेत. अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, रविना टंडन आणि प्रसिद्ध दिग्दर्शिका, नृत्यदिग्दर्शिका फराह खान यांच्या उपस्थितीत दिवाळीचे तीन विशेष भाग रंगणार असून, प्रेक्षकांना मनोरंजनाची अनोखी मेजवानी अनुभवायला मिळणार आहे.

हे दिवाळी विशेष भाग शनिवारी ७ नोव्हेंबरपासून येणार असून सुरुवात सोनाली कुलकर्णीच्या खास भागानं होणार आहे. सोनालीच्या गप्पांमधून तिचं मराठी मातीशी असलेलं नातं, मराठी संस्कृतीवरील प्रेम आणि तिच्या खास आठवणी उलगडणार आहेत. याच भागात माधुरी दीक्षितने डेन्हरमध्ये आपल्या कुटुंबासोबत साजऱ्या केलेल्या दिवाळीच्या आठवणीही सांगितल्या आहेत. या दोघींच्या मराठमोळ्या अंदाजाला आणखी खास बनवणारा क्षण म्हणजे पारंपरिक वेशभूषेत त्यांनी आली माझ्या घरी ही दिवाळी या खास दिवाळी गाण्यावर केलेला धमाकेदार डान्स. बासोबतच या मराठमोळ्या अभिनेत्रींनी मंचावर घातलेल्या फुगड्या आणि झिम्मा यांने वामध्ये एक वेगळीच रंगत आणली आहेच मात्र, त्याला जोड म्हणून लाभलेली ढोल-ताशांची साथ यामुळे कोण होणार करोडपतीच्या मंचावरची ही दिवाळी अवर्णनीय झाली आहे.

टंडनसोबत. रविना आपल्या खास अंदाजात प्रेक्षकांचं मनोरंजन करणार आहे. खाद्यपदार्थांवरील तिचं प्रेम, खाण्यापिण्याच्या आवडी आणि कुटुंबातील मजेशीर किस्से यांमुळे गप्पांना रंग चढणार आहे. विशेष म्हणजे, लग्नाच्या विषयावर बाबांनी केलेल्या एका मजेशीर टिप्पणीचा किस्साही रविना सांगणार आहे. यानंतर १० नोव्हेंबरचा म्हणजे पाडव्याचा विशेष भाग रंगणार आहे फराह खानसोबत. चित्रपट क्षेत्रातील चटपटीत आठवणी, देश विदेशातील कोरिओग्राफी, आणि खाण्याच्या पदार्थांच्या खुमासदार चर्चा या भागात रंगणार आहेत. हा विशेष भाग चित्रपटातील नायक नायिकांच्या कोरिओग्राफीतील गमतीशीर अनुभवांचा असेल तसेच भाजणीच्या चकलीसारख्या खमंग तारे तारकांविषयीच्या गप्पांचा देखील असेल.

हास्याचे फटाके आणि ठसकेदार मनोरंजक किस्से आणि चित्रपटविश्वातील गप्पांची रंगत या दिवाळी विशेष भागात तीन वेगवेगळ्या दिग्गज कलाकारांसोबत प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. या तीन वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वांच्या तीन खास भेटी, माधुरी दीक्षितसोबत रंगणाऱ्या मनमोकळ्या गप्पा, जुन्या आठवणी, मराठमोळा साज आणि धमाकेदार नृत्य अशा मनोरंजनानं भरलेल्या या दिवाळी विशेष भागांमुळे कोण होणार करोडपतीचा मंच यंदा अक्षरशः उजळून निघणार आहे.तेव्हा, या दिवाळीच्या आनंदात सहभागी होण्यासाठी पाहायला विसरू नका कोण होणार करोडपतीचे विशेष भाग, शनिवार ते मंगळवार रात्री ९ वाजता, फक्त सोनी मराठी आणि सोनी लिव वर!

शाहरुख प्रेरणादायी



सोनी सबची पुष्पा इम्पॉसिबल ही मालिका पुष्पा (करुणा पांडे) हे चरित्र आयुष्यात नवनवीन आव्हाने आणत राहतात, कारण ती बदलत्या कौटुंबिक नातेसंबंधांशी आणि कठीण परिस्थितींशी सामना करत आहे. चिराग (नितीन बाबू) कामाच्या ठिकाणी निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितींना सामोरे जात असताना, तसेच पुष्पा आणि टायगर (मुकुल हरीश) यांच्याशी संबंधित भावनांशी जुळवून घेण्यासाठी संघर्ष करत असताना, त्याचे वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्य दोन्हीही कठीण टप्प्यांतून जात आहेत.

प्रेरणेबद्दल बोलताना नितीन बाबू म्हणाले, ''चिराग हा एक पोलिस अधिकारी आहे आणि जवानमधील शाहरुख खान यांची पोलिस अधिकाऱ्याची भूमिका मला खूप आवडते. त्यांनी स्वतःला ज्या पद्धतीने सादर केले आहे आणि आपल्या हावभाव व देहबोलीतून जी तीव्रता दाखवली आहे, ती खरोखर प्रेरणादायी आहे.

बालपणीच्या दिवाळीच्या आठवणी

दिवाळी हा नेहमीच कौटुंबिक परंपरा, सणासुदीचे पदार्थ, नवीन कपडे आणि उत्साह यांनी भरलेला असतो. ही आठवण साजरी करण्याच्या पद्धती बदलल्या असतील, पण बालपणीच्या दिवाळीच्या आठवणींचे स्थान नेहमीच खास असते. यंदाच्या दिवाळीनिमित्त सोनी सबचे कलाकार करणा पांडे, मुकुल हरीश, विवाना सिंग आणि जितेन लालवानी यांनी त्यांच्या बालपणातील सर्वात संदर आठवणींना उजाळा दिला आणि या सणाला त्यांच्यासाठी खास बनवणारे क्षण शेअर केले.


पुष्पा इम्पॉसिबलमध्ये पुष्पाची भूमिका साकारणाऱ्या करुणा पांडे यांनी सांगितले, ''मला आठवतं, आम्ही आमचं घर पणत्या आणि रोषणाईने सजवत असू आणि आमच्या घरी अनेक पाहुणे येत असत. फटाके फोडणे आणि आईने बनवलेल्या स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेणे हा माझा सर्वात आवडता भाग होता.''

पुष्पा इम्पॉसिबलमध्ये टायगरची भूमिका साकारणारे मुकुल हरीश यांनी सांगितले, ''माझ्या आवडत्या आठवणींपैकी एक म्हणजे सर्वांसोबत बडिलांच्या कारखान्यात विशेष दिवाळी पूजेसाठी जाणे. तो परिसर सुंदर सजलेला असायचा आणि सणाच्या उत्साहाने भरलेला असायचा.''

हस्तिनापूर के वीरमध्ये गांधारीची भूमिका साकारणाऱ्या विवाना सिंग यांनी सांगितले, ''माझ्या बालपणीच्या दिवाळीच्या सर्वात आवडत्या आठवणींपैकी एक म्हणजे माझ्या बहिणींसोबत तयार होणे. एकत्र सजणे आणि कुटुंबासोबत दिवाळी साजरी करण्याचे ते क्षण, दिवाळीच्या आठवणींमधील माझ्या मनाजवळचे आणि सर्वात प्रिय क्षण आहेत.''

हस्तिनापूर के वीरमध्ये द्रोणाचार्यची भूमिका साकारणारे जितेन लालवानी यांनी सांगितले, ''आज मागे वळून पाहताना जाणवतं की, दिवाळीसाठी घराची तयारी करताना आईला केलेली ती छोटीशी मदतच माझ्या बालपणीच्या सर्वात जपून ठेवण्यासारख्या आणि प्रिय आठवणींपैकी एक बनली आहे.''


शनाया चाळ सोडणार?



सोनी सबची पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत आता एक भावनिक वळण येणार आहे, कारण बापोट्टा (जयेश भरथा) यांना अखेर शनाया (मुस्कान बामने) ही प्रत्यक्षात शॉन असल्याचे समजते.

शनाया आपल्या बाजूची कहानी समजावून सांगण्याचा आणि बापोट्टाना पटवून देण्याचा प्रयत्न करत असताना, टायगरने तिची पर्यवनगी न घेता तिची खरी ओळख उघड केल्यामुळे ती त्याच्यासमोर नाराजी व्यक्त करते. शनाया बापोट्टांसोबतचे नाते सुधारण्यासाठी चाळ सोडून जाण्याचा निर्णय घेईल का? आगामी कथानकाबद्दल बोलताना मुस्कान बामने म्हणाली, ''शॉन आणि शनाया या दोन्ही व्यक्तिरेखा साकारणे माझ्यासाठी खूपच आनंददायी अनुभव होता या दोन्ही व्यक्तिरेखा वेगवेगळ्या बाजू शोधताना आणि पडद्यावर त्यांतील फरक प्रभावीपणे साकारताना मला खूप आनंद मिळाला.''

लो चुडैल चली ससुरालमध्ये दिसणार अधिक मेहता



सोनी सब आपल्या आगामी सिटकॉम लो चुडैल चली ससुराल द्वारे कौटुंबिक मनोरंजन, प्रेम आणि जादुई गोंधळाचा एक मनोरंजक संगम प्रेक्षकांसाठी घेऊन येण्यास सज्ज आहे.या जादुई कथेत आणखी आकर्षण आणि आपुलकीची भर घालत अभिनेता अधिक मेहता आरव पटेलच्या भूमिकेत दिसणार आहेत. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना अधिक मेहता म्हणाले, ''आरवबद्दल मला सर्वात जास्त आवडणारी गोष्ट म्हणजे तो मनापासून निर्णय घेतो आणि आयुष्यात कितीही अपेक्षित प्रसंग आले तरी योग्य तेच करण्याचा प्रयत्न करतो. लो चुडैल चली ससुरालमध्ये भरपूर विनोद आणि प्रेमळ पात्रे आहेत. आरवसोबतच्या या मजेशीर नव्या प्रवासात प्रेक्षक सहभागी होतील यासाठी मी खूप उत्सुक आहे.''

दैनिक महासत्ता
॥ भक्ती ॥
३
शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर २०२६

भगवान धन्वंतरी जन्मकथेसह धनत्रयोदशीला पूजेचे महत्त्व

(पान४ वरून)

मात्र, ती कन्या वीरभद्रा नावाची एक अविवाहिता गणिका असल्याचे तिने सांगितले. हे समजल्यानंतर ऋषींनी तिला आपल्या आश्रमात नेले. तेथे त्यांनी कुश गवतापासून पुष्पाकृती तयार करून ती तिच्या मांडीवर ठेवली आणि मंत्रोच्चार करून तिची प्रतिष्ठापना केली. त्यातूनच भगवान धन्वंतरींचा जन्म झाला, अशी आख्यायिका सांगितली जाते. वेदमंत्रांनी अभिमंत्रित केल्यामुळे त्यांना वैद्य असेही संबोधले गेले.




विष्णुपुराणानुसार भगवान धन्वंतरींचा जन्म

विष्णुपुराणानुसार धन्वंतरी हे दीर्घतपा यांचे पुत्र होते. या ग्रंथात भगवान धन्वंतरींचे वर्णन जरा आणि शारीरिक विकारांपासून मुक्त असलेले, निरोगी शरीर आणि इंद्रिये असलेले तत्तेच सर्व शास्त्रांचे ज्ञान असलेले महापुरुष असे करण्यात आले आहे. भगवान नारायणांनी त्यांना पूर्वजन्मात वरदान दिले होते. काशीराजाच्या वंशात जन्म घेऊन आयुर्वेदाचे आठ विभाग करावेत आणि यज्ञातील हविर्भाग स्वीकारण्याचा मान प्राप्त करावा, असे वरदान त्यांना मिळाला होता.

ब्रह्मपुराणानुसार धन्वंतरी अवताराची कथा

ब्रह्मपुराणात भगवान धन्वंतरींच्या जन्मासंदर्भात आणखी एक कथा सांगितली आहे. या कथेनुसार, काशीच्या राजवंशात धन्व नावाचे एक राजा होते. त्यांनी अज्ञ देवतेची मनोभावे उपासना केली. त्यांच्या भक्तीवर प्रसन्न होते देवतेने वरदान मागण्यास सांगितले. त्यावेळी राजाने देवतेला आपल्या घरी पुत्ररूपाने जन्म घेण्याची विनंती केली. राजाची भक्ती आणि श्रद्धा पाहून देवतेने त्यांची इच्छा पूर्ण केली. या अवताराला देवोदास असेही संबोधले जाते. धन्व राजाचे पुत्र आणि धन्वंतरींचा अवतार म्हणून त्यांना धन्वंतरी असेही नाव प्राप्त झाले. आयुर्वेदाच्या प्राचीन ग्रंथांमध्ये उल्लेख आयुर्वेदाच्या प्राचीन ग्रंथांमध्ये भगवान धन्वंतरींच्या विविध स्वरूपांचे आणि आयुर्वेदातील त्यांच्या योगदानाचे वर्णन करण्यात आले आहे. सुश्रुत संहिता, चरक संहिता, काश्यप संहिता आणि अष्टांगहृदय यांसारख्या महत्त्वपूर्ण ग्रंथांमध्ये त्यांचा उल्लेख आढळतो. तसेच भावप्रकाश, शार्ङ्गधर संहिता आणि त्या काळातील इतर आयुर्वेदिक ग्रंथांमध्येही आयुर्वेदाच्या अवतरणाचा प्रसंग सांगण्यात आला आहे. या ग्रंथांमधून भगवान धन्वंतरींचा आयुर्वेदातील महत्त्व आणि वैद्यकशास्त्राशी असलेले त्यांचे नाते स्पष्ट होते.



महाकवी व्यास यांनी रचलेल्या श्रीमद्भागवत महापुराणातही भगवान धन्वंतरींना भगवान विष्णूंचा अंशावतार मानण्यात आले आहे. त्यांच्या अवताराचे वर्णन भगवान विष्णूंच्या दिव्य अवतारांपैकी एक म्हणून करण्यात आला आहे. अशा प्रकारे भगवान धन्वंतरी हे केवळ आयुर्वेदाचे जनक किंवा वैद्यकशास्त्राचे देवता नसून आरोग्य, निरोगी जीवन आणि दीर्घायुष्याचे प्रतीक मानले जातात. त्यामुळेच धनत्रयोदशीच्या दिवशी त्यांची पूजा करून उत्तम आरोग्य, सुख–समृद्धी आणि दीर्घायुष्य लाभावे, अशी प्रार्थना केली जाते.

नरक चतुर्दशीला काय करावे?

(पान४ वरून)

'श्रीमद्भागवतपुराणात अशी एक कथा आहे. पूर्वी प्राग्ज्योतिषपूर येथे भौमासुर किंवा नरकासुर या नावाचा एक बलाढ्य असुर राज्य करत होता. देव आणि मानव यांना तो फार पीडा देऊ लागला. हा दुष्ट देव स्त्रियांना पीडा देऊ लागला. त्याने जिंकून आणलेल्या सोळा सहस्र उपवर राजकन्यांना कारागृहात कोंडून ठेवले आणि त्यांच्याशी विवाह करण्याचा बेत केला.

त्यामुळे जिकडेतिकडे हाहाःकार उडाला. श्रीकृष्णाला हे वृत्त समजताच सत्यभामेसह त्याने नरकासुरावर आक्रमण केले आणि त्याला ठार करून सर्व राजकन्यांना मुक्त केले. मरतांना नरकासुराने कृष्णाकडे वर मागितला, 'आजच्या तिथीला जो मंगलस्नान करील, त्याला नरकाची पीडा होऊ नये.' कृष्णाने तसा वर त्याला दिला. त्यामुळे आश्विन वद्य चतुर्दशी ही 'नरक चतुर्दशी' मानली जाऊ लागली आणि लोक त्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करू लागले. चतुर्दशीच्या पहाटे नरकासुरास ठार करून त्याच्या रक्ताचा टिळा कपाळास लावून श्रीकृष्ण घरी येताच मातांनी त्याला आलिंगन दिले. स्त्रियांनी दिवे ओवाळून आनंद व्यक्त केला. आश्विन कृष्ण चतुर्दशीस नरक चतुर्दशी असे म्हणतात. दिवाळीच्या दिवसांतील हा एक सण आहे. या सणाशी संबंधित एक आख्यायिक प्रचलित आहे. नरकासुर नावाच्या एका राजाने तप करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले व कुणाकडूनही वध होणार नाही -- असा वर मागून घेतला. त्या वरच्या योगाने त्याने अनेक राजांना हरवून त्यांच्या कन्या व त्या राज्यांतील स्त्रियांचे अपहरण केले. नरकासुराने अश्या एकूण १६,१०० स्त्रियांना पळवून नेले व मणिपर्वताचर एक नगर वसवून त्यात त्यांना बंदी बनवून ठेवले. त्याने अगणित संपत्ती लुटली व अश्याच हावेपोटी त्याने देवमाता अदितीची कुंडले व वरुणाचे विशाल छत्रही बळकावले. त्याला मिळालेल्या वरामुळे तो देव, गंधर्व व मानवांना तापदायक झाला होता. अनेक गिरिदुर्गांनी वेढलेले प्राग्ज्योतिषपूर हे नगर त्याची राजधानी होती.

ही राजधानी अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या खंदकांनी अग्नी, पाणी इत्यादींनी वेढलेली होती. या दुर्जय राजधानीवर कृष्णाने गरुडावर स्वार होऊन चाल केली. कृष्णाने नरकासुराच्या दैत्यांचे दोन तुकडे करत त्याचा वध केला. नरकासुरवधाने देवादिकांना, तसेच प्रजेला आनंद झाला. नरकासुराच्या बंदिवासातील कुमारिकांना त्यांचे स्वजन स्वीकारणार नाहीत, हे जाणून कृष्णाने या १६,१०० कन्यांसोबत विवाह केला व त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. कृष्णाच्या पराक्रमाचे स्मरण म्हणून नरक चतुर्दशी साजरी करतात.

आदल्या रात्री १२ वाजल्यापासूनच वातावरण दूषित लहरींनी युक्त असे बनू लागते; कारण या तिथीला ब्रह्मांडातील चंद्रनाडीचे सूर्यनाडीमध्ये स्थित्यंतर घडून येते. या स्थित्यंतराचा अपेक्षित असा लाभ पाताळातील वाईट शक्तींकडून उठवला जातो. पाताळातून प्रक्षेपित होणाऱ्या नादयुक्त कंपन लहरी वातावरणात त्रासदायक अशा ध्वनीची निर्मिती करतात. या ध्वनीची निर्मिती लहरींतील रज-तमात्मक कणांच्या हालचालींतून उत्पन्न झालेल्या ऊर्जेतून केली जाते.

या लहरी विस्फुटित लहरींशी संबंधित असतात. या लहरींतील ध्वनीकंपनांना आवर घालण्यासाठी पहाटेच्या वेळी अभ्यंगस्नान करून तुपाचे दिवे लावून दीपावली मनोभावे पूजा करतात. यामुळे दीपातून प्रक्षेपित होणाऱ्या तेजतत्त्वात्मक लहरींच्या माध्यमातून वातावरणातील त्रासदायक लहरींतील रज-तम कणांचे विघटन केले जाते.या विघटनात्मक प्रक्रियेमुळे अनेक सूक्ष्म शक्तींच्या कोषांतील रज-तम कणांही विरघळले जातात आणि वाईट शक्तींच्या भोवती असलेले संरक्षककवच नष्ट होण्यास साहाय्य होते. यालाच 'आसुरी शक्तींचा वातावरणात दिपाच्या साहाय्याने झालेला संहार' असे म्हणतात; म्हणून या दिवशी वाईट शक्तींचे निर्दालन करून पुढच्या शुभकार्यांला दिपावलीच्या इतर दिवसांच्या माध्यमातून जिवाने आरंभ करावयाचा असतो. असुरांच्या संहाराचा दिवस, म्हणजेच एकप्रकारे नरकातील पृथ्वीवर अवतीर्ण झालेल्या वाईट लहरींच्या विघटनाचा दिवस म्हणून नरकचतुर्दशीला विशेष महत्त्व आहे. आकाशात तारे असतांना ब्राह्ममुहूर्तावर अभ्यंगस्नान करतात. आघाडा या वनस्पतीच्या फांदीने ओवाळापासून पायापर्यंत आणि पुन्हा ओवाळपर्यंत पाणी प्रोक्षण करतात. यासाठी मूळ असलेली आघाड्याची वनस्पती वापरतात. नरकचतुर्दशीच्या दिवशी अलक्ष्मीचे पहाटे मर्दन करून आप्त्यातील नरकरूपी पापवासनांचा नायनाट व अहंकाराचे उच्चाटन करायचे आहे. तेव्हाच आत्म्यावरील अहंचा पडदा दूर होऊन आत्म्यातील प्रकाशित होईल.

नदीला माता का म्हणतात?

नद्या गावोगाव वहात असतात. शेतीला पाणी पुरवितात. अन्नधान्य भरपूर पिकण्यामुळे सर्व प्राणीमात्रांना खायला अन्न मिळते. शरीराचे पोषण होते.थंड चवदार पाणी प्यायला आपल्या पुत्रांना म्हणजे सर्व प्राण्यांना देते. माता आपल्या मुलाला दूध–पाणी पाजून पालन पोषण करते. वाढविते.संस्काराही मनावर करते. अगदी तसेच संस्कार नदी आपल्या वागणुकीत आपल्या मुलावर करत असते.बाळ बाळंतीण प्रथम नदीला वंदन करून तिची ओटी भरून तिचा आशिर्वाद घेऊन मग स्नालीकाहे हिंडा फिरायला लागते.लाड,मुंज यांची अक्षता म्हणजे निमंत्रण, प्रथम नदीला देतात.नदीला देवता मानतात.आई मुलाचे अपराध पोटात घालते.नदी पाण्याबरोबर वहात आलेले सर्व काही आपल्या बरोबर वाहत वहात घेऊन जाते. गरीब,श्रीमंत,लहान थोर, सज्जन–



दुर्जन,कोणताही भेदभाव मनात न ठेवता सर्वांना स्नानास, कपडे धुण्यास, पिण्यास, शेतीस पाणी देते. जलचर प्राणी सुखाने विहार करतात. पिढ्यान पिढ्या जीवन जगत असतात.मन विशाल करून वहात असते.नावे आणि बोटीतून अनेक प्रवासी प्रवास करतात.पण कधी रात्र,दुःख वाटून घेत नाही. कुणी पूजा केली अथवा नैवेद्य अर्पण केला म्हणून गर्वाने फुगून जात नाही.कुणी वंदा कुणी निंदा पाणी देणे हाच तिचा धंदा!तिची निर्लोपवृत्तीने नदी वाहत असते.सर्वांवर सारखे प्रेम करत असते.म्हणून तिला माता म्हणतात.काटकुट्यातून

दऱ्या,डोंगरावरुन,खाचखळ्यातून प्रवास चालू असतो. सहनशिलता बाळगते. मुलांच्यासाठी सर्व आपल्या जीवाची पर्वा न करता त्यांची काळजी घेते.त्यांचे अपराध पोटात घालते.चांगल्या प्रकारचे संस्कार करते.तशी माझी आई कृष्णामाई इथे शिवा, भद्रा, भोगावती, कुंभी नदी,सरस्वती मिळोनी पंचगंगा नामे ख्याती इथे

–राजेंद्र शामराव महमदापुरे
कुरुंदवाड
मो.९४२३०८४२३०

वनकंटक,आढ्यदेश व महाराष्ट्र इथून वहात जाऊन ती समुद्रास जाऊन मिळते.तिजला १८६ पवित्र तिर्थे मिळाली.ती उगमापासून ते समुद्रास जाऊन मिळेपर्यंत समजा आईला मुलगा वाढून तसे बोलला तरी त्या माऊलीच्या तोंडून त्याच्या बद्दल अपशब्द येत नाही.तू सुखी रहा असेच म्हणते.नदीत सर्व प्रकारची घाण येऊन पडते.पण कधी कुत्कुरत नाही.सगळं पोटात घेते.सागराकडे धावत जाते.नदीचे वर्तन मातेसमान असल्याने नदीला माता मानतात.

।।विठोबाचे राज्य आम्हा नित्य दिवाळी।।

दीपावलीला आपल्याकडे अनेक शतकांची परंपरा आहे आणि संत सहित्यातही याचे उल्लेख ओघाने आलेले दिसतात. देवकथी आणि चांगल्या वर्तनुकीची सामान्यजनांना संथा देणा–या महाराष्ट्रातील नामवंत संतांच्या बोलांमध्ये दिवाळीचे उल्लेख जागोजागी आढळतात. दिवाळीचे फक्त चार–पाच दिवस आनंदात राहून सौजन्याने वागण्याऐवजी हा धर्म नेहमीच पाळावा,असा उपदेश संतांनी त्यांच्या साहित्यातून केलेला आहे.

हिंदू संस्कृतीमध्ये सर्वात आनंददायी आणि मोठा सण म्हणून दिवाळीकडे पाहिले जाते. पुराणातील अनेक कथांचा संबंध दिवाळीशी आहे. आनंद आणि प्रकाशाचा सण म्हणून दिवाळीकडे पाहिले जाते.या दिवाळी सणाचे प्रतिबिंब संत साहित्यात जागोजागी पडल्याचे दिसून येते.

दिवाळीचा उल्लेख वारंवार आलेला असला तरी त्यात पाच दिवसांच्या दिवाळीचा जो आनंद आहे, तो केवळ तेवढ्यापुरता मर्यादित न राहता आपल्या जीवनामध्ये कायमची दिवाळी करी राहील,यासाठी संतांनी त्यांच्या साहित्यातून मार्गदर्शन केल्याचे दिसते. ज्ञानेश्वर महाराज जीवनात निरंतर दिवाळी यावी यासाठी आपण जे प्रयत्न केले ते सांगताना म्हणतात–

मी अविवेकाची काजळी।
फेडोनी विवेक दीप उजळी।।

ते योगिया पाहे दिवाळी।। निरंतर।।

माणसाच्या जीवनामध्ये अविवेक हाच त्याच्या दुःखाला कारणीभूत असतो.या अविवेकांची माणसाच्या मन:पटलावर काजळी जमा झालेली आहे, ती काजळी 'फेडून' मी तेथे विवेकाचा नंदादीप पेटविते. त्यामुळे अखंड दिवाळीचा आनंद मिळतो, असे ज्ञानेश्वर महाराज सांगतात.अविवेकाचा अंधार ज्या वेळेला जीवनातून जाईल, त्याच वेळी विवेकाचा दीप उजळेल. एकदा विवेकाचा दीप उजळला की सद्विचारांकडे जाणारी वाट दिसू लागेल.त्या वाटेवरून जाताना मिळणारा आनंद खंडित होणारा नसेल. म्हणूनच ती दिवाळी खं–या अर्थाने अखंडित राहणारी असेल. जीवनातील अज्ञानाचा अंधकार नाहीसा व्हावा, अशी प्रार्थना विश्वात्मक देवाकडे करताना पसायदानामध्ये ज्ञानेश्वर महाराज म्हणतात–

दुरितांचे तिमीर जावो।
विश्वस्वधर्म सूर्ये पाहो।
जो जे वांछिल तो ते लाहो।
प्राणिजात।।

दुरित याचा शब्दश: अर्थ पाप जरी असला तरी येथे अज्ञान असाच त्याचा अर्थ अभिप्रेत आहे. दुरितांचे तिमीर म्हणजे अज्ञानाचा अंधार जावा आणि विश्वस्वधर्म अर्थात मानवतेचा विचारांचा सूर्य उगवावा आणि संपूर्ण सजीव असणारे प्राणी जे काही इच्छा करतील ती त्यांची इच्छा पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा ज्ञानेश्वर महाराज करतात. अज्ञानी लोकांच्या जीवनात ज्ञानाचा दीप उजळावा यासाठी संत सतत प्रयत्नशील असतात म्हणून तुकाराम महाराज तर ज्या दिवशी संत आपल्या घरी येतील तोच दिवस दिवाळीचा दिवस समजावा, असे सांगताना म्हणतात–

साधू संत येती घरा। तोची दिवाळी दसरा।।

तिथीप्रमाणे वर्षातून पाच दिवस येणारी दिवाळी निश्चितच आनंद देणारी आहे. मात्र तुकाराम महाराज म्हणतात की, ज्या दिवशी साधुसंत आपल्या घरी येतील, ती तिथी कोणतीही असली तरी त्या दिवशी आम्हाला होणारा आनंद हा दिवाळी–दस–यासारखा असतो. साधूच्या भेटीत दिवाळीचा आनंद मिळावा, असे काय त्यात दडलेले आहे,



असा प्रश्न महाराजांना विचारला तेव्हा महाराज सांगतात --

संत सगांतीचे काय सांगू सुख।
आपणा पारिखे नाही तेथे ।
संतांच्या संगतीचे सुख शब्दात सांगता येण्यासारखे नाही. 'शब्दवैन संवादू। गुजवेन अनुवादू।' अशी ती अनुभूती असते ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

संतांच्या संगतीत जड–मूढ जरी आला तर तो तरुण होऊन गेल्याशिवाय राहात नाही. तुकाराम महाराज तर सांगतात की, देवपेक्षाही संतांची संगत महत्त्वाची आहे. देव तुम्हाला प्रसन्न झाला तर भौतिक सुखाच्या गोष्टी देईल, मोक्ष देईल, मुक्ती देईल. मात्र तो कधीही तुम्हाला देव करणार नाही. संतांचे मात्र तसे नाही. संतांची कृपा झाली की ती व्यक्ती कितीही अवगुणी असली तरी तिचा तत्काळ उद्धार झाल्याशिवाय राहात नाही. हे सांगताना महाराज स्पष्ट प्रमाण देतात–

आपणासारिखे करिती तत्काळ।
नाही काळ–वेळ तयालागी।।

विठोबाची आळवणी करणारी सुंदर आरती नामदेवांनी लिहिली , त्यात तें म्हणतात विठोबाचे राज्य आम्हा नित्य दिवाळी

विश्वातास नामा जीवे भावे आळवी विठोबाच्या राज्यात कायम सत्संग असतो , म्हणून तिथे कायम दिवाळी असते , आणोआप ईश्वराचे नाव मुखात येते , तो खरा दिवाळीचा दिवस , देवावर त्यांनी जिवापाड प्रेम केल म्हणून ते म्हणतात ,

विठूराया, तुझ्यावरून मी माझा जीव ओवाळून टाकला

संतांची कृपा ज्यावर होईल तो संतपदाला पोहोचल्याशिवाय राहत नाही. संतांच्या कृपेने माणसाचा उद्धार झाला तर नवल नाही, लाखो वारकरी वैकल्य द्रष्ट्यांने संतांची कृपा होते तेव्हा संपूर्ण जीवन ज्ञानाच्या उजेडाने भरून जाते. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणता..

दिवाळी–दसरा तोची आम्हा सण।
सखे संतजन भेटतील।।

किंवा

संतांनी जे विचार जगाला दिले, त्या विचारांची उष्टावळी अनुभवाला मिळणे हीच खरी माझ्या जीवनात दिवाळी आहे. तुका म्हणे त्यांच्या घरची उष्टावळी.

मज ते दिवाळी दसरा सण।।

ज्ञानेश्वर–तुकाराम यांच्या साहित्यात दिवाळी ही प्रातिकात्मक उपमेय म्हणून पाहायला मिळते. मात्र आद्य चरित्रकार नामदेव महाराज यांच्या साहित्यात मात्र प्रत्यक्ष देवासोबतच दिवाळी साजरी केल्याची वर्णने पाहायला मिळतात. एका दिवाळीचे वर्णन नामदेव आणि जनाबाई या दोघांच्याही अभंगात आढळते.

जनाबाई देवाला दिवाळीचे निमंत्रण देऊन घरी आणण्यासाठी सांगताना म्हणते.

आनंदाची दिवाळी। घरी बोलवा वनमाळी।।

घालीते मी रांगोळी। गोविंद गोविंद।।

आणि मग नामदेव कसे भगवान पांडुरंग परमात्म्याच्या मंदिरात गेले आणि देवाला घेऊन घरी आले याचे वर्णन पाहायला मिळते

सण दिवाळीचा आला। नामा राऊळाशी गेला।।

हाती घरोनी देवाशी। चला आमुच्या घराशी।।

नामदेव मंदिरात गेलेले आहेत. ते देवाला घेऊन आले, त्यांना उटणे लावले. अभ्यंगस्नान घातले. इतकेच नव्हे तर आपल्या लुगड्याचा पदराने देवाचे ढोके पुसले याचे वर्णन पाहायला मिळते.

पदर डोईचा वाढीला।
बाळ नंदाचा पुसीला।।

देवाचे लाडके भक्त म्हणून नामदेवांची ख्याती तर आहेच, परंतु देवाशी हितगूज करणारे नामदेव महाराजांचे अनेक अभंग पाहायला मिळतात. विठोबाच्या राज्यात आम्हाला नित्य दिवाळीचा आनंद अनुभवाला येतो, असे सांगताना नामदेव म्हणतात --

दिवाळीचा आनंद निरंतर जीवनात राहायचा असेल तर संतांच्या विचारांचा उजेड आपल्यामागे पुढे ढकला पाहिजे. त्या उजेडात केलेली वाटचाल आपला जीवनाचा प्रवास सुखकर करील. त्यामुळे जीवनात आलेली दुःख–दैन्य फक्त गेली नाहीत, तरी त्यांचा मुकाबला करण्याचे सामर्थ्य आपल्याला प्राप्त होईल. दिवाळीच्या निमित्ताने संतांच्या विचारांशी एकरूप होण्याचा संकल्प करुया.



कुबेरदेवांशिवाय लक्ष्मीपूजन अपूर्ण का?

(पान४ वरून)

त्यांमध्ये कुबेर आणि लक्ष्मी एकत्र दर्शविले आहेत. काही मूर्तींमध्ये कुबेर त्याची पत्नी ईतिलीह दाखविला आहे.

याबरून असे दिसते की प्राचीन काळी कुबेर आणि त्यांची पत्नी इरिती यांची पूजा केली जात असावी. कलांतराने इरितीचे स्थान लक्ष्मीने घेतले आणि पुढे कुबेराच्या जागी गणपतीला प्रतिस्थापित केले गेले. माता लक्ष्मी संपत्ती प्रदान करते, तर कुबेर देव त्या संपत्तीची व्यवस्था पाहतात आणि भौतिक सुख–सुविधा देतात. त्यामुळे लक्ष्मीसोबत कुबेराची पूजा केल्यास घरात आर्थिक स्थिरता आणि ऐश्वर्य प्राप्त होते.

हिंदू पौराणिक मान्यतेनुसार, भगवान कुबेर हे स्वर्गाचे आणि जगाच्या संपत्तीचे कोषाध्यक्ष (भांडारपाल) आहेत. राजा किंवा मालकासोबत त्याचा कोठारच्या अध्यक्षाची पूजा केल्याशिवाय धनकार्याची पूर्तता होत नाही. लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने 'आर्थिक व्यवहारातील सचोटी व नीती ' आणि 'अर्थप्राप्तीच्या साधनांविषयी कृतज्ञता' अशी दोन महत्त्वाची मूल्ये मनात रुजतात, ही या पूजेची वैशिष्ट्ता आहे. भगवान महावीर मोक्षाला गेल्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी महावीरांचे प्रमुख शिष्य गौतम गणधर यांना केवळ ज्ञान प्राप्त झाले म्हणून दिवाळीच्या संध्याकाळी लक्ष्मीपूजन केले जाते ते संपत्तीरूपी लक्ष्मी मिळवण्यासाठी नव्हे, तर मोक्ष–लक्ष्मी किंवा आत्मकल्याणरूपी लक्ष्मी मिळवण्यासाठी. गणधर त्यांचा दिव्य–ध्वनी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवितात. दिवाळीसाठी पूर्वी जमिनीवर आणि राजस्थानातील प्रथेप्रमाणे ताडंव्हाच्या ओल्या पिठाची संगोळी काढतात. त्याला 'मांडणे' असे म्हणतात. त्यावर पाट मांडून लक्ष्मीपूजन किंवा ओवाळणे आदी विधी केले जातात.



भारतात निर्माण झालेल्या आध्यात्मिक विचारात सनातन धर्म या हिंदू धर्म म्हटले जाते. वैदिक, बौद्ध, जैन, सिख असे अनेक पंथ उपपंथीयांनी या आध्यात्मिक विचारात समृद्ध केले. दु:खातून मुक्ति वा निर्वाणासाठी अनेक विधी दिले. यात विशेष क्रांतीकारक चेतना अवतरीत झाल्या ज्यांनी या अध्यात्मगंगेला लोकहृदयात त्या त्या काळातील भाषेत प्रतिष्ठीत केले. अशांपैकी एक महान चेतना म्हणजे भगवान महावीर !

कोणत्या एका काळात एका पित्याचे दोन पुत्र, त्यातला एक राष्ट्ररक्षणासाठी हत्यार चालवणारा क्षत्रिय होत असे व दुसरा वेदमंत्र जाणणारा ब्राह्मण. तसेच दु:खमुक्त करणारे विधी व पंथ (मार्ग) वेगवेगळे होते पण व्यक्तिला त्याचे अंतीम सत्य दाखवणारा, सनातनत्वाचे भान देणारा, पुनर्जन्म–पूर्वजन्म सिद्धांत मानणारा, उपासनेत ऑकारासी अनुभूति येणारा, कर्म सिद्धांत स्वीकारणारा म्हणून एकच सनातन धर्म होता. सनपूर्व १५ व्या शतकात कुरुपांचालांच्या भूमीत ब्राह्मण, क्षत्रिय भेद पडला.

भगवान श्रीकृष्णांचे (जे जैनांच्या पुढच्या कल्पात पहिले तीर्थंकर असतील) चुलतभाऊ घोर अंगिरस (वृष्णिकुलातील श्रेष्ठ पुरुष दशार्ह– अग्रज समुद्रविजय यांची राणी शिवादेवी यांच्या पोटी श्रावण शुक्ल पंचमीला जन्म) ज्यांनी मुक्तिसाठी अहिंसावादी जैन पंथ स्वीकारला व केवलज्ञान प्राप्त करून भगवान नेमीनाथ या नावाने २२ वे तीर्थंकर म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांच्या निमित्ताने यादवकुळात ब्राह्मण व श्रमण परंपरेचा मेळ साधला गेला असे म्हटलं तर वावगं ठरु नये. त्यांच्या नंतर जैन परंपरेत पुढे सनपूर्व ५९९–५२७ दरम्यान २४ वे तीर्थंकर म्हणून भगवान वर्धमान महावीर झाले. ज्यांची अस्तिवेन आमावस्या ही तिथी (दिवाळीचा लक्ष्मीपुजनाचा दिवस) निर्वाण दिन म्हणुन ओळखली जाते.

बिहार राज्यातील वैशालीच्या जवळील कुंडग्रामी (वसाढ) क्षत्रिय वृज्जातील पिता सिद्धार्थ व माता त्रिशला यांच्या पोटी चैत्र शुद्ध त्रयोदशीला जन्म झाला. वैशाली हे मोठे गणराज्य होते. मगध, कोसल, वत्स व अवंती या विशाल गणराज्याच्या बरोबरीने त्याचा उल्लेख होतो. आईवडिलांनी वर्धमान नाव ठेवले तरी वीरवृत्तीमुळे ते महावीर म्हणून प्रसिद्ध पावले. इंद्र त्यांच्या दर्शनाला आला होता त्याने त्यांचे दर्शन घेताच त्यांना वीर असे संबोधले. तर थारगमुर्नीनी सन्मती असे संबोधले. संगमदेवाने त्यांना महावीर असे नाव ठेवले. ज्ञातपुत्र असेही एक नाव त्यांना आहे.

वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनी गृहत्याग केला. ऋजुकूला नदीच्या किनारी जृंभक गावी बारा वर्षे कठोर तप करुन केवल ज्ञान त्यांना मिळाले, नंतर ६६ दिवस मगध देशातल्या राजगृहजवळ विपुलाचल पर्वतावर मौन धरुन त्यांनी विहार केला. तिथेच इंद्रभूती या ब्राह्मणाच्या शंका दूर करुन त्याला पहिला गणधर बनवले.

याशिवाय त्यांचे अनेक मुख्य गणधर ब्राह्मण होते. त्यांचा ब्राह्मणधर्मांना जातीप्रथा व अनावश्यक कार्यक्रांना सोडता विरोध नव्हता.

भगवान बुद्धांच्या समकालीन असणाऱ्या भगवान महावीरांनी मद्य, मांस, मदिरा, हिंसा, असत्यवचन, मध, चोरी करणं यांना टाळून पत्नीशिवाय इतर स्त्रियांना मातां मानणं व आवश्यक तेवढ्या धनाचा संग्रह सांगितला.

व्यक्तिचे श्रेष्ठत्व त्याच्या कर्मावर ठरते, जन्मावर नाही असा स्पष्टपणा त्यांच्या उपदेशात होता. क्षत्रिय कुळातला जन्म असुनही 'मी एक श्रेष्ठ ब्राह्मण आहे' असे ते म्हणत. अहं-पतित पुरोहित व त्यांचे अनावश्यक जटिल क्रियाकांड यांना विरोध करत स्त्री, पुरुष व सर्व वर्ण यांना निर्वाणाचा समान अधिकार असे ते म्हणाले.

य: शस्त्रवृत्ति: समरे रिपु: स्याद्? य: कण्टको वा
स्वकायकार्य ।
अस्त्राणि तत्रैव नृपा: क्षिपन्ति न
कैवल्यनिरतुलाल्ये॥

अर्थात जो शस्त्रधारण करुन रणांगणात युद्ध करण्यासाठी आला असेल अथवा जो आपल्या देशाला बाधक ठरत असेल अशावरच राजांनी शस्त्र उचलावे. दीन, दु:खी व सद्विचारी पुरुषांवर त्याने शस्त्र उचलू नये. याचाच अर्थ योग्य ठिकाणी वापरलेली हिंसा ही योग्यच आहे हे स्पष्ट केले.

अर्धमागधी भाषेतील भगवतीसूत्र या ग्रंथाच्या माध्यमातून गुरुशिष्य संवादाने साधकांच्या अनेक शंका ते सोडवतात. साधनेद्वारा संकृपेतला सोहून सर्वसंग्राहक पातळी कशी येते याचे प्रत्यंतर त्यांच्या अनेकांतवाद या स्याद्वाद विचारात दिसते.

कुटल्याही गोष्टीचा सर्व बाजुंनी विचार करण्याचा संकेत येथे अभिप्रेत आहे. वैगळा विचार करणाऱ्या प्रतिपक्षाबद्दल समंजसपणा दाखवण्याचे मानसिक धैर्य अभिप्रेत आहे. स्याद्वादाने येणारे सम्यगज्ञान व अहिंसेने येणारे सम्यगदर्शन या दोघांचा परिपाक सम्यक चारित्र्यात झाला पाहिजे, जो तो आपापल्या कर्म फळांना जबाबदार आहे म्हणून मोक्षासाठी क्रियाश्रय करावा व ज्याचा त्याने स्वत:चा उद्धार स्वत: करुन घ्यावा, कोणी परमेश्वर तो देणार नाही असे त्यांनी सांगितले.

मोक्षाचे अधिकारी कोण ? अहिंसा, कर्म इ. उपदेश बघता भगवान श्रीकृष्णांच्या गीतेतील क्रांतिकारी विचारांची आठवण येते. केवलज्ञानानंतर ४२ वर्षे त्यांनी श्रमणपंथाची संघटना व प्रसाराचे कार्य केले व ७२ या वर्षी आश्विन आमावस्येला मोक्षाला गेले.

भगवान महावीर निर्वाण दिन

दैनिक महासत्ता
॥ भक्ती ॥
४
शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर २०२६

भगवान धन्वंतरी जन्मकथेसह धनत्रयोदशीला पूजेचे महत्त्व

दिवाळीमध्ये प्रत्येक दिवसाचं खास महत्त्व सांगितलं जातं, त्यातलाच एक दिवस

भगवान धन्वंतरी ची पूजा-अर्चना करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. भगवान धन्वंतरींनी संपूर्ण विश्वाला निरोगी ठेवावे, मानवजातीला रोगमुक्त करून दीर्घायुष्य प्रदान करावे,अशी प्रार्थना केली जाते. धनत्रयोदशीच्या दिवशी नवीन भांडी, सोने-चांदीचे दागिने आणि इतर मौल्यवान वस्तूंची खरेदी देखील करतात त्यामुळे घरात सुखसमृद्धी कायम राहते असा मान्यता आहे. दरम्यान आपण जाणून घेणार आहोत भगवान धन्वंतरी कोण होते आणि त्यांचे पुराण शास्त्रात कुठे कुठे त्यांचा उल्लेख आढळतो.

कोण आहेत भगवान धन्वंतरी?

भगवान धन्वंतरी यांना आयुर्वेदाचे जनक आणि वैद्यकशास्त्राचे अधिष्ठाता देवता मानले जाते. भगवान विष्णूंच्या २४ अवतारांमध्ये त्यांची गणना होते. प्रभू श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्याप्रमाणेच धन्वंतरींची पूजा केली जाते. महाभारत, विष्णुपुराण, अग्निपुराण आणि श्रीमद्भागवत महापुराण यांसारख्या ग्रंथांमध्ये भगवान धन्वंतरींचा उल्लेख आढळतो. प्राचीन मान्यतेनुसार आयुर्वेदाची उत्पत्ती ब्रह्मदेवांपासून झाली. रामायण, महाभारत आणि विविध पुराणांमध्ये आयुर्वेदाच्या अवतरणाचा उल्लेख आढळतो, या ग्रंथांमध्ये भगवान धन्वंतरींच्या अवताराचे आणि त्यांच्या आयुर्वेदातील योगदानाचे वर्णन करण्यात आले आहे.

समुद्रमंथनातून प्रकट झाले भगवान धन्वंतरी

धन्वंतरीची उत्पत्ती ही समुद्रमंथनाच्या वेळेस झाली असा संदर्भ हिंदू पुराण कथांमध्ये सांगितला जातो. समुद्र मंथनातून जेव्हा अमृत कलश घेऊन धन्वंतरी बाहेर पडले होते तेव्हा देव आणि असुरांमध्ये या कलशावरून संघर्ष पेटला होता. धन्वंतरी हे चारभुजाधारी होते. त्यांच्या एका हातामध्ये आयुर्वेदाचा ग्रंथ, एका हातामध्ये औषधी कलश, एका हातामध्ये जडी बुटी आणि एका हातामध्ये शंख होता असं मानलं जातं. या साऱ्या गोष्टींचा वापर करून मनुष्यजातीला चांगलं आरोग्य मिळावं यासाठी उपधार केले जातात असा अर्थ आहे.

गरुड आणि मार्कंडेय पुराणातील कथा

गरुड पुराण आणि मार्कंडेय पुराणानुसार भगवान धन्वंतरींच्या जन्मासंदर्भात एक वेगळी कथा सांगितली जाते. पौराणिक कथेनुसार, गालव ऋषी एकदा जंगलातून प्रवास करत असताना खूप थकले होते. तहान लागल्यामुळे ते व्याकूळ झाले होते. त्याच वेळी त्यांना जंगलातून बाहेर जात असलेली एक कन्या दिसली. तिच्या हातात पाण्याने भरलेला घडा होता. ऋषींची तहान भागावी म्हणून त्या कन्येने त्यांना संपूर्ण घडा पिण्यासाठी दिला. तिच्या या सेवाभावामुळे प्रसन्न होऊन गालव ऋषींना तिला योग्य पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद दिला.

(पान ३ वर)





विविध धर्मांमधील दिव्याचे महत्त्व

सर्व धर्मांमध्ये दिव्याला (ज्योतीला) अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचे स्थान आहे. दिवा हा प्रामुख्याने अंधाराकडून प्रकाशाकडे आणि अज्ञानाकडून ज्ञानाकडे नेणारे प्रतीक मानला जातो. १

वेगवेगळ्या धर्मांमध्ये दिव्याचे महत्त्व खालीलप्रमाणे आहे:

हिंदू धर्म: दिवा हे मांगल्याचे, समृद्धीचे आणि ज्ञानाचे प्रतीक आहे. (१) कोणत्याही शुभ कार्याची सुरुवात दीपप्रज्वलनाने होते. (१) घरात सकाळी आणि संध्याकाळी दिवा लावल्याने नकारात्मक ऊर्जा दूर होते आणि सकारात्मकता येते, अशी मान्यता आहे.

'दीपावली' हा सण दिव्यांचाच उत्सव म्हणून साजरा केला जातो.

बौद्ध धर्म:बौद्ध धर्मात बुद्ध मूर्तीसमोर दिवा लावणे ही आदराची आणि भक्तीची अभिव्यक्ती आहे.

भगवान बुद्धांनी 'अत्त दीपो भव' (स्वत:चा दिवा स्वत: व्हा) असा संदेश दिला होता, जो आत्मज्ञानाचा मार्ग दाखवतो.

जैन धर्म: जैन धर्मात दिव्याला केवळ बाह्य प्रकाश नाही, तर अंतर्गत आत्मज्ञानाचे प्रतीक मानले जाते.

भगवान महावीरांना मोक्ष मिळाला, तेव्हा त्यांच्या अनुयायांनी ज्ञानरुपी प्रकाश पसरवण्यासाठी दिवे लावून उत्सव साजरा केला होता.

ख्रिश्चन धर्म - चर्चमध्ये मेणबत्त्या किंवा दिवे लावण्याची जुनी परंपरा आहे.येशू ख्रिस्तांना 'जगाचा प्रकाश' (Light of the World) म्हटले गेले आहे.मेणबत्तीचा प्रकाश हा दैवी उपस्थिती आणि प्रार्थनेचे प्रतीक मानला जातो.

इस्लाम धर्म:इस्लाममध्ये सुफी संतांच्या दर्ग्यांवर विराग (दिवा) लावण्याची परंपरा आहे.

दिव्याचा प्रकाश हा अल्लाहच्या नूरचे (दैवी प्रकाशाचे) प्रतीक मानला जातो. कुराणमध्येही अल्लाहची तुलना एका दैवी प्रकाशाशी केली आहे.

शीख धर्म:गुरुद्वारांमध्ये प्रकाश आणि दिव्यांना आदराचे स्थान आहे.

सुवर्ण मंदिरासह सर्व गुरुद्वारांमध्ये दिव्यांची रोषणाई केली जाते, जी आत्मिक जागृतीचे प्रतीक मानली जाते.

धर्म कोणताही असो, दिवा नेहमी सत्य, ज्ञान, शांतता आणि आशेचा किरण दर्शवतो. तो मानवातील अहंकाराचा अंधार दूर करून प्रेमाचा प्रकाश पसरवण्याचा संदेश देतो.

म्हणजे धनत्रयोदशी.

आश्विन वद्य त्रयोदशीला येणारी धनत्रयोदशी उत्साहात आणि आनंदात साजरी केली जाते. याविषयी

विविध धर्मांमधील दिवाळीचे महत्त्व

सण-उत्सवांच्या माध्यमातून वेगवेगळे सांस्कृतिक राजकारण घडत असते. यातून आपल्या विजयाची, पुनरागमनाची एक ऐतिहासिक स्मृती जपली जाते. या ऐतिहासिक तथ्यांशी, कथनांशी जोडून घेत सामान्य लोक आपला आनंद साजरा करतात. दिवाळीतही हेच घडते. हिंदू, जैन, बौद्ध, शीख हे समूह वेगवेगळ्या कथनांशी स्वत:ला जोडून घेत दिव्यांच्या रोषणाईने आपला सार्वजनिक अवकाश प्रकाशमान करतात. सामान्यजन दिवाळीकडे अनीतीवर नीतीचा विजय म्हणून पाहतात.

भारतात आर्थिक राजकारणाच्या तुलनेत सांस्कृतिक राजकारणाचा बोलबाला जास्त आहे. आर्थिक राजकारण करणारे लोक देखील सांस्कृतिक राजकारणाची भाषा बोलतात. अशाप्रकारचे सांस्कृतिक राजकारण सण आणि उत्सवांमधून घडते. अगदी अलीकडेपर्यंत सण-उत्सव साजरा करणे ही एक सामान्य घटना होती, परंतु आजकाल सण आणि उत्सवांमधून जाणीवपूर्वक राजकारण घडवले जाते. तसेच जवळपास वर्षभर या प्रकारचे राजकारण घडत राहते. या मोठ्या बदलाच्या चक्रात दिवाळीचा सणही सापडला आहे. तरीही दिवाळीच्या संदर्भात वेगवेगळ्या प्रकारचे राजकारण घडते. या संदर्भात तीन-चार पद्धतीने राजकारण घडविण्याची परंपरा विकसित झाली आहे.

रामायण - अधर्मावर धर्माचा विजय : भारतीय राजकारणात राम हे प्रतीक सतत कृतिशील असते. रामराज्य संकल्पनेबद्दल स्वातंत्र्यपूर्व काळात मुख्य दोन महत्त्वाचे प्रवाह उदयाला आले होते.



महात्मा गांधी यांनी रामराज्याची संकल्पना एक युटोपिया (आदर्श राज्य) म्हणून अधोरेखित केली होती, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रामराज्य संकल्पनेची समीक्षात्मक दृष्टी विकसित केली. म्हणजेच थोडक्यात भारतीय राजकारणातील महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रामराज्य संकल्पनेच्या अवतीभवती आणि समीक्षात्मक स्वरूपात राजकारणाची पुनर्रचना केली होती. या अर्थाने सलीच्या स्पर्धेमध्ये रामराज्य संकल्पना होती. रामराज्य आणि सत्ता यांची सांधेजोड करताना तुलसीदास यांच्या 'रामचरित्रमानस' आणि वाल्मिकी यांच्या 'रामायण' या महाकाव्यातील रामराज्याची उदाहरणे दिली जातात. यामुळे तुलसीदास आणि वाल्मिकी यांच्या लेखनात रामराज्याचे मूळ स्रोत आहेत, असा युक्तिवाद केला जातो. हा युक्तिवाद महात्मा गांधी यांनी देखील केला होता. दिवाळीच्या संदर्भात एक सर्वांत प्रसिद्ध आख्यायिका रामायणातील आहे. ही कथा १४ वर्षांच्या वनवासानंतर राम, सीता आणि लक्ष्मण अयोध्येत परतल्याच्या अवतीभवती फिरते. भगवान राम म्हणजे विष्णूचा सातवा अवतार अशी एक धारणा आहे. त्यांचे वडील, राजा दशरथ यांनी कैकेयी यांना दिलेल्या वचनामुळे त्यांना वनवासात पाठवण्यात आले होते. या वनवासादरम्यान, सीतेचे अपहरण करणाऱ्या रावणाशी रामाने युद्ध केले. हनुमान आणि मित्रांच्या सैन्याच्या मदतीने रावणाचा पराभव केला. विजयानंतर राम-सीता-लक्ष्मण अयोध्येत परत आले. तेव्हा शहर आनंदाने उजळून निघाले. आपल्या राजपुत्राचे परतणे पाहून आनंदित झालेल्या अयोध्येच्या लोकांनी त्यांचे आणि त्यांच्या कुटुंबाचे स्वागत करण्यासाठी तेलाच्या दिव्यांच्या रांगा (दिवे) लावल्या.

दिवे लावण्याची ही कृती बाईटवर चांगल्याचा, अंधारावर प्रकाशाचा आणि अन्यायावर नीतिमत्तेचा विजय होती, याचे प्रतीक होती. दिवाळीला 'दीपावली' असेही म्हणतात, त्याचा अर्थ 'दिव्यांच्या रांगा' असा होतो. दिवाळीला दिवे लावण्याची परंपरा या प्राचीन घटनेचे स्मरण करते. हिंदू संस्कृतीत, रामाचे अयोध्येत पुनरागमन म्हणजे अधर्मावर धर्माचा (नीती, न्याय) विजय मानला जातो. या तत्त्वाला अनुसरून दरवर्षी दिवाळीच्या आनंदाच्या प्रसंगाचे औचित्य साधण्यासाठी घरोघरी दिवे लावले जातात. घरे मेणबत्या आणि दिव्यांनी सजवली जातात. यामागची मुख्य धारणा ही न्याय आणि नीतीच्या विजयाची असते. हा देखील या सांस्कृतिक राजकारणाचा एक अर्थ आहे.

महाभारत - न्यायाचे प्रतीक : महाभारत हे महाकाव्य देखील दिवाळीशी जोडलेले आहे. ही कथा पांडवांच्या १३ वर्षांच्या वनवासावर आधारलेली आहे. वनवासातून परत आल्यानंतर उत्सव केला गेला. पाच पांडव (युधिष्ठिर, भीम, अर्जुन, नकुल आणि सहदेव) यांचा द्यूतक्रीडनाच्या नेतृत्वाखालील कौरवांनी खेळात पराभव केला. त्यानंतर त्यांना वनवासात पाठवण्यात आले. त्यांच्या वनवासाचा एक भाग म्हणून, पांडवांना शेवटच्या वर्षात गुप्तवासात राहावे लागले. या काळात ते सापडले असते तर त्यांना आणखी १२ वर्षे वनवास भोगावा लागला असता. परंतु त्यांनी त्यांचा वनवास पूर्ण केला. या वनवासात लपून राहण्याचे शेवटचे वर्ष देखील समाविष्ट होते. परंतु ते त्या काळातही सापडले नाहीत. अर्थातच पांडव हस्तिनापुरात परतल्यावर राज्यातील लोक आनंदी झाले. त्यांनी दिवे लावून त्यांच्या शासकांचे (ruling class) स्वागत करण्यासाठी उत्सव साजरा केला. न्यायाच्या विजयाचे प्रतीक असलेले हे स्मरण दिवाळीच्या वेळी केले जाते, यामुळे दिवाळी या सणाला महाभारतातीही जोडले जाते. पांडवांचे पुनरागमन हे संकटांचा अंत आणि न्यायाचे प्रतीक आहे, विशेषत: रामाच्या अयोध्येत परतण्यासारखे.


भारत आणि नेपाळमधील अनेक समुदाय पांडवांच्या घरी परतण्याच्या स्मरणार्थ दिवाळी साजरी करतात. या उत्सवाच्या निमित्ताने रोषणाई साजरी केली जाते. तसेच त्यांच्या नीतिमान शासकांचे स्वागत केले जाते. परंतु हा आनंद नीती व न्याय म्हणून साजरा केला जातो. रामायण आणि महाभारत या महाकाव्यांमधून धर्म, कर्तव्य, नीती, त्याग, निष्ठा आणि वाईटावर चांगल्याचा अंतिम विजय हा आदर्श मांडला जातो. हा संस्कार केला जातो. म्हणजेच हा सण प्रकाश आणि उत्सवांच्या पलीकडे जातो. मागासलीत प्रकाशावर, सदुणांच्या विजयावर (न्याय) आणि आपल्यातील अंधार दूर करण्यावर चिंतन करण्यास हा सण प्रोत्साहित करतो. मदत करतो.

सामान्य माणसाचा सण : सामान्य माणसाला सणाचे महत्त्व जास्त वाटते. हा अर्थ नीट व्यक्त करण्यासाठी 'राजाला दिवाळी काय माहीत' ही एक म्हण प्रसिद्ध आहे. विशेषत: भारतात अनौपचारिक क्षेत्रामध्ये पंच्याऐंशी-नव्वद टक्के लोक कष्टमार म्हणून काम करतात. या कामगार वर्गाला दिवाळ सणाचे विशेष महत्त्व वाटते. भारतात डिजिटल युग अवतरलेले आहे. यामुळे डिजिटल प्लॅटफॉर्मचे मालक आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवरती काम करणारे कामगार असे भारतीय लोकांचे दोन गट पडलेले आहेत. यापैकी डिजिटल प्लॅटफॉर्मवरती काम करणाऱ्या कामगारांना दिवाळी साजरी करावयाची असते. डिजिटल नेटिव्ह, डिजिटल युजर्स अशा ओळखी सामान्य लोक भारतातील सर्व जाती-धर्मांमध्ये आहेत, हे सर्वच लोक 'सामान्य' या प्रकारचे जीवन जगतात. 'गिग कामगार' हे एक अर्थाने डिजिटल प्लॅटफॉर्मवरील कामगार आहेत. गिग अर्थकारण हा एक प्रकार या कामगारांच्या काम करण्याच्या पद्धतीतून उदयाला आला आहे. त्यांच्याकडे फारशी संपत्ती नाही. परंतु दिवाळी हा सण त्यांच्या जीवनात कमीत कमी साधनांमध्ये जास्तीत जास्त सुखशांतीचा अनुभव देणारा असतो. हे त्यांचे सार्वजनिक









जीवन असते, कारण एकमेकांमध्ये मिळून मिसळून सण साजरा केला जातो. त्यामुळे दिवाळी हा एक सार्वजनिक अवकाश असतो.

जैन, बौद्ध, शीख यांची दिवाळी

रामायण आणि महाभारत या महाकाव्यव्यतिरिक्त जैन आणि बुद्ध धर्मीयही दिवाळीशी आपला संबंध जोडतात. त्यासाठी जैन आणि बुद्ध धर्मीय आपापल्या धर्मातील ऐतिहासिक घटनांचा आधार घेतात. जैन हा दिवस आपले २४ वे तिर्थंकर भगवान महावीर यांच्या निर्वाण प्राप्तीच्या रूपात साजरा करतात, तर बुद्धिस्ट लोक हा दिवस दिवे लावून साजरा करतात, कारण या दिवशी भगवान गौतम बुद्ध ४८ वर्षांनंतर कपिलवास्तूत परतले होते, तर शीख लोक हा सण गुरू हरगोबिंदसिंगजी यांच्या तुरुंगातून घरी परतण्याच्या रूपात साजरा करतात. म्हणजेच थोडक्यात दिवाळी हा सण सांस्कृतिक राजकारणाचा भाग म्हणून साजरा केला जातो. यातून सांस्कृतिक राजकारणाचे संस्कार केले जातात. सामान्य लोक मात्र दिवाळी हा सण त्यांच्या सामूहिक आनंदाचा क्षण म्हणून साजरा करतात. हा आनंद साजरा करत असतानाच ते नकळतपणे इतिहासाशी स्वत:ला जोडून घेतात.



नरक चतुर्दशीला काय करावे ?

आश्विन कृष्ण पक्ष चतुर्दशीला नरक चतुर्थी साजरी केली जाते. नरकासुर राक्षसाच्या वधाप्रीत्यर्थ हा दिवस साजरा केला जातो. यामागील कहाणी अशी आहे की नरकासुर नावाचा असुर मानवांना पीडा देत होता तेव्हा श्रीकृष्णाने त्याचा वध केला. मरताना नरकासुराने वर मागितला, की आजच्या तिथीला मंगल स्नान करणाऱ्याला नरकाची पीडा होऊ नये. श्रीकृष्णाने त्याला वर दिला, त्यामुळे नरक चतुर्दशीच्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करण्याची रीत पडली. या दिवशी सूर्योदयापूर्वी उठून जे लोक स्नान करत नाहीत, वर्षभर त्यांच्या मागे दारिद्र्य आणि संकट पाठ सोडत नाही, असे मानले जाते. अभ्यंगस्नान चंद्रोदयव्यापिनी चतुर्दशीला सकाळीच लवकर उठून शरीरावर तेल आणि उटणे लावून स्नान करावे. त्यावेळी खालील मंत्र म्हणावा.

मयमलोकदर्शनाभावकामोऽभ्यंगस्नान करिष्ये।'

अर्थी आंघोळ झाल्यावर आंघोळ करणाऱ्याला औक्षण करावे. या दिवशी गव्हाच्या पिठाचा एक दिवा तयार करून त्यात तिळाचे तेल टाकून, दिव्याच्या चारही बाजूला कापसाची वात लावून दिवा प्रज्वलित करावा, त्यानंतर पूर्वेला तोंड करून अक्षता आणि फुलांनी पूजा करावी. त्यासाठी खालील मंत्र बोलून देवालयात दिवा लावा.पूजा करा

'दत्तो दीप: चतुर्दश्यां नरक प्रीतये मया।।

चतु : वर्ती समायु सर्वपापापनुत्तयो।।' पूजा करा

संध्याकाळी घर, दुकान, कार्यालय आदी प्रज्वलित दिव्यांनी अलंकृत करा. हे व्रत केल्यावर नरकापासून मुक्ती मिळते. रामभक्त हनुमानाचा जन्म याच दिवशी झाला होता.

(पान ३ वर)

कुबेरदेवांशिवाय लक्ष्मीपूजन अपूर्ण का?

आश्विन अमावास्येस लक्ष्मीपूजन हा सण साजरा केला जातो. या दिवशी प्रदोषकाळी (संध्याकाळी) लक्ष्मीचे पूजन केले जाते. लक्ष्मी ही फार चंचल असते असा समज आहे. त्यामुळे, शक्यतोवर हिंदू शास्त्राप्रमाणे १४मीपूजन हे, लक्ष्मी स्थिर रहावी म्हणून, स्थिर लग्नावर करतात, त्याने लक्ष्मी स्थिर राहते असा समज आहे. अनेक घरांत श्रीसूक्तपठणही केले जाते. व्यापारी लोकांचे हिशोबाचे नवीन वर्ष (विक्रमसंवत्?) लक्ष्मीपूजनानंतर सुरू होते. या दिवशी सर्व अभ्यंग स्नान करतात, पाटावर रांगोळी काढून तांदूळ ठेवतात, त्यावर वाटी किंवा तबक ठेवतात. त्यात सोन्याचे दागिने, चांदीचा रुपया, दागिने ठेवून त्यांची पूजा करतात. हा दिवस व्यापारी लोक फार उत्साहात साजरा करतात. या दिवशी लोक स्वच्छता करण्यासाठी लागणारी नवी केरसुणी विकत घेतात, तिलाच लक्ष्मी मानून तिच्यावर पाणी घालून हळद-कुंकू वाहून घरात वापरण्यास सुरुवात करतात.



प्राचीन काळी या रात्री कुबेरपूजन करण्याची रीत होती. कुबेर हा देवांचा खजिनदार आणि धनसंपत्तीचा स्वामी मानला जातो. दीपप्रज्वलन करून यंत्र आणि त्यांचा अधिपती कुबेराला निमंत्रित करून त्याची पूजा करणे हा मूळचा सांस्कृतिक कार्यक्रम होता, परंतु गुप्तकाळात वैष्णव पंथाला राजाश्रय मिळाल्याने आधी कुबेराबरोबरच लक्ष्मीचीही पूजा होऊ लागली. भारतात, विविध ठिकाणी झालेल्या उत्खननात कुशाण काळातील अनेक मूर्ती सापडल्या आहेत. (पान ३ वर)